SHRIRAM Finance
BAJAJ FINSERV

श्रीराम फायनान्ससह बजाज फायनान्सची कार्यालये फोडली!

२ शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर संतापाचा उद्रेक

क्रांतिकारी शेतकरी संघटना आक्रमक



नांदेड/प्रतिनिधी- 'दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारात जाऊन जबरदस्ती वसुली कराल, महिलांना त्रास द्याल, तर एकही फायनान्स कंपनीचे कार्यालय शिल्लक ठेवणार नाही,' असा आक्रमक इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला होता. आता या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर नांदेडमध्ये क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जाधवसह त्यांच्या कार्यकर्त्यांनी दोन खासगी फायनान्स कंपन्यांच्या कार्यालयांची तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. श्रीराम फायनान्स आणि बजाज फायनान्स या कंपन्यांच्या कार्यालयांना लक्ष्य करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे नांदेडमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

राज्यात दुष्काळाने शेतकरी, शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांचे जगणे कठीण झाले असताना मायक्रोफायनान्स आणि खासगी फायनान्स कंपन्यांकडून सक्तीची वसुली सुरू असल्याचा गंभीर आरोप रविकांत तुपकर यांनी यापूर्वी केला होता. 'वसुलीवाल्यांनो, शेतकऱ्यांच्या दारात याल, महिलांना त्रास द्याल, तर कपडे काढून फटके देऊ! सरकारने वेळीच आवरावे, अन्यथा जोरजबरदस्तीने वसुली करणाऱ्या कंपन्यांचे एकही कार्यालय शिल्लक ठेवणार नाही,' असा इशारा त्यांनी दिला होता.

मायक्रोफायनान्स आणि खासगी फायनान्स कंपन्यांकडून सक्तीची वसुली

नांदेड येथील चंद्रकांत शिंदे आणि लातूर येथील दत्तात्रय कुंभार या दोन शेतकऱ्यांच्या मृत्यूमागे मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या सक्तीच्या वसुलीचा दबाव असल्याचा आरोप करण्यात आला होता. या दोन्ही शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची रविकांत तुपकर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सांत्वन केले होते. या घटनांच्या पार्श्वभूमीवर तुपकरांनी मायक्रोफायनान्स कंपन्या, खासगी फायनान्स कंपन्या आणि ➪(पान २ वर)

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार ३ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

राज्यातील न्यायालये बॉम्बने उडवून देण्याच्या धमक्या

न्यायालय परिसर केला रिकामा; पोलीस यंत्रणा अलर्ट



मुंबई/प्रतिनिधी- राज्यभरातील विविध जिल्ह्यातील जिल्हा न्यायालय उडवून देण्याचा ई-मेल आल्याने सर्वत्र खळबळ उडाली असून पोलीस यंत्रणांनी सर्वच न्यायालयांचा परिसर रिकामा केल्याचं दिसून आलं. ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोलीसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील न्यायालयाला असा धमकीचा ई-मेल आल्याची माहिती असून सर्वच ठिकाणी पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून अधिक तपास सुरू आहे. सायबर पोलिसांकडूनही ई-मेल पाठवणाऱ्या आरोपीचा शोध घेतला जात आहे.

ठाणे जिल्हा न्यायालयात आयईडी बॉम्बस्फोट घडविण्याची धमकी ई-मेल द्वारे आज देण्यात आली. त्यानुसार, २७ नोव्हेंबरपर्यंत ठाणे जिल्हा न्यायालयात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली आहे. तसेच मेट्रो स्थानकांवर रात्री ९.११ वाजता बॉम्बस्फोट घडवण्याचा उल्लेखही त्यात करण्यात आला आहे. सन १९८४ मधील रक्तपाताचा बदला रक्ताने घेण्याचा उल्लेख या ई-मेलमध्ये केला आहे. आपण दिलजीत दोसांझ याचा साथीदार असल्याचा उल्लेख करत, २७ नोव्हेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या कार्यक्रमात आयफोनमध्ये आयईडी ठेवून बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी आरोपीने दिली आहे. 'मराठी बांधवांनो, आपल्या मुलांना वाचवा, २७ नोव्हेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स येथे दिलजीत दोसांझ यांच्या कार्यक्रमात बॉम्बस्फोट घडवले जातील.', अशा आशयाचा मजकूर मेलमध्ये आहे.

पोलीस उपायुक्तांकडून पाहणी, परिसर मोकळा केला- दरम्यान, याप्रकरणी ठाणे परिमंडळ १ चे पोलिस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी माहिती दिली. आज ➪(पान २ वर)

सराफ व्यावसायिकाचं भरदिवसा इनोव्हातून अपहरण, सर्वत्र खळबळ; पोलीस तपासात तेलंगणा कनेक्शन

बुलढाणा /प्रतिनिधी- जिल्ह्यातील देऊळगाव राजा तहसील कार्यालयासमोरून तालुक्यातील देऊळगाव (ल्हर्हि) मही येथील रहिवासी असलेले आणि योगीराज ज्वेलर्सचे मालक अनिरुद्ध शिंगणे यांचे अपहरण केल्याची खळबळजनक घटना घडली. सराफा व्यापारी असलेल्या २८ वर्षे युवकाचं इनोवामधून आलेल्या चार जणांनी अपहरण केलं. दुपारी एक ते दीडच्या सुमारास फिल्मी स्टाईल अपहरणामुळे देऊळगाव राजा शहरात खळबळ उडाली आहे. मात्र, पोलिसांनी (इदत्म) या घटनेचा तपास सुरू केला असता धक्कादायक ट्विस्ट पाहायला मिळाला.



अपहरणाच्या घटनेनंतर तरुणाच्या नातेवाईकांनी देऊळगाव राजा शहर पोलिसात तक्रार दिली आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या अपहरण नाट्यामुळे देऊळगाव राजासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अपहरणकर्त्यांची इनोवा कार सीसीटीव्हीत कैद झाली असून पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. अनिरुद्ध शिंगणे हे व्यवसायाचा ज्वेलर्स व बांधकाम व्यावसायिक असल्याने हे अपहरण कोणी व का केलं? याबद्दल माहिती घेत पोलिसांनी जलद गतीने तपास सुरू केला. त्यामुळे, अवघ्या काही तासांतच पोलिसांना इनोव्हा कार आणि अपहृत युवक आढळून आले आहेत. तर, या घटनेत चांगलाच ट्विस्ट दिसून आला, अधिक तपास सुरू आहे. शहरातील ज्वेलर्स अपहरण प्रकरणात मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला. अपहरणकर्त्यांची इनोव्हा कार काही वेळापूर्वीच साखरखेर्डा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील लव्हाळा फाटा येथे आढळून आली, देऊळगावा राजा पोलिसांनी तपासादरम्यान ही कार ताब्यात घेतली असून अपहृत युवक सुरक्षित असून अपहरणकर्ते हे तेलंगणा पोलीस असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, त्यांनी संबंधित युवक व्यापाऱ्याला कुठल्या प्रकरणात ताब्यात घेतलं आहे, तसेच घेऊन जात होते याबद्दल स्थानिक पोलीस किंवा जिल्हा पोलिसांना कुठलीही माहिती दिली नाही. त्यामुळे, हे संपूर्ण अपहरण नाट्य ➪(पान २ वर)



अमरावती -अकोला न्यायालयालाही धमकीचा ईमेल

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती येथील जिल्हा व सत्र न्यायालयात आज सोमवार २ नोव्हेंबर रोजी दुपारी नेहमी प्रमाणे कामकाज सुरू असताना न्यायालयाच्या इमारतीत बॉम्ब ठेवण्यात आल्याचा संदेश एका ई-मेलच्या माध्यमातून प्राप्त झाल्याने प्रचंड खळबळ उडाली. न्यायालय प्रशासनाने तत्काळ याची माहिती पोलिसांना दिली.खबरदारीचा उपाय म्हणून न्यायालयाच्या मुख्य इमारती सह इतर विभागांतील न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी आणि कामानिमित्त आलेल्या पक्षकारांना सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यात आले. या ई-मेलमुळे जिल्हा न्यायालय प्रशासन आणि पोलीस यंत्रणेला चांगलीच धावपळ करावी लागली.या अमरावतीसह राज्यातील अकोला, बीड, रत्नागिरी सह अनेक ठिकाणी न्यायालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याची माहिती आहे. अमरावतीत ही अशाच प्रकारचा ई-मेल प्राप्त झाल्याची सूचना मिळाल्या नंतर पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त श्याम घुगे, यशवंत सोळंके यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी, मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी आणि जलद प्रतिसाद पथक न्यायालय परिसरात पोहचले. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शना खाली कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला. बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच श्वान पथकाने संपूर्ण परिसराला घेराव घातला. माहिती नुसार न्यायालयाचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरू असताना दुपारी बारा वाजता अचानक ई-मेल आला. यामध्ये दुपारी तीन वाजता न्यायालयाला बॉम्बने उडून देण्याची धमकी देण्यात आली होती. ➪(पान २ वर)

मंत्री पंकजा मुंडेंचा हटके अंदाज

हॅण्डलूम साडीतील रॅम्प वॉक चर्चेत





मुंबई/प्रतिनिधी- राजकारणातील नेतेमंडळी एखाद्या वेगळ्या अंदाजात दिसली की सर्वांचेच लक्ष त्यांच्याकडे वेधले जाते. त्यात एखाद्या महिला मंत्र्याने थेट मॉडेलप्रमाणे रॅम्प वॉक केला तर आश्चर्य वाटणारच! सध्या राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचे काही फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर चर्चेत आहेत. राजकीय व्यासपीठावर आपल्या कामामुळे ओळखल्या जाणाऱ्या पंकजा मुंडे यांचा यावेळी मात्र वेगळाच अंदाज पाहायला मिळाला. त्यांनी चक्क रॅम्प वॉक करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. 'बॉम्बे टाइम्स फॅशन वीक'मध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमात त्यांनी सहभाग ➪(पान २ वर)

पवारांची प्रकृती बिघडली, पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल



मुंबई/प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना खोकल्याचा त्रास जाणवू लागल्यामुळे पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट करत माहिती दिली आहे. तसेच शरद पवार यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर असल्याचंही सुप्रिया सुळे यांनी सांगितलं आहे. शरद पवार यांचा तब्येत अचानक बिघडल्यामुळे त्यांचा नियोजित दुष्काळी दौरा रद्द करण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे. शरद पवार यांना खोकल्याचा त्रास जाणवू लागल्यानंतर त्यांना रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांची त्यांची प्रकृती स्थिर आहे. तसेच त्यांचे सततचे दौरे आणि कामाचा व्याप पाहता त्यांना डॉक्टरांनी आराम करण्याचा सल्ला दिला आहे.

महालक्ष्मी एक्स्प्रेसमध्ये लूट

मुंबई/प्रतिनिधी- मुंबईहून कोल्हापूरकडे जाणाऱ्या महालक्ष्मी एक्स्प्रेसमधील सिग्नल यंत्रणा बिघडवून पाच ते सहा जणांच्या टोळीने मध्यरात्री लूटमार केल्याची धक्कादायक घटना उजेडात आली आहे. सातारा जिल्ह्यातील सालपे स्थानकाजवळ सिग्नल यंत्रणेत बिघाड करून रेल्वे थांबविण्यात आली. त्यानंतर आरक्षित डब्यातील झोपलेल्या तीन महिला प्रवाशांच्या गळ्यातील सुमारे दोन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी हिसकावून नेल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. रविवारी मध्यरात्री अडीचच्या सुमारास महालक्ष्मी एक्स्प्रेस सालपे स्थानकाजवळ आली असता चोरट्यांनी सिग्नल यंत्रणेत छेडछाड करून गाडी थांबवली. यानंतर पाच ते सहा जणांच्या टोळीने महिला प्रवाशांना लक्ष्य केले.

कंत्राटदारासह ८ मजुरांचा विजेचा धक्क्याने अंत



नवी दिल्ली/वृत्तसंस्था- राजस्थानमधील झुंझुनू जिल्ह्यातील छपोली गावात रस्त्याचे काम सुरु असतानाच आठ कामगारांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. या अपघातात इतर पाच जण जखमी झाले. हा अपघात सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडला. उदयपूरवतीचे एसएचओ रामपाल म्हणाले, 'रस्त्यावर काम करणाऱ्या एका ग्रॅव्हेल मिक्सर मशीनचा हायड्रॉलिक जॅक डोक्यावरील उच्च-दाब तारेला लागला. यामुळे मशीनमधून विद्युत प्रवाह वाहिला आणि कामगारांना विजेचा धक्का बसला.११ केव्हीची ही लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु अलीकडेच ती बदलण्यात आली. अपघातानंतर गावकरी आंदोलन करत आहेत. गावकरी रोहिताश्व म्हणाले, '११ केव्हीची लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु काही दिवसांपूर्वी ती रस्त्याच्या वरून हलवण्यात आली. सखल तारेमुळे हा मोठा अपघात घडला.'गावकरी अविनाश म्हणाले, दोनदा काम थांबवले. खूप पाठपुरावा केल्यानंतरच काम पुन्हा सुरू करण्यात आले. प्राथमिक अहवालानुसार, पाच कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर तिघे गंभीररित्या भाजले. तथापि, पोलिसांनी नंतर मृतांची संख्या आठ असल्याचे सांगितले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय ➪(पान २ वर)

रस्त्याचे काम सुरु असतानाच मशीनचा उच्च दाबाच्या तारेला स्पर्श





बारी समाजाच्या हक्कांसाठी बच्चू कडूंचा पुढाकार
-स्मारकाच्या घोषणेचे रूपांतर प्रत्यक्ष कामात करा!
-शेकडो बारी बांधवांचे स्वखर्चाने आत्मक्लेश आंदोलन

अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-
संत श्री रूपलाल महाराज यांच्या स्मारकासह बारी समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी समस्त बारी समाजाच्या वतीने आत्मक्लेश आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची सुरुवात संत श्री रूपलाल महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन करण्यात आली. त्यानंतर आकर्षक पद्धतीने सजविलेल्या रथातून मोर्चा तहसील कार्यालयापर्यंत आणण्यात आला. येथे शेकडो बारी समाजबांधवांनी स्वखुशीने आणि स्वखर्चाने सहभागी होत आत्मक्लेश आंदोलन केले. समाजाच्या श्रद्धेचा, अस्मितेचा आणि न्याय्य हक्कांचा हा प्रश्न असल्याने आंदोलनात समाजबांधवांची मोठी एकजूट पाहायला मिळाली. या पार्श्वभूमीवर आमदार बच्चू कडू यांनी समाजाच्या प्रतिनिधींची भेट घेतली. अखिल भारतीय बारी समाज महासंघाच्या वतीने त्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



बारी समाज आणि बच्चू कडू यांचे नाते जुने आहे. यापूर्वीही त्यांनी समाजाच्या प्रश्नांसाठी मंत्रालयात विविध बैठका आयोजित करून शासनाचे लक्ष वेधले होते. बारी समाजाच्या सामूहिक विवाह सोहळ्यालाही त्यांनी उपस्थिती लावली होती. विशेष म्हणजे, २०२४ मध्ये संत श्री रूपलाल महाराज यांच्या स्मारकाचा प्रश्न त्यांनी शासनदरबारी लावून धरला होता. एवढेच नव्हे, तर विधान परिषदेचे सभापती सचिन अहिर यांच्याकडेही हा प्रश्न मांडला होता. त्यावेळी स्मारक अतिशय भव्य-दिव्य स्वरूपात उभारण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. शासनाने स्मारक मंजूर झाल्याची घोषणा केली; मात्र दोन वर्षांचा कालावधी उलटूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. वारंवार आश्वासने मिळूनही प्रत्यक्ष कृती होत नसल्याने अखेर समाजावर आत्मक्लेश आंदोलन करण्याची वेळ आली.

आता पुन्हा आंदोलनाची घोषणा होताच मुंबईत काही मोजक्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन स्मारक मंजूर झाल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र, पूर्वीच्या घोषणेची अंमलबजावणी झालेली नसल्याने समाजाने यावेळी सावध भूमिका घेतली आहे. केवळ मंजुरीच्या घोषणा नकोत, तर निधीचा शासन निर्णय काढून स्मारकाच्या प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करा, अशी ठाम मागणी समाजाने केली आहे.

बारी समाज हा अत्यंत कष्टकरी, मेहनती आणि स्वाभिमानी समाज आहे. समाजाच्या न्याय्य मागण्यांना शासनाने प्राधान्य देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून निवेदनाद्वारे पुढील मागण्या मांडण्यात आल्या.

१. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखिल भारतीय बारी समाज महासंघाची तातडीने बैठक बोलवावी. २. संत श्री रूपलाल महाराज स्मारकासाठी मंजूर निधीचा शासन निर्णय तातडीने काढावा. ३. संत श्री रूपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळाचे स्वतंत्र कंपनी म्हणून कामकाज सुरू करून अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करावी. त्यामध्ये महिला सदस्यालाही स्थान द्यावे. ४. पानमळ्यांना पिकाचा दर्जा देऊन दुष्काळग्रस्त भागातील पानमळ्यांना नुकसानभरपाई द्यावी. ५. बारी समाजातील विद्यार्थ्यांसाठी पुणे आणि संभाजीनगर येथे शासकीय वसतिगृहे उभारावीत. या मागण्यांबाबत बच्चू कडू यांनी यापूर्वी केलेल्या पाठपुराव्याचा संदर्भ देत पुन्हा शासनस्तरावर प्रयत्न करण्याची भूमिका घेतली. कष्टकरी बारी समाजाच्या मागण्यांना न्याय मिळणे आवश्यक असून, संत श्री रूपलाल महाराज यांचे स्मारक केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात भव्य स्वरूपात उभे राहिले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

बच्चू कडू यांच्या भेटीनंतर बारी समाजाच्या वतीने सुरू असलेले आत्मक्लेश आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, समाजाच्या मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत शासनदरबारी पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार समाजाच्या प्रतिनिधींनी व्यक्त केला. यावेळी अखिल भारतीय बारी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. रमेशचंद्र पूंजाजी घोलप यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी आणि समाजबांधव उपस्थित होते.

स्मारकाचे काम कुठल्याही परिस्थितीत पूर्ण करणार – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समस्त बारी समाज बांधवांशी दूरध्वनीवरून संवाद साधला. यावेळी रूपलाल महाराजांच्या स्मारकाचे काम कुठल्याही परिस्थितीत पूर्ण करणार, असे ठाम आश्वासन त्यांनी समाज बांधवांना दिले.

१ व १० वरिल उर्वरित

राज्यातील न्यायालये बॉम्बने

सकाळी ९.४३ वाजता कोर्टाच्या रजिस्टार कार्यालयाच्या अधिकृत ईमेल आयडीवर बॉम्ब ठेवल्याचा आणि दुपारी ३.११ वाजता त्याचा स्फोट होणार असल्याचा संदेश पंजाबी भाषेत मेलद्वारे प्राप्त झाला. संदेश मिळताच निश्चित केलेल्या मानक कार्यपद्धतीनुसार दोन्ही कोर्ट इमारती पूर्णपणे मोकळ्या करण्यात आल्या. इमारतींमधील लोकांना वरच्या मजल्यापासून ते खालच्या मजल्यापर्यंत बाहेर काढून परिसरापासून सुमारे १०० मीटर अंतरावर सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आल्याची माहिती पाटील यांनी दिली. बीडीडीएस बॉम्ब शोधक व नाशक पथकाद्वारे दोन्ही इमारतींमधील सर्व मजले ८ मजले, पार्किंग क्षेत्र, कँटीन आणि इतर संपूर्ण परिसराची तपासणी सुरू आहे. या घटनेची आणि ईमेलची चौकशी करण्यासाठी गुन्हे शाखा आणि सायबर सेलचे अधिकारी अधिक तपास करत आहेत. मेलमधील माहिती खरी मानून सुरक्षेच्या दृष्टीने आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यक त्या सर्व खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

सांगली न्यायालयातही सुरक्षा वाढवली

सांगली जिल्हा सत्र न्यायालयातही बॉम्ब ठेवला असल्याचा मेल प्राप्त झाला असून बॉम्बने न्यायालयाची इमारत उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. न्यायालयाच्या इमारतीच्या तपासणीसाठी आणि सुरक्षिततेसाठी सांगली जिल्हा पोलीस दल बॉम्बशोधक आणि एक श्वान पथकासह न्यायालयाच्या इमारतीत दाखल झाले. सर्व न्यायाधीश ,वकील आणि पक्षकार यांना न्यायालयातून तातडीने बाहेर घेण्यात आले. साधारणता दीड वाजता मेल आला असून तीन वाजून ११ मिनिटांनी न्यायालयाची इमारत उडवून देऊ असा उल्लेख मेलमध्ये आहे.

सोलापूरातही धमकीचा मेल

सांगली, सातारा न्यायालयानंतर सोलापूर जिल्हा आणि सत्र न्यायालयाला धमकीचा ईमेल आला असून न्यायालय बॉम्बने उडवून द्यायचा उल्लेख त्यात आहे. कोर्टाला ई-मेल प्राप्त होताच जिल्हा आणि सत्र न्यायालयात वरिष्ठ पोलीस अधिकारी दाखल झाले. त्यानंतर, संपूर्ण न्यायालय परिसर निर्मनुष्य करण्याचे काम पोलिसांनी केले. कोर्टातील न्यायाधीश, वकील आणि सर्व पक्षकारना कोर्टाच्या बाहेर काढण्यात आले.

परभणीतही पोलीस यंत्रणा अलर्ट

राज्यातील न्यायव्यवस्थेला हादरवणारी घटना समोर आली असून, परभणीसह राज्यातील बहुतांश जिल्हा न्यायालये बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली आहे. परभणी, हिंगोली, बीड, सांगली आणि ठाणे यासह अनेक जिल्ह्यांतील न्यायालयांना हा धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्याची माहिती आहे. या धमकीनंतर राज्यातील पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून, संबंधित जिल्हा न्यायालयांच्या परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. परभणीतही पोलिसांकडून तातडीने खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परभणीत न्यायालय परिसरात डॉग स्कॉड, बॉम्ब शोधक व नाशक पथकासह पोलिसांची विविध पथके दाखल झाली असून, न्यायालयाच्या परिसराची कसून तपासणी केली जात आहे. धमकीचा ई-मेल नेमका कोणी आणि कुठून पाठवला, याचा तपासही सुरू आहे. दरम्यान, या धमकीमुळे न्यायालयीन परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

हिंगोलीतही बॉम्बेच्या ई-मेलमुळे खळबळ

हिंगोली शहरातील जिल्हा व सत्र न्यायालयाला बॉम्बने उडून देण्याची धमकी देण्यात आली आहे, ही धमकी न्यायालयाच्या पोर्टलवरील मेल आयडीवर देण्यात आली असून सकाळी ११ वाजता हा मेल न्यायालयाकडे प्राप्त झाला आहे. या धमकीमुळे हिंगोली शहरांमध्ये खळबळ उडाली असून बॉम्बशोधक पथकाच्या वतीने संपूर्ण न्यायालयाची तपासणी करण्यात आली असून श्वान पथक हिंगोली शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी न्यायालयात दाखल झाले आहेत. पोलिसांकडून संपूर्ण इमारतीची चाचणी केली जात आहे, तर दुसरीकडे सायबर पोलिसांकडून सुद्धा संबंधित मेलच्या संदर्भात अधिक तपास केला जात आहे

बीडमध्येही खळबळ, पोलीस घटनास्थळी दाखल

बीड जिल्हा सत्र न्यायालयात बॉम्ब ठेवल्याचा ईमेल आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. त्यानंतर लगेचच जिल्हा न्यायालयाची इमारत रिकामी करण्यात आली असून जिल्हा पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी न्यायालय परिसरात दाखल झाले आहेत. बीड जिल्हा सत्र न्यायालयाच्या मेलवर बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा मेल आल्याची प्राथमिक माहिती आहे. या मेलनंतर न्यायालय परिसरात एकच खळबळ उडाली.सुरक्षेच्या कारणास्तव जिल्हा सत्र न्यायालयातील वकील पक्षकार न्यायाधीश आणि कर्मचारी संपूर्ण इमारत तातडीने रिकामी करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून तपासणी सुरू आहे. पोलीस पथकाकडून इमारतीची कसून तपासणी करण्यात येत आहे. तपासणीनंतरच याबाबतचे अधिकची माहिती समोर येणार आहे.

सायबरकडून तपास सुरू

दरम्यान, सायबर पोलिसांकडून देखील तपास सुरू आहे, यामध्ये काय तथ्य आहे तेदेखील तपासले जात असून आमचा प्रयत्न आहे की लवकरात लवकर न्यायालयाचे काम पूर्ववत सुरू व्हावे. सर्वांनी शांतता राखावी आणि न्यायालयाच्या परिसरात थांबू नये असे देखील आवाहन बीड पोलिसांकडून पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी केले आहे.

अमरावती -अकोला न्यायालयालाही

पोलिसांनी न्यायालयाच्या पाच मजल्यांवरील प्रत्येक दालनाची तपासणी सुरू केली. इमारतीचे प्रवेशद्वार बंद करून प्रत्येक कोपरा, वाहनांचे पार्किंग, संशयित बॅगांची तपासणी हाती घेण्यात आली. अग्निशमन दलाचे वाहनही घटनास्थळी दाखल झाले. अचानक सुरू झालेल्या या कारवाईमुळे न्यायालयात उपस्थित असलेल्या वकील आणि पक्षकारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. न्यायालयाच्या जवळच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि इतर शासकीय कार्यालये असल्याने या घटनेविषयी चर्चा सुरू झाली. हा ई-मेल कोणी आणि कोठून पाठवला. हा एखाद्या कटाचा भाग आहे का किंवा खोडसाळपणा, याबाबत पोलीस अथवा न्यायालय प्रशासनाकडून अद्याप कोणताही अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही. केवळ बॉम्ब ठेवण्यात आल्याचा संदेश न्यायालयाला प्राप्त झाल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. सायबर सेलच्या मदतीने सुगावा शोधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

श्रीराम फायनान्ससह बजाज

ातसंस्थांच्या वसुली पद्धतींविरोधात आक्रमक भूमिका जाहीर केली होती.

दरम्यान, आज, २ नोव्हेंबरला नांदेडमध्ये क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दोन फायनान्स कंपन्यांच्या कार्यालयांची तोडफोड केल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटना व मायक्रो फायनान्स कंपन्या समोरासमोर येणार आणि राज्यात आंदोलन पेटणार असल्याचा इशारा नेत्यांनी दिला आहे.तुपकरांनी यापूर्वी दिलेल्या इशाऱ्याची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

सराफ व्यावसायिकाचं भरदिवसा

संशयास्पद वाटत असून अनेक प्रश्नांची उत्तरे अनुत्तरीत आहे. सध्या अपहरणकर्ते पोलीस आणि युवक अनिरुद्ध शिंगणे पोलिसांच्या ताब्यात असून अधिक तपास केला जात आहे. दरम्यान, तेलंगणा पोलिसांनी कुठलीहीही माहिती न देता या युवकाला ताब्यात का घेतलं? याबद्दल आता पोलीस चौकशी करत आहेत, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी दिली.

मंत्री पंकजा मुंडेंचा

घेतला होता. मुंबईतील ग्रँड हयात येथे आयोजित बॉम्बे टाइम्स फॅशन वीकमध्ये 'वॉक फॉर अ कॉज' या कार्यक्रमात पंकजा मुंडे सहभागी झाल्या होत्या. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जबाबदार जीवनशैलीचा स्वीकार करणे आणि हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी विविध क्षेत्रांनी एकत्र येणे, हा या उपक्रमामागील उद्देश होता. यावेळी प्रमुख सीईओ, उद्योगपती आणि व्यावसायिकही एकत्र आले होते. त्यांच्या रॅम्प वॉकचे फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यांच्या या अनोख्या अंदाजाची चर्चा रंगली आहे.**रॅम्प वॉकचा उद्देश-** पंकजा मुंडे यांनी स्वतः सोशल मीडियावर पोस्ट करत या रॅम्प वॉकमागील भूमिका स्पष्ट केली आहे. 'मला मॉडेलप्रमाणे रॅम्प वॉक करायचा नव्हता, तर हॅण्डलूमला प्रोत्साहन देण्यासाठी या उपक्रमात सहभागी व्हायचे होते,' अशी भूमिका त्यांनी मांडली. यावेळी त्यांनी जालना जिल्ह्यातील स्थानिक शेतकरी आणि कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी 'जालनाई सिल्क' ही पारंपरिक हॅण्डलूम साडी परिधान केली होती.या कार्यक्रमात ्लिम, ेिले ेिम्बत म्हणजेच वस्तूंचा वापर कमी करणे, पुनर्वापर करणे आणि पुनर्चक्रण करणे या तत्त्वांवर भर देण्यात आला. तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी त्यांच्या सीएसआर उपक्रमांचा वापर हवामान बदलाचा सामना करण्यासाठी, नवीन प्रदूषण रोखण्यासाठी आणि हवा-पाण्याची स्वच्छता राखण्यासाठी करावा, असे आवाहन करण्यात आले.याच मंचावर 'जालनाई सिल्क'चा विशेष प्रचार करण्यात आला. यामुळे पर्यावरणपूरक कापडाला प्रोत्साहन मिळण्यासोबतच जालन्यातील स्थानिक शेतकरी आणि कारागिरांनाही आर्थिक बळ मिळेल, असा विश्वास पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला. उद्योग क्षेत्राचे नेतृत्व, प्रादेशिक कला आणि सार्वजनिक जनजागृती यांच्या माध्यमातून समृद्ध भविष्याच्या दिशेने पाऊल टाकण्याचा संदेशही त्यांनी दिला.

कंत्राटदारासह ८ मजुरांचा

पथके घटनास्थळी दाखल झाली. मोठ्या संख्येने ग्रामस्थही घटनास्थळी जमले होते. स्थानिक लोकांच्या मदतीने मदत आणि बचाव कार्य करण्यात आले. अपघातानंतर, बांधकाम स्थळावरील सुरक्षेच्या व्यवस्थेबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी अपघातावर शोक व्यक्त केला. एका एक्स-पोस्टमध्ये शर्मा यांनी लिहिले, 'झुंझुनू अपघातात विजेचा धक्का लागून कामगारांच्या अकाली मृत्यूची बातमी दुःखद आहे.' संबंधित अधिकाऱ्यांना जखमींवर योग्य उपचार आणि पीडित कुटुंबांना तत्काळ सर्वतोपरी मदत करण्याचे, तसेच या घटनेची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आम्ही परमेश्वराकडे प्रार्थना करतो की, दिवंगत आत्म्यांना त्याच्या चरणी स्थान मिळो, जखमींना लवकरात लवकर बरे वाटो आणि शोकाकुल कुटुंबांना हे अथांग दुःख सहन करण्याची शक्ती मिळो. ओम शांती! राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले आहे. गेहलोत यांनी सोशल मीडियावर लिहिले, 'छापोली, उदयपूरवती, झुंझुनू येथे विजेचा धक्का लागून अनेक कामगारांचा झालेला दुर्दैवी मृत्यू अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. रस्त्याच्या बांधकामादरम्यान हा अपघात कसा घडला आणि या मृत्यूंसाठी कोण जबाबदार आहे, हे निश्चित करण्यासाठी या संपूर्ण घटनेची चौकशी होणे आवश्यक आहे. या अपघातात आपल्या प्रियजनांना गमावलेल्या कुटुंबांचा विचार मन हेलावून टाकणारा आहे. सरकारने हे सुनिश्चित केले पाहिजे की मृतांच्या कुटुंबीयांना योग्य नुकसान भरपाई आणि सर्वतोपरी मदत मिळावी. परमेश्वर त्या दिवंगत आत्म्यांना आपल्या चरणी स्थान देवो आणि शोकाकुल कुटुंबांना हे असह्य दुःख सहन करण्याची शक्ती देवो.'

दुष्काळसदृश्य स्थितीत प्रशासकीय

निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पीक पाहणीचे कार्य १०० टक्के पूर्ण झाले आहे. या नुकसानीपोटी भरपाईसाठी राज्य शासनाकडे ७३४ कोटी रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यासोबतच शेतकऱ्यांकडे पुरेसे पाणी उपलब्ध असल्यास रब्बी पिक घेण्यासाठी १२ तास वीज पुरवठा देण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांनी जादा पाणी लागणारी रब्बी पिके घेऊ नयेत, याबाबत मार्गदर्शन व जनजागृती करण्यात येणार आहे.

कमी पावसामुळे जिल्ह्यातील भूजल पातळी खालावली आहे. त्यासोबतच प्रमुख जलाशयांमध्ये निम्मा पाणीसाठी उपलब्ध आहे. उपलब्ध जलसाठ्यापैकी पिण्यासाठी पाणी प्राधान्याने आरक्षित करण्यात आले आहे. मोर्शी भागात बोअरवेलची पाणी पातळी मोठ्या प्रमाणावर खाली गेल्याने या भागात नव्या बोअरवेलला परवानगी दिली जाणार नाही. निकामी झालेल्या बोअरवेलचे पुनरूज्जीवन करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात येणार आहे.भूजल सर्वेक्षण विभागाने भूजल पातळी वाढवण्यासाठी १ हजार ७०० रिचार्ज शाफ्टची कामे सुचविली आहे. तसेच व्हीबी जी राम जी मधून १ हजार ८०० जलसंधारणाची कामे करण्यात येणार आहे. तसेच ४२ हजार जलतारा खड्डे खोदण्यात येणार आहे. दुष्काळाशी निगडीत ११ विभागांच्या समन्वयासाठी 'डिस्ट्रिक्ट कनेक्ट ॲप' सुरू करण्यात आले आहे. यातून क्षेत्रिय स्तरावरील यंत्रणांना कामाची माहिती देण्यात येत आहे. तसेच दुष्काळी परिस्थितीची यंत्रणांना जाणिव व्हावी, यासाठी एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. दुष्काळ निवारणासाठी सर्व विभागांनी एकत्र येऊन गावाचा विकास आराखडा तयार करावा. तसेच धाराशिव जिल्ह्याच्या पॅटर्नचा अभ्यास करून प्रभावी अंमलबजावणी करावी.वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतून २० कोटी रुपये देण्यात आले आहेत. विजेची समस्या सोडविण्यासाठी महावितरणच्या मुख्य अभियंत्यांनी दर महिन्याला लोकप्रतिनिधींची बैठक घ्यावी. प्रत्येक गावात ग्राम विद्युत व्यवस्थापक नेमण्यात यावा. त्यांना महावितरणच्या सहायाने प्रशिक्षण देण्यात यावे. यामुळे गावातील वीज पुरवठा सुरळीत राहण्यासाठी मदत होणार आहे. येत्या काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणार असल्याने ७५ टक्के काम पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करावीत. याठिकाणी वीज जोडणी देऊन गावातील पाणीपुरवठा सुरू करावा. तसेच सार्वजनिक विहिरीची देखभाल दुरूस्ती करून या विहिरीतून आवश्यकता भासल्यास पाणीपुरवठा करण्यात यावा.आमदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समन्वय समिती आहे. या समितीची बैठक नियमित घेऊन आमदारांनी स्थानिक प्रश्न मार्गी लावावे. प्रामुख्याने येत्या समितीच्या बैठकांमध्ये गावाचा विकास आराखडा तयार करावा. आराखडा तयार करताना जलसंधारणाची कामे प्राधान्याने घ्यावी. तसेच नळ योजना असलेल्या भागात पाणी गळती शोधून त्यावर उपाययोजना करावी. तसेच आवश्यक तेवढेच पाणी पुरवठा करण्याचे धोरण आखण्यात यावे. वापर आणि विनावापर विहिरींची दुरूस्ती करून तयार ठेवाव्यात, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी मांडलेले प्रश्न प्राधान्याने सोडवून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्ह्यातील दुष्काळाच्या स्थितीची माहिती दिली.

कळाशी येथील सुबोध विद्यालयात

देशी दारूच्या रिकाम्या बॉटला टाकण्यात आल्याचा प्रकार समोर आल्याने विद्यालय परिसरासह गावात खळबळ उडाली होती. गावातील अवैध देशी दारू विक्रेत्यांकडून दर्यापूर पोलिसांना हप्ता दिल्या जाते. त्यामुळे पोलीस यावर कुठलीही कार्यवाही करीत नाहीत असा गंभीर व थेट आरोप सुद्धा ग्रामस्थांनी पोलिसांसमोरच केला होता. गावातील अवैध दारू बंद न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आता कळाशी येथील ग्रामस्थांनी पोलिसांना दिला होता.तरी सुध्दा दारू विक्री नेहमी प्रमाणे चालूच आहे. सुबोध विद्यालय कळाशी येथील अध्यक्ष व सदस्य यांनी यावर अजून पर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही.

अवैध सावकारीविरोधात अमरावती,

तीन ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. ३० ऑक्टोबर रोजी तीन स्वतंत्र पथकांनी नांदगाव खंडेश्वर आणि अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील बाभूळगाव जहांगीर येथे ही कारवाई केली. या कारवाईदरम्यान एका ठिकाणाहून अवैध सावकारीशी संबंधित १३ संशयास्पद दस्तऐवज जप्त करण्यात आले, तर अन्य दोन ठिकाणी आक्षेपार्ह कागदपत्रे आढळली नाहीत. ☞(पान २ वर)

नांदगाव खंडेश्वर येथील सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम ३(२) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन यांनी यासाठी तीन स्वतंत्र पथकांची नियुक्ती केली होती.

पहिल्या पथकाने सहायक निबंधक अनिरुद्ध राऊत यांच्या नेतृत्वाखाली नांदगाव खंडेश्वर येथील बुधवारा चौकातील शुभम ज्वेलर्सचे संचालक श्रीकृष्ण विठ्ठलराव सोलंके यांच्या प्रतिष्ठानावर दुपारी १२.५५ ते ३.४० या वेळेत झाडाझडती घेतली. मात्र, या तपासणीत कोणतेही संशयास्पद दस्तऐवज आढळले नाहीत. दुसऱ्या पथकाने सहायक निबंधक सचिन पतंगे यांच्या नेतृत्वाखाली श्रीकृष्ण सोलंके यांच्या निवासस्थानी सकाळी ११.३५ ते दुपारी २.१० वाजेपर्यंत तपासणी केली. या झाडाझडतीदरम्यान अवैध सावकारीशी संबंधित १३ संशयास्पद दस्तऐवज आढळून आले. पथकाने हे दस्तऐवज जप्त करून सीलबंद केले.

सरकारची १२ तास वीज देण्याची

विस्कळीत झाला आहे. वारंवार तक्रारी करूनही महावितरण प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

या सर्व गंभीर समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी माजी आमदार प्रा. वीरेन्द्र जगताप यांनी महावितरण प्रशासनाला निवेदन दिले आहे. यामध्ये खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. निमगव्हाण (राघोते शेत) येथील ६३ ब्ह ची डी.पी. बदलून तातडीने १०० ब्ह ची डी.पी. बसवून वीज पुरवठा सुरळीत करणे. सातेफळ वैरागळे येथील डी.टी.सी. वीज पुरवठा २ दिवसांत सुरळीत करून ८ तास नियमित वीज पुरवठा उपलब्ध करून देणे. शासनाच्या १२ तास वीज पुरवठ्याच्या घोषणेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे.

जर महावितरण प्रशासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक कार्यवाही करून वीज पुरवठा सुरळीत केला नाही, तर माजी आमदार प्रा. वीरेन्द्र जगताप यांच्या नेतृत्वाखाली सातेफळ, निमगव्हाण, जावरा येथील शेतकरी आणि चांदूर रेल्वे शहरातील व्यापारी व नागरिक महावितरण कार्यालयात 'ठिय्या आंदोलन' छेडतील, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या सर्व परिस्थितीची जबाबदारी प्रशासनाची राहील. या आंदोलनामध्ये राजेंद्र शेळके, दत्ता भुयार, संदीप चौधरी, दिनेश राधोते सागर जुमडे, शिट्टू दादा सूर्यवंशी, प्रतीक भैसे, सारंग देशमुख, श्रीनिवास सूर्यवंशी, स्वप्निल मानकर, शरद घासले, वैभव मलवार,सतीश देशमुख, पंकज मेश्राम, गजानन शेळके, गजानन महल्ले, शंकरराव आंबटकर, संजय वानखडे, नितीन चौधरी, राजू गावंडे, रितेश शेळके, प्रवीण गजभिये, आशिष गावंडे, मकेश्वर, अनिल गजभिये, अतुल डुकरे, गोपाल शेंडे, धनराज आंबेडकर, अश्विन शेळके, अमोल शेळके मनोज डुकरे, किशोर डुकरे, रामकृष्ण तिजारे, प्रमोद वनवे आदि उपस्थित होते.

दुष्काळ मदत निधीची शेतकऱ्यांना

दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मदतीची नितांत गरज आहे. केवळ घोषणा करून चालणार नाही, तर त्या घोषणांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने दुष्काळ निधी व प्रोत्साहनपर निधीबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करून निधी वितरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

घोषणांनंतर आता प्रत्यक्ष मदतीची प्रतीक्षा असून, बळीराजाला दिलासा देण्यासाठी शासन नेमकी कधी पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुलाच्या पाण्यात बुडून

पुलाच्या सलाख्यांमध्ये अडकल्यामुळे त्याला बाहेर निघता आले नाही. त्यामुळे यातच बुडून त्याचा मृत्यू झाला.

या दुर्घटनेस बांधकाम विभागाचा गलथान कारभार कारणीभूत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. या प्रकरणी ब्राह्मणवाडा पोलीस स्टेशनमध्ये मर्ग दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पीएसआय भुमेश्वर तायडे, मंगेश मस्के व मरस कोल्हे करीत आहेत.

कर्ज पुनर्वित्त मोहिमेत अमरावती जिल्हा

जिल्ह्यात १८ टक्के, तर जालना जिल्ह्यात १४ टक्के कर्ज पुनर्वित्ताची नोंद झाली आहे.

कृषी कर्जवाटपाच्या बाबतीतही अमरावती जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. जिल्ह्याने निर्धारित उद्दिष्टाच्या ८१ टक्के कृषी कर्जवाटप पूर्ण केले असून, राज्याची सरासरी ५२ टक्के आहे. राज्यातील एकूण ३६ जिल्ह्यांमध्ये अमरावती जिल्ह्याने अग्रस्थान प्राप्त केले आहे.या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी बँक प्रतिनिधी व संबंधित यंत्रणांच्या बैठका घेऊन कर्ज पुनर्वित्त आणि पीक कर्जवाटपाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेतला. पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक निर्देश, बँकनिहाय कामगिरीचा पाठपुरावा आणि प्रशासकीय समन्वय यांवर विशेष भर देण्यात आला. या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मोहिमेला गती मिळून जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालकमंत्री यांच्या हस्ते बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा आणि स्टेट बँक ऑफ इंडिया या पाच बँकांचा गौरव करण्यात आला.तसेच, उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आलेल्या शाखा व्यवस्थापकांमध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडिया, भंडारज शाखेचे शाखा व्यवस्थापक महेंद्र सपकाळ, बँक ऑफ महाराष्ट्र, लोणी टाकळी शाखेचे शाखा व्यवस्थापक प्रफुल्ल शेंडे आणि स्टेट बँक ऑफ इंडिया, अंजनगाव सुर्जी शाखेचे शाखा व्यवस्थापक सचिन कासबे यांचा समावेश आहे.

दर्यापूरात रेल्वे फाटकाजवळ आढळला

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुढील तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे. सदर वृद्धाचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. हा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याचे गूढ शवविच्छेदन अहवाल व पुढील तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.दर्यापूर पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करीत असून, पुढील तपासात काय माहिती समोर येते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

विद्यापीठाचे कामकाज ९

सुरू राहतील, याची सर्वसंबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

शेतामधून ३ क्विंटल सोयाबीन

शेतामधील कांदा चाळीमध्येच वाळविण्यासाठी ठेवले होते. ३० ऑक्टोबरला ठाकरे सकाळी ११ वाजता शेतात गेले आणि एक वाजता शेतातून परत आले तेव्हा सोयाबीन व्यवस्थित होते परंतु दुसऱ्या दिवशी ३१ ऑक्टोंबर ला सात वाजताच्या दरम्यान शेतातील कांदा चाळीचे गेट उघडे होते आणि वाळू घातलेले सोयाबीन कमी दिसत आहे, असे शेतातील सोकाऱ्याने विजय ठाकरे यांना फोनवरून सांगितले. तेव्हा शेतामध्ये जाऊन पाहिले असता पाच कट्टे सोयाबीन अंदाजे ३ क्विंटल बाजार भाव प्रमाणे सरासरी २०००० रुपये चा माल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे दिसून आले. या घटनेची तक्रार नांदगाव पोलीस स्टेशनला विजय ठाकरे यांनी दाखल केली.

चिपर्डा येथून रात्री अवैध वाळूची

तस्करांच्या चोरट्या मार्गाला आळा घालून शासनाचे लाखो रुपयाचे होत असलेले नुकसान थांबविण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

फायनान्स कंपनीकडून जळका

कुटुंबाला बाहेर काढताना घरातील खाण्यापिण्याचे सामान, धान्य, शेतीचे औषध व खत तसेच जनावरांचे साहित्यही आतच ठेवू दिले नंतर काही साहित्य काढू दिले. परिणामी, थंडीच्या दिवसात उघड्यावर संसार थाटण्याची वेळ या शेतकरी कुटुंबावर आली असून गरोदर महिला व वृद्ध आई- वडिलांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यांच्या दैनंदिन जीवनावर तसेच मानसिक दृष्ट्या सुद्धा पुष्कळ परिणाम झाला आहे. या दुष्काळी परिस्थितीत प्रशासनाने शेतकऱ्यांना मदत करण्या ऐवजी या फायनान्स कंपनीला पोलीस प्रोटेक्शन देऊन शेतकऱ्यांचे घर सील करण्याचे काम सुरु आहे. या गोष्टीची सामान्य जनतेमध्ये प्रचंड चीड निर्माण होत आहे. त्वरित संबधीत फायनान्स कंपनीवर कार्यवाही करुन शेतकरी कुटुंबाला न्याय द्यावा व त्यांना त्यांच्या उघड्यावर असणारा संसार त्यांच्या घरकुलाला लावलेले सील काढून सुखरूप सुरु करुन द्यावा ही मागणी प्रशासणाकडे करण्यात येत आहे. संबंधित फायनान्स कंपनीवर सुद्धा कार्यवाही ची मागणी केली आहे. कारण ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा त्यांच्या साधेपणाचा किंबहुना त्यांच्या कमी माहिती असण्याचा फायदा भरमसाठ व्याज स्वरूपात अशा प्रकारे जोर जबरदस्तीने या फायनान्स कंपनीचे एजन्ट व बाहेर राज्यातील फायनान्स कंपनी घेत असल्याचा दावा माजी सरपंच पराग राऊत यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाने यांच्यावर निर्बंध आणून कठोर कार्यवाही करावी व गरीब शेतकरी कुटुंबाला न्याय द्यावा ही मागणी प्रशासन व सरकारकडे केली.

कंत्राटदारांनी केली सरकारची

भोजनही करवण्यात आले. संघटनेने यापूर्वीच महाराष्ट्र सरकारला 'निधन' झाल्याचे घोषित करून ११ ऑक्टोबरला सरकारच्या प्रतीकात्मक निधनाची आणि २ नोव्हेंबरला तेरवी साजरी केली जाईल, असे जाहीर केले होते. या दरम्यान कंत्राटदारांनी 'कामाच्या उद्घाटनाला नेत्यांची घाई, कंत्राटदाराच्या बिलाला पैसाच नाही'. त्यांनी कामाचे उद्घाटन करण्यासाठी नेत्यांमध्ये जल्लोष असल्याचे, पण ठेकेदारांचे बिल थकल्याचे आणि पैसे मिळत नसल्याचे पोस्टरवर 'काम पूर्ण झाले तर' असे लिहिले होते. कंत्राटदार संघटनांच्या मते, राज्यातील विविध विभागांमध्ये विकास कामांसाठी हजारो कोटी रुपयांची बिले दीर्घ काळापासून प्रलंबित आहेत. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे २९ हजार कोटी रुपये, जलजीवन मिशनचे २८ हजार कोटी, आदिवासी विकास विभागाचे १२ हजार कोटी, ग्रामविकास विभागाचे ३,५०० कोटी आणि पर्यटन विभागाचे २,३०० कोटी रुपये प्रलंबित आहेत. याशिवाय इतर विभाग, जलसंपदा, जलसंधारण आणि नगरविकास विभागांच्या मोठ्या प्रमाणात थकबाकी असल्याचा दावा केला जात आहे. आंदोलन करणाऱ्यांमध्ये उज्वल पांडे, राहुल मुराई, अश्विन पवार, अर्जुन खडसे, परवेज अली, प्रतीक लोंढे, यश तायडे सह अभियंता व कंत्राटदारांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

नागपूरच्या 'लोकतंत्र बचाव, अराजकता हटाव' पदयात्रेसाठी भाजपची जय्यत तयारी!

हजारो कार्यकर्त्यांच्या सहभागाचे नियोजन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

लोकशाही मूल्यांचे जतन, संविधानिक व्यवस्थेचा सन्मान आणि राष्ट्रहिताच्या विचारांची जपणूक करण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पार्टीच्या वतीने गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी नागपूर येथे भव्य ङ्क'लोकतंत्र बचाव, अराजकता हटाव' पदयात्रा व रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीच्या पूर्वतयारीसाठी भाजपा वाशिम शहर मंडळ, वाशिम तालुका मंडळ आणि अनसिंग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महत्त्वपूर्ण चर्चासत्र व नियोजन बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

भाजपा विदर्भ संयोजक प्रा. दिनेश सूर्यवंशी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या बैठकीला भाजपा वाशिम जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमजी चितलांगे, वाशिम-मंगरूळनाथ विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्यामभाऊ खोडे, वाशिमचे नगराध्यक्ष अनिलजी केंदळे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, गटनेते, तिन्ही मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी, विविध मोर्चाचे प्रतिनिधी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी प्रा. दिनेश सूर्यवंशी यांनी आगामी पदयात्रेची भूमिका, उद्दिष्टे आणि संघटनात्मक जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांनीही आपले विचार मांडत लोकशाही व्यवस्थेतील शांततापूर्ण आंदोलनाचे महत्त्व, संघटनेची एकजूट आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागावर भर दिला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण, प्रदेश महामंत्री आमदार डॉ. संजयजी कुटे यांच्यासह राज्यातील अनेक वरिष्ठ नेते, लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात नागपूर येथे ही भव्य पदयात्रा होणार आहे. या पदयात्रेत वाशिम जिल्ह्याचा व्यापक सहभाग नोंदविण्यासाठी बैठकीत सविस्तर नियोजन करण्यात आले. वाशिम शहर, वाशिम तालुका आणि अनसिंग मंडळातील सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांना एकत्रितपणे नागपूर येथे घेऊन जाणे, प्रवास व्यवस्था, उपस्थिती आणि विविध जबाबदाऱ्यांचे नियोजन यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक वाटचाल ही केवळ राजकीय विस्तारापुरती मर्यादित नसून राष्ट्रनिर्माण, सुशासन, विकास आणि जनकल्याणाच्या व्यापक ध्येयाशी जोडलेली आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताला जागतिक स्तरावर प्रगतीच्या नव्या शिखरावर नेण्याचा संकल्प आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला विकासाच्या प्रगतीपथावर अग्रेसर ठेवण्याची कटिबद्धता पक्षाच्या कार्यातून सातत्याने अधोरेखित होत आहे.

शहर, तालुका व अनसिंग मंडळाची संयुक्त नियोजन बैठक

पदयात्रेचा तपशील :
दिनांक : गुरुवार, ५ नोव्हेंबर २०२६
वेळ : दुपारी ३.०० वाजता
स्थळ : यशवंत स्टेडियम ते मानस चौक, नागपूर
आयोजन : लोकतंत्र बचाव, अराजकता हटाव पदयात्रा व रॅली

गोशाळेतील पशूंना प्रतिदिवस शंभर रुपये अनुदानाची मागणी

गोशाळा महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

गोशाळेतील पशूंना प्रतिदिवस शंभर रुपये अनुदान देण्यात यावे अशी मागणी गोशाळा महासंघाच्या वतीने सोमवार दि. २ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

अपुऱ्या पावसामुळे संपूर्ण राज्यात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असून राज्यातील सर्व गोशाळेतील पशुंना प्रति दिवस प्रति पशु शंभर रुपये चारा अनुदान मिळण्याबाबत

गोशाळा महासंघाच्या वतीने जिल्यातील सर्व गोशाळा संचालक व पशुपालकांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे.राज्य शासनाने कोरडा दुष्काळ जाहीर केलेला आहे.राज्य शासनाकडे एक हजारच्यावर गोशाळा नोंदणीकृत असून त्यामधील संपूर्ण पशूना चारा व पिण्याच्या पाणीसाठी प्रति दिन प्रति पशु शंभर रुपये प्रमाणे अनुदान द्यावे असे म्हटले आहे.

शासनाने दुष्काळ जाहीर केलेला असला तरी गोशाळा व शेतकऱ्यांकडील पशुधनाचे वास्तव अत्यंत विदारक आहे.पाऊस कमी झाल्याने शेतात पशु चारा, कडबा व कुटार उपलब्ध नाही तसेच पडीत जमीन, डोंगर व जंगलातील चारा उगवला नाही. चाऱ्याचे भाव गगनाला भिडले आहेत.तसेच चाऱ्याचा मोठा साठा शासनाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे पशुंच्या चारा संदर्भात मोठी समस्या भविष्यात निर्माण होणार आहे. पाऊस अत्यंत कमी आल्याने विहीर, बोर, तलावे, धरणे यांच्या पाण्याची पातळी सुद्धा अत्यंत कमी झालेली आहे.भविष्यात गोशाळेतील पशुंना टँकरद्वारे पाणी पाजण्याची वेळ येऊ शकते याबाबींचा गांभीर्याने विचार करणे आत्यावश्यक झाले आहे. राज्य सरकारने ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येक गावात चारा डेपो सुद्धा निर्माण करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.सध्याच्या दुष्काळ परिस्थितीत शेतकऱ्याकडील पशुधन मोठ्या प्रमाणात गोशाळेत आणून देत असल्याने त्या पशुधनाचा स्वीकार गोशाळा करीत आहे.त्यामुळे गोशाळामध्ये क्षमते पेक्षा जास्त गोवंश गोळा झाले आहे. दुष्काळ परिस्थिती निर्माण झाल्यामुळे काही शेतकऱ्यांना आपले स्वतःचे पोट भरणे कठीण झाले आहे. अशा वेळेस काही शेतकरी आपला गोवंश विक्री करीत आहे साहजिकच खरेदी करणारे शेतकरी नसून असा गोवंश मोठ्या प्रमाणात कत्तलीसाठी ना इलाजाने जात आहे. महाराष्ट्रात संपूर्ण गोवंश हत्याबंदीचा कायदा आहे. शासनाने गोमातेला राज्य मातेला दर्जा दिला आहे. गोवंश कत्तलीसाठी जाणारी गाडी गोरक्षकाने पकडली तर महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

या दुष्काळ परिस्थितीमध्ये आम्ही सर्व संचालक व पशुपालक आपणास विनंती करतो की आपल्या मार्फत आमच्या मागण्या मुख्यमंत्री यांच्यापर्यंत पोहोचवावी व पशुंच्या चारा पाणी करिता शासनाने शंभर रुपये प्रति दिवस प्रति पशु प्रमाणे अनुदान तत्काळ जाहीर करावे अशी मागणी केली आहे.सदर निवेदनावर जिल्ह्यातील गोशाळा चालकांनी तसेच गोशाळा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केली आहे.

स्व.पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरी



■ प्रतिनिधी | रिसोड ■

स्थानिक स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम.एन.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.एम.एन. गायकवाड यांनी अश्विन पौर्णिमेला ऋषी वाल्मिकी यांचा जन्म झाला. जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यात असलेले वालझरी हे गाव महर्षी वाल्मीकी ऋषींचे जन्मस्थान मानले जाते. वाल्मिकी रामायणाचे रचनाकार म्हणून प्रख्यात असलेले ऋषी होते. रामायण एक महाकाव्य आहे जे श्रीराम यांच्या जीवनातून आपणास जीवनातील सत्य, कर्तव्य, साहस यांचा परिचय देते आणि आदर्श जीवन जगण्यास मार्गदर्शन करते. त्यांनी संस्कृत भाषेत रामायणाची रचना केली. त्यांनी लिहिलेले रामायण हे संस्कृत भाषेतील सर्वप्रथम महाकाव्य मानले जाते.

लोकसहभागातून कार्ली येथे वनराई बंधाऱ्याची निर्मिती

'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहिमेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; भूजल पुनर्भरणासाठी पुढाकार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करण्यासोबतच भूजल पातळीत वाढ व्हावी आणि पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविण्यास प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, वाशिम यांच्या पुढाकारातून नुकतेच वाशिम कार्ली गावालगतच्या नाल्यावर लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली.

' भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे येथील आयुक्त रवींद्र खेबूडकर यांच्या संकल्पनेतून तसेच अमरावती विभागाचे उपसंचालक चंद्रकांत भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयाच्या वतीने सरपंच व्ही. व्ही. माके, ग्रामपंचायत अधिकारी विनोद बोरकर आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने श्रमदानातून बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. यावेळी वरिष्ठ भूवैज्ञानिक वैभव श्रीरामे, सहायक भूवैज्ञानिक क्षितिज सोनटक्के, कनिष्ठ भूवैज्ञानिक सौरभ मोटघरे यांच्यासह कार्यालयातील कर्मचारी आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या उपक्रमामुळे जलसंधारणासोबतच भूजल पुनर्भरणाचे महत्त्व ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आले. लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी अशा प्रकारच्या जलसंधारणाच्या उपाययोजना उपयुक्त ठरू शकतात.पाणी अडवा, पाणी जिरवा' या मोहिमेअंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणाचा संदेश देण्यात आला.

गोरबंजारा समाजाला आरक्षणासाठी अधिवेशनात मुद्दा लावून धरणार; आ. श्याम खोडे यांचे आश्वासन



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

गोरबंजारा समाज अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाचे सर्व संवैधानिक निकष पूर्ण करतो, तरीही महाराष्ट्रात त्यांना न्याय मिळत नाही. हा प्रलंबित प्रश्न आगामी हिवाळी अधिवेशनात उपस्थित करून शासन दरबारी सकारात्मक भूमिका मांडणार असल्याचे आश्वासन आमदार श्याम खोडे यांनी दिले.

आज दि. ३१ ऑक्टोबर रोजी गोरसेना सामाजिक संघटनेच्या मंगरुळपीर तालुका पदाधिकाऱ्यांनी आमदार खोडे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आमदार खोडे म्हणाले की, गोरबंजारा समाजाच्या न्याय्य मागणीसाठी मी अधिवेशनात आवाज उठवीन.गोरसेनेचे ज्येष्ठ पदाधिकारी अनिल राठोड, यांचे सह माजी जि. प.स.राजेश जाधव, माजी पं. स.उपसभापती राजेश राठोड, भारतीय जनता पक्षाचे राजेश चव्हाण, माणिक चव्हाण, कमल राठोड, संजय राठोड, काही शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.गोरसेनेने वाशिम जिल्ह्यातून या मोहिमेची सुरुवात केली असून, येत्या दिवसांत महाराष्ट्रातील सर्व मंत्री, आमदार, खासदार यांना हे निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती गोरसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

वसुबारस निमित्त चारा व पाणी मदतीचे संस्थेचे भावनिक आवाहन

५ नोव्हेंबरला गोवत्स द्वादशी महोत्सव; गोपूजनासोबत गोसेवेचा संकल्प करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

दुष्काळाच्या तीव्र झळा आता मुक्या जनावरांनाही सोसाव्या लागत असून, कारंजा येथील श्री पांजरापोळ संस्थेच्या गोशाळेतील सुमारे ४५० गोवंशांसमोर चारा आणि पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत वसुबारस अर्थात गोवत्स द्वादशीच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधून गोमातेच्या पूजनासोबतच तिच्या संवर्धनासाठी समाजाने पुढाकार घ्यावा, असे भावनिक आवाहन श्री पांजरापोळ संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. गोशाळेतील ४५० गोवंशांना दररोज प्रत्येकी ५० लिटर पाण्याची आवश्यकता असून, त्यासाठी दररोज सुमारे २२ हजार ५०० लिटर पाण्याची गरज भासत आहे. मात्र, भीषण दुष्काळामुळे गोशाळेतील चारा संपत चालला असून पिण्याच्या पाण्याचीही तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. पोटाची आग आणि पाण्याची तहान यामुळे मुक्या जनावरांची होणारी परवड पाहता त्यांना मदतीचा हात देणे ही केवळ संस्थेची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याची भावना संस्थेने व्यक्त केली आहे.

याच पार्श्वभूमीवर गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी श्री पांजरापोळ संस्था, कारंजा यांच्या वतीने वसुबारस - गोवत्स द्वादशी महोत्सव २०२६ आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात सकाळी ९ वाजता गोपूजन, गोपरिक्रमा व गोघास अर्पण, तर सकाळी १० वाजता महाआरती होणार आहे. हा धार्मिक सोहळा श्री पांजरापोळ संस्था, महावितरण सबस्टेशनसमोर, मूर्तिजापूर रोड, कारंजा येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमास परिसरातील गोप्रेमी नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष ब्रिजमोहन मालपाणी सचिव आशिष तांबोळकर तसेच विश्वस्त मंडळ यांनी केले आहे

पी.एम. किसान उत्सव दिनानिमित्त कृषी विज्ञान केंद्रात शेतकऱ्यांना शास्त्रीय मार्गदर्शन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजनेच्या २४ व्या हप्त्याचे वितरण मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते कृषी विज्ञान केंद्र, सुरत व भावनगर, गुजरात येथील कार्यक्रमातून करण्यात आले. या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी 'पी.एम. किसान उत्सव दिवस' तसेच कृषी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी करडा गावचे सरपंच गजानन गंभीरराव देशमुख होते, तर उद्घाटक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. डी. एन. इंगोले उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. एस. के. देशमुख, आर. एस. डवरे, टी. एस. देशमुख, मयूर देशमुख, शुभांगी वाटाणे तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक एस. आर. माने, प्रा. एल. बी. काळे व प्रा. आर. पी. बोरकर उपस्थित होते.

वेदनामुक्त, सन्मानपूर्ण जीवनासाठी उपशामक सेवा महत्त्वाची

जिल्हा रुग्णालयात जागतिक उपशामक सेवा दिवस उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

गंभीर व दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त रुग्णांना शारीरिक वेदनांपासून आराम देण्यासोबतच मानसिक, सामाजिक आणि भावनिक आधार देणे आवश्यक आहे. रुग्णांना सन्मानाने आणि शक्य तितके आरामदायी जीवन जगता यावे, हा उपशामक सेवेचा मुख्य उद्देश असल्याचे प्रतिपादन औषधोपचार तज्ज्ञ डॉ. बंग यांनी केले.

जागतिक उपशामक सेवा दिनानिमित्त जिल्हा रुग्णालय, वाशिम येथे राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण (एनसीडी) बाह्यरुग्ण विभागासमोर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगीता वारकरी यांनी केले. त्यांनी उपशामक सेवेचे महत्त्व आणि स्वरूप याविषयी माहिती दिली. उपशामक सेवा विभागाचे नोडल अधिकारी कीर्तनकर यांनी अंथरुणाला खिळलेल्या रुग्णांची काळजी कशी घ्यावी, त्यांची दैनंदिन देखभाल करताना काळजीवाहकांनी कोणती दक्षता घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. बंग यांनी उपशामक सेवेची संकल्पना स्पष्ट करताना, गंभीर व दीर्घकालीन आजारांमुळे त्रस्त असलेल्या रुग्णांना वेदनांपासून आराम मिळण्याबरोबरच मानसिक, सामाजिक व भावनिक आधार देण्याचे महत्त्व विशद केले. रुग्णालयात उपचारांसाठी येणे शक्य नसलेल्या रुग्णांच्या घरी जिल्हा रुग्णालयाचे उपशामक सेवा पथक भेट देऊन आवश्यक सेवा व मार्गदर्शन पुरविते, अशी माहितीही त्यांनी दिली.

Change In Name

My old name is **AFROZA BI VILAYAT KHA** Which now I am changing as new name **AFROZA BEGAM SHABBIR KHAN** hence for my all correspondence will be done as per my new name please consider the same
Residential address:
SADIQUE NAGAR, TQ. BARSHITAKLI DIST. AKOLA MAHARASHTRA 444401
Mobile no. 9420101281

अन्नकूटस्नेह मिलन समितीच्या बैठकीला भव्य प्रतिसाद; १० नोव्हेंबरला भव्य प्रसादीचे आयोजन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दरवर्षीप्रमाणे दिवाळीनंतर राजस्थानी समाजामध्ये अन्नकूट स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. स्थानिक महेश भवन येथे एक नोव्हेंबर रोजी अन्नकुट स्नेह मिलन समितीच्या वतीने आयोजित बैठकीला सर्व समाज बांधवांनी भव्य प्रतिसाद दिला यावेळी सर्वानुमते १० नोव्हेंबर रोजी भव्यप्रसादीचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले.

सर्वप्रथम बैठकीमध्ये मागील वर्षीचा लेखाजोखा सादर करण्यात आला. यावेळी काही ठरावही घेण्यात आले. आगामी जल संकट लक्षात घेता त्यावरही चर्चा करण्यात आली. पाणी बचतीचा संदेश घरोघरी पोहोचवण्याचा निर्धार व संकल्प करण्यात आला. छप्पन भोग प्रसादी सोबत अन्य बाबीवर साधक बाधक चर्चा झाली यावेळी राजस्थानी समाजातील प्रत्येक घटकाची आवर्जून उपस्थिती होती.

चिमुकल्यांनी घेतली फटाके न फोडण्याची शपथ!

राष्ट्रीय हरित सेना, एस. एम. सी. इंग्लिश स्कूलचा पर्यावरणपूरक दिवाळीसाठी अभिनव उपक्रम



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दिवाळीचा आनंद फटाक्यांच्या आतषबाजीत नव्हे, तर निसर्गाच्या सान्निध्यात आणि पर्यावरणाच्या संरक्षणात आहे, हा संदेश देत राष्ट्रीय हरित सेना, एस. एम. सी. इंग्लिश स्कूल, वाशिमच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला. विद्यार्थ्यांनी फटाके न फोडण्याची शपथ घेत समाजासमोर पर्यावरण संवर्धनाचा आदर्श ठेवला.

दिवाळी हा आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण असला, तरी फटाक्यांच्या अतिवापरामुळे मोठ्या प्रमाणात वायू व ध्वनिप्रदूषण निर्माण होते. फटाक्यांमधून बाहेर पडणारे विषारी घटक मानवी आरोग्यासाठी घातक ठरतात. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच पशुपक्ष्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. फटाक्यांच्या निर्मितीमध्ये बालकामगारांचे होणारे शोषण आणि फटाके फोडताना घडणारे अपघात यांविषयीही विद्यार्थ्यांना जाणीव करून देण्यात आली.

या पार्श्वभूमीवर प्राचार्य मीना उबगडे व राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेतली. फटाक्यांवर होणारा अनावश्यक खर्च टाळून मिठाई, फराळ, आवडीची पुस्तके, किल्ले, आकर्षक रांगोळ्या, आकाशकंदील आणि भेटवस्तूंच्या माध्यमातून दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याचे आवाहनही विद्यार्थ्यांनी केले.

'फटाके नकोत, प्रदूषण नको; हवी आनंदाची आणि प्रकाशाची दिवाळी!' असा पर्यावरण संवर्धनाचा संदेश या चिमुकल्यांनी समाजाला दिला. केवळ शपथ न घेता प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण रक्षणाचा आदर्श निर्माण करणारा राष्ट्रीय हरित सेनेचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी केले. हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी उत्स्फूर्त सहकार्य केले.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३३६ ■ मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

वर्धा न्यायालय बॉम्बने उडवून देऊ: न्यायालयाला धमकीचा मेल

ई-मेल मिळताच पोलीस अन् गुप्तचर यंत्रणा सतर्क

बॉम्बशोधक व नाशक पथकाकडून तपासणी, न्यायालय परिसरात कडेकोट बंदोबस्त

वर्धा जनमाध्यम : वर्धा येथील जिल्हा न्यायालयाला सोमवारी दुपारी ई-मेलद्वारे बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि गुप्तचर यंत्रणा सतर्क झाल्या. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांच्या विविध पथकांनी तातडीने न्यायालय परिसरात धाव घेत तपासणी सुरू केली. तसेच न्यायालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. दरम्यान, धमकीचा ई-मेल कोणी आणि कुठून पाठविला, याचा तांत्रिक तपास पोलिसांकडून सुरू करण्यात आला आहे.

सोमवारी जिल्हा न्यायालयाचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरू असताना न्यायालयाच्या अधिकृत ई-मेलवर अज्ञात व्यक्तीकडून धमकीचा संदेश प्राप्त झाला. या संदेशातून न्यायालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली. दुपारी सुमारे १.१० वाजताच्या सुमारास याबाबत वर्धा शहर पोलिसांना माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी न्यायालय परिसर गाठले. त्यानंतर बॉम्बशोधक व नाशक पथक (बीडीडीएस), श्वानपथक, फॉरेन्सिक पथक आणि सायबर सेलच्या पथकांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

सुरक्षेच्या दृष्टीने न्यायालय परिसराची कसून तपासणी करण्यात आली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे न्यायालयातील वकील, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मात्र, धमकीचा ई-मेल नेमका कोणी आणि कोणत्या ठिकाणाहून पाठविला, याची तातडीने पुष्टी होऊ शकली नाही.



तांत्रिक तपासानंतरच चित्र स्पष्ट होणार

सोमवारी दुपारी सुमारे १.१० वाजता न्यायालयाकडून पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना केल्या. धमकीचा ई-मेल कोणत्या नावाने आणि कुठून पाठविण्यात आला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, तांत्रिक तपास पूर्ण झाल्यानंतरच संपूर्ण परिस्थिती स्पष्ट होईल. नागरिकांनी सध्या घाबरण्याची आवश्यकता नसल्याचे वर्धा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागेशकुमार चतरकर यांनी सांगितले.

राज्यातील न्यायालयांना एकाच वेळी धमकीचे सत्र

वर्ध्यातील घटनेचे गांभीर्य अधिक वाढले ते राज्यातील इतर जिल्ह्यांमधून समोर आलेल्या अशाच घटनांमुळे. सातारा, सोलापूर, ठाणे, बीड, रत्नागिरी, परभणी आणि हिंगोली येथील जिल्हा व सत्र न्यायालयांनाही बॉम्बने उडवून देण्याचे धमकीचे ई-मेल मिळाल्याचे वृत्त आहे. याशिवाय पुणे, सांगली आणि अमरावती येथील न्यायालयांचाही काही वृत्तांतांमध्ये उल्लेख करण्यात आला आहे.

त्यामुळे राज्यभरातील न्यायालयीन आणि पोलीस यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. अनेक ठिकाणी न्यायालयीन इमारती रिकाम्या करून बॉम्बशोधक पथकांकडून तपासणी सुरू करण्यात आली.

सायबर पोलिसांकडून ई-मेलचा माग काढण्याचे आव्हान

या धमकीमागे नेमके कोण आहे, ई-मेल कोणत्या ठिकाणाहून पाठविण्यात आला आणि वेगवेगळ्या न्यायालयांना आलेल्या संदेशांचा परस्पर संबंध आहे का, याचा तपास सायबर पोलिसांकडून सुरू आहे. ई-मेलचा तांत्रिक तपास करून पाठविणाऱ्याचा माग काढण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. वर्धा येथे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागेशकुमार चतरकर यांच्या नेतृत्वात सुरक्षा आणि तपासाची कार्यवाही सुरू असून, न्यायालयीन परिसरातील परिस्थितीवर पोलिसांचे लक्ष आहे. धमकी प्रत्यक्षात खरी आहे की केवळ दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, की मार्क डिल आहे, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

ओबीसींच्या हक्कांसाठी एकजुटीचा निर्धार; वर्ध्यात जनगणना महापरिषद

स्वतंत्र जनगणनेच्या मागणीसाठी विजय वडेट्टीवारांचा हुंकार

वर्धा जनमाध्यम : ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय्य हक्क आणि आरक्षणाचे संरक्षण मिळवायचे असेल, तर जातिनिहाय जनगणना होणे अत्यावश्यक आहे. जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम नसल्यास



समाजाची खरी लोकसंख्या आणि सामाजिक परिस्थिती समोर येणार नाही. त्यामुळे आपल्या अधिकारांसाठी ओबीसी समाजाने संघटित होऊन निकराचा लढा उभारावा, असे आवाहन ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांनी केले. या मागणीसाठी कन्याकुमारी ते दिल्ली असा मार्च काढण्याची तयारी असल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्म द्विशताब्दी वर्षानिमित्त ओबीसी जनजागृती संघटन, जिल्हा वर्धा आणि समविचारी सामाजिक संस्थांच्या वतीने ३१ ऑक्टोबर रोजी शिववैभव सभागृहात ओबीसी जनगणना महापरिषद पार पडली. या परिषदेला जिल्ह्यातील विविध ओबीसी संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापरिषदेचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विजय वडेट्टीवार होते. खासदार अमर काळे, स्वागताध्यक्ष तथा नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, देवळीचे नगराध्यक्ष किरण ठाकरे उपस्थित होते.

विजय वडेट्टीवार यांनी ओबीसींची अचूक लोकसंख्या समोर आल्याशिवाय विकासाचे नियोजन आणि सामाजिक न्याय शक्य नसल्याचे स्पष्ट केले. पुढील पिढ्यांचे आरक्षण सुरक्षित ठेवण्यासाठी समाजाने जागृत राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

दुसऱ्या सत्रात 'ओबीसी जातिनिहाय जनगणना आणि संविधानिक अधिकार' या विषयावर डॉ. दिलीप चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अशोक चोपडे अध्यक्षस्थानी होते. जातिनिहाय जनगणना, सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्कांवर यावेळी विचारमंथन झाले.

जिल्ह्यातील गावागावांत जनजागृती पोहोचविणे, विविध जाती संघटनांना एकत्र आणणे आणि ओबीसींची संघटनात्मक ताकद उभी करणे, असा निर्धार महापरिषदेत व्यक्त करण्यात आला.

घोराडमध्ये नात्याला काळिमा; दिराच्या हल्ल्यात भावजय गंभीर जखमी

गोकुळ लिखार याच्याविरुद्ध सेलू पोलिसांत गुन्हा दाखल

सेलू / जनमाध्यम : कौटुंबिक वादातून संताप अनावर झाल्याने दिराने स्वतःच्या भावजयीवर चाऱ्याची कुट्टी कापण्याच्या कत्याऱ्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना सेलू तालुक्यातील घोराड येथे घडली. शनिवारी, ३१ ऑक्टोबर रोजी रात्री ९.१५ ते ९.३० वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेत महिला गंभीर जखमी झाली. या प्रकरणी गोकुळ वामनराव लिखार (४७, रा. घोराड) याच्याविरुद्ध सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गोकुळ लिखार आणि जखमी महिला यांच्यात दीर-भावजयीचे नाते



असून, घरगुती कारणांवरून त्यांच्यात वारंवार वाद होत होते. शनिवारी रात्री पुन्हा किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. या वादाचे रूपांतर झटापटीत झाले. यावेळी आरोपीने भावजयीला शिवीगाळ करीत चाऱ्याची कुट्टी कापण्याच्या कत्याऱ्याने तिच्यावर हल्ला केला. या झटापटीत धारदार कतारा महिलेच्या पोटाला लागल्याने ती गंभीर जखमी झाली.

हल्ल्यात महिला रक्तबंबाळ झाल्याने परिसरात खळबळ उडाली. घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि नातेवाइकांच्या मदतीने जखमी महिलेला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या प्रकरणी जखमी महिलेच्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे सेलू पोलीस ठाण्यात आरोपी गोकुळ लिखार याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ३५२ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत.

२.९० लाखांच्या लोखंडी फळ्यांवर डल्ला; अखेर गुन्हा दाखल

बंधाऱ्यावरील १४५ फळ्या गायब, सचिन डुकरे याच्याविरुद्ध आष्टी पोलिसांत तक्रार

आष्टी शहीद जनमाध्यम: तालुक्यातील साहूर आणि बोरखेडी शिवारातील जाम नदीवरील बंधाऱ्यांमधील तब्बल १४५ लोखंडी फळ्या चोरीला गेल्याचे प्रकरण अखेर पोलिसांत पोहोचले आहे. सुमारे २ लाख ९० हजार रुपये किमतीच्या या फळ्या परवानगीशिवाय नेल्याप्रकरणी सचिन डुकरे याच्याविरुद्ध आष्टी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

साहूर, बोरखेडी परिसरातील शेतशिवारातून वाहणाऱ्या जाम नदीवर पाणी अडविण्यासाठी चार बंधारे बांधण्यात आले आहेत. या बंधाऱ्यांवर पाणी अडविण्याकरिता लोखंडी फळ्या लावण्यात आल्या होत्या. मात्र, या चारही बंधाऱ्यांवरील १४५ फळ्या सचिन डुकरे हा वाहनातून नेत असल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आले. याबाबत त्याला विचारणा केली असता, ग्रामपंचायतीमध्ये जमा करण्यासाठी फळ्या नेत असल्याचे त्याने सांगितल्याचा आरोप आहे. मात्र, प्रत्यक्षात या फळ्या ग्रामपंचायतीमध्ये जमा करण्यात आल्या नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. मृद व जलसंधारण विभाग तसेच ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी न घेता शासकीय मालमत्तेच्या १४५ लोखंडी फळ्या चोरून नेल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली. या तक्रारीवरून आष्टी पोलिसांनी सचिन डुकरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

सिगारेटवरून वाद, इंदिरानगरात चाकूने वार; ४२ वर्षीय इसमाची हत्या

४ आरोपी अटकेत, ४ दिवसाची पोलीस कोठडी

देवळी जनमाध्यम : सिगारेटच्या धुरा वरुन झालेल्या वादाचा रक्तरंजित शेवट झाल्याची धक्कादायक घटना देवळी शहरातील इंदिरानगर परिसरात सोमवारी, २ नोव्हेंबर रोजी पहाटे एक वाजताच्या सुमारास घडली. जुन्या वादाचा राग मनात धरून आलेल्या टोळक्याने ४२ वर्षीय गजानन किशोर पाटणकर यांना अडवून त्यांच्यावर चाकूने वार केले. या जीवघेण्या हल्ल्यात गजानन पाटणकर यांचा मृत्यू झाला. घटनेने देवळी शहरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, घटनेचे गांभीर्य ओळखून देवळी पोलिसांनी वेगवान तपास करीत अवघ्या एका तासाच्या आत चार मुख्य आरोपींना अटक केली, तर एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतक गजानन किशोर पाटणकर आणि आरोपी प्रणय राठोड यांच्यात मोहित धाबा येथे वाद झाला त्यानंतर ते एका पानठेल्यावर गेले तेथे मृतकाने सिगरेटचा धुवा आरोपीच्या चेहऱ्यावर उडवला या कारणावरून वाद झाला . सुरुवातीला किरकोळ स्वरूपाचा असलेला हा वाद पुढे गंभीर वळणावर गेला. याच वादाचा राग मनात धरून आरोपींनी संगनमताने गैरकायद्याची मंडळी जमा केल्याचा आरोप आहे,

२ नोव्हेंबरच्या पहाटे गजानन पाटणकर हे आपल्या मित्राला सोडण्यासाठी इंदिरानगर परिसरात गेले होते. यावेळी आरोपींनी त्यांच्या वाहनाला आडवे येत त्यांना अडविले. त्यानंतर त्यांना पकडून ठेवत चाकूने वार करण्यात आले. अचानक झालेल्या या हल्ल्यात गजानन गंभीर जखमी झाले. चाकूच्या वारांमुळे त्यांचा मृत्यू झाला. किरकोळ कारणावरून सुरू



आरोपी, व मृतक

झालेल्या वादाचे रूपांतर थेट हत्येत झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच देवळी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली. संशयितांचा माग काढत पोलिसांनी घटनेनंतर अवघ्या एका तासाच्या आत चार मुख्य आरोपींना अटक केली. याशिवाय एका विधीसंघर्षग्रस्त बालकासही ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या या जलद कारवाईमुळे शहरात चर्चेला उधाण आले आहे.

हत्येच्या घटनेनंतर घटनास्थळावरील परिस्थिती आणि भौतिक पुरावे तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने फॉरेन्सिक पथकाला तातडीने पाचारण करण्यात आले. पथकाने घटनास्थळावरून वैज्ञानिक पुरावे संकलित केले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. तपासाची दिशा आणि पुढील कार्यवाहीबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

या प्रकरणात अमन संतोष टेकाम, ओम रमेश सावरकर, प्रणय ज्ञानेश्वर राठोड आणि मनोज ज्ञानेश्वर राठोड या चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, पोलीस अधीक्षक कार्यालयातील प्रमोद मकेश्वर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पुलगाव वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. ठाणेदार संदीप कापडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शिवराज जाधव, पोलीस उपनिरीक्षक कमलेश मगरे तसेच देवळी पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तपासाची सूत्रे हाताळली. या प्रकरणी देवळी पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ८२५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(३), १२६, ६१(२)(अ), २९६, १८९(२)(४), १९० आणि १९१(१)(२)(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी विक्की किशोर पाटणकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी कारवाई केली असून पुढील तपास सुरू आहे.

चारही आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी

इंदिरानगर परिसरात ४२ वर्षीय इसमाची हत्या केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या चारही मुख्य आरोपींना न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. हत्येमागील नेमके कारण, घटनाक्रम आणि गुन्ह्यातील इतर बाबींचा तपास देवळी पोलीस करीत आहेत.

कर्जवसुलीच्या नावाखाली महिलांची मानहानी, गाव सोडण्याची वेळ

मायक्रो फायनान्स एजंटांच्या कथित दादागिरीने पिलापूर-येणाडातील महिला त्रस्त

आष्टी (शहीद) जनमाध्यम : कर्ज देताना गोड बोलून विश्वास संपादन करायचा आणि वसुलीची वेळ आली की त्याच महिलांच्या दारात जाऊन शिवीगाळ, अपमान व धमकावणी करायची, असा संतापजनक प्रकार पिलापूर आणि येणाडा परिसरात घडत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कथित जाचक वसुली पद्धतीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या महिलांचे जगणे मुश्किल झाले असून, काही महिलांवर चक्क गाव सोडण्याची वेळ आल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. या प्रकाराने संतप्त झालेल्या महिलांनी प्रशासनाकडे धाव घेत तहसीलदार येशश्वर्या गिरी यांच्याकडे निवेदन सादर केले.

आधीच दुष्काळजन्य परिस्थिती, रोजगाराचा अभाव आणि उत्पन्नाची साधने बंद झाल्याने ग्रामीण भागातील कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. घरखर्च भागवायचा की कर्जाचे हप्ते भरायचे, असा प्रश्न महिलांसमोर उभा ठाकला आहे. अशा परिस्थितीत कर्जवसुलीसाठी घरी पोहोचणारे एजंट कथितरीत्या अपमानास्पद भाषा वापरत असल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महिलांनी कर्ज घेतल्याचे नाकारलेले नाही. कर्जाची परतफेड करण्याची तयारीही त्यांनी दर्शविली आहे. मात्र, रोजगार नसताना आणि हातात पैसा नसताना हप्ते भरायचे कसे, हा त्यांचा प्रश्न आहे. आर्थिक अडचण समजून घेऊन मुदत देण्याऐवजी वसुली एजंटांकडून मानसिक दबाव आणला जात असल्याचा आरोप महिलांनी केला आहे. कर्जाच्या नावाखाली महिलांची प्रतिष्ठा पायदळी तुडविण्याचा अधिकार या एजंटांना कोणी दिला, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

महिलांनी निवेदनातून पाच प्रमुख मागण्या केल्या आहेत. सक्तीची वसुली, शिवीगाळ आणि धमकावणी तातडीने बंद करावी.

रोजगार व उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईपर्यंत कर्जहप्ते भरण्यास मुदत द्यावी किंवा परतफेडीचे पुनर्नियोजन करावे. महिलांचा अपमान करणाऱ्या एजंटांची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी.

संबंधित मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या व्यवस्थापनाची संयुक्त बैठक बोलावून कर्जदार महिलांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

आम्ही कर्ज फेडण्यास नकार देत नाही. मात्र, सध्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे. हाताला काम नाही, उत्पन्न नाही. अशा परिस्थितीत वारंवार अपमान आणि धमकावणी सहन करायची किती, असा आर्त सवाल महिलांनी उपस्थित केला आहे. कर्जवसुलीच्या नावाखाली मानसिक छळ करून महिलांना गाव सोडण्यास भाग पाडले जात असेल, तर ही बाब केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित राहत नाही, तर महिलांच्या सन्मानाचा प्रश्न बनते.

या निवेदनाच्या प्रती आष्टी पोलीस ठाण्याचे ठाणेदार आणि संबंधित मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या व्यवस्थापकांनाही देण्यात आल्या आहेत. आता प्रशासन या तक्रारींची प्रत्यक्ष चौकशी करणार की केवळ निवेदन स्वीकारून विषय बाजूला ठेवणार, याकडे पिलापूर आणि येणाडातील महिलांचे लक्ष लागले आहे. कर्जाची वसुली कायदेशीर मार्गाने होणे अपेक्षित असताना महिलांच्या सन्मानाशी खेळण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार का, हा खरा प्रश्न आहे.

शेतकऱ्यांच्या खिशात ठणठणाट; दिवाळी बाजारात शुकशुकाट

वर्धा जनमाध्यम : यंदाच्या दुष्काळाने शेतशिवारासोबतच दिवाळीच्या बाजारपेठेतील उत्साहही हिरावून घेतला आहे. दिवाळीचा सण जवळ आला असताना बाजारपेठेत खरेदीसाठी अपेक्षित गर्दी दिसत नसून, व्यापाऱ्यांना ग्राहकांची प्रतीक्षा करण्याची वेळ आली आहे. दिवाळीनिमित्त वर्धा येथील बाजारात व्यापाऱ्यांनी कपडे, फटाके, सजावटीच्या वस्तू आणि पूजेच्या साहित्याची दुकाने थाटली. मात्र, दिवसभर ग्राहकांची वर्दळ नसल्याने बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला. दरवर्षी दिवाळीत गजबजणाऱ्या बाजारपेठेची यंदा आर्थिक संकटामुळे रया गेली आहे. यंदा पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले. आगामी रब्बी हंगामाची आशाही धूसर झाली आहे. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि दैनंदिन गरजांची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे सणासुदीची खरेदी करण्याऐवजी नागरिकांनी आवश्यक खर्चालाच प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने त्याचा थेट परिणाम बाजारपेठेतील उलाढालीवर झाला आहे. दुकाने सजली, माल मांडला; मात्र ग्राहकांनी पाठ फिरविल्याने व्यापारीही आर्थिक संकटात सापडले आहेत.

गांजा तस्करीचे वर्धा कनेक्शन उघड

केळझरमध्ये दोन भावांच्या घरावर एलसीबीचा छापा, चौघांविरुद्ध गुन्हा

वर्धा जनमाध्यम : जिल्ह्यात गांजा विक्री आणि तस्करीचा अवैध व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली. सेलू तालुक्यातील केळझर येथे दोन भावांच्या घरावर छापा टाकून पोलिसांनी २ किलो ३८५ ग्रॅम गांजा जप्त केला. या प्रकरणात दोन भावांसह वर्ध्यातील आणखी दोघांना अशा चार आरोपींना कारवाईच्या कक्षेत घेण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत १ लाख १९ हजार २५० रुपये आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गांजा विक्रीच्या अवैध व्यवसायाचे जाळे पुन्हा चर्चेत आले आहे.



पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात हा गांजा प्रभाकर आणि गजानन पवार यांच्या मालकीचा असल्याचे तसेच ते गांजा विक्रीचा अवैध व्यवसाय करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी हा गांजा वर्ध्यातील शिवनगर परिसरातील राहणाऱ्या व्यंकट भाऊराव मोहिते आणि जनाबाई मोहिते या चौघांकडून खरेदी केल्याची माहिती समोर आली. चौघेही सांगनमताने गांजाची तस्करी आणि विक्री करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून २ किलो ३८५ ग्रॅम गांजा जप्त केला.

या प्रकरणी प्रभाकर बंडू पवार, गजानन बंडू पवार, व्यंकट भाऊराव मोहिते आणि जनाबाई मोहिते या चौघांविरुद्ध सेलू पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर, पोलीस अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, सागर भोसले आणि रवि पुरोहित यांनी ही कारवाई केली.

जाहीर सूचना

माझे पती महेश गोविंदराव फुलकरी याचे दिनांक २५ सप्टेंबर २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे दोनचाकी वाहन क्रमांक MH49BC7612 आणि MH49BC2263 हे आहेत. (नाते पत्नी) माझे नाव प्राजक्ता महेश फुलकारी वय (४९) वार्ड न. ४ अयोध्या नगर नाचनगाव, पुलगाव जि. वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र

प्राजक्ता महेश फुलकारी -वार्ड न. ४ अयोध्या नगर नाचनगाव पुलगाव जि. वर्धा -९८९०१४१०१२

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

कर्जमाफीच्या यादीतून एकही शेतकरी सुटणार नाही

प्रत्येक जिल्ह्यात १० ते १५ हजार शेतकऱ्यांची केवायसी अपूर्ण, मंत्री बावनकुळेंची माहिती

मुंबई/प्रतिनिधी- कर्जमाफीच्या यादीतून एकाही शेतकऱ्याचे नाव सुटणार नाही, असे मत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. खण्ण पूर्ण होऊन याद्या जात आहेत असेही बावनकुळे म्हणाले. कर्जमाफीच्या निर्णयाची अंमलबजावणी करु असेही ते म्हणाले. १० ते १५ हजार शेतकरी कुटुंबाचे प्रत्येक जिल्ह्यात केवायसी झाले नाही, हे खरं आहे असंही ते म्हणाले.

शेतकरी कर्जमाफीची योजना आम्ही पूर्ण करु- मृत आई-वडिलांच्या नावाने अकाउंट आहे, ते मुलाच्या नावानं करणे यासाठी वेळ लागत आहे. शेतकरी कर्जमाफीची योजना आम्ही पूर्ण करु कुणालाही सोडणार नाही असेही बावनकुळे यावेळी म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्लीत भेट घेतली आहे. याबाबत देखील बावनकुळे यांना प्रसारमाध्यमांनी विचारले. यावेळी ते म्हणाले की, उच्चस्तरीय बैठक झाली असेल, त्यामध्ये जे ठरलं असेल त्यावर आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वरिष्ठ नेते बसून निर्णय करतील असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. नागपूर बिश्नोई गँग धमकी प्रकरणी देखील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. धमकी संदर्भात पोलीस चौकशी करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची दखल घेतली आहे. यावर आम्ही कारवाई करत आहोत असेही बावनकुळे



म्हणाले. कुठल्याही दबावाखाली स्थगिती होत नाही, एखाद्या वेळी कारवाईमध्ये तांत्रिक बाबी राहून जातात त्यामुळे स्थगिती मिळते, अशी स्थगिती कोणाला देता येत नाही. तुकाराम मुंढे यांच्या तपासणीत काही आलं असेल, काही बाबी राहून गेल्या असतील म्हणून थांबवलं असेल, असं कोणी तुकाराम मुंढेंना थांबवत नाही, त्यांच्या कारवाईच्यामध्ये कोणी येत नाही असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. फायनान्स कंपन्यांकडून सक्तीची वसुली होत असल्या संदर्भात देखील बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली. दुष्काळाच्या आठ महिन्यात शेतकऱ्यांना तगादा लावू नका, पतसंस्था फायनान्स कंपन्या खासगी बँका कोणीही शेतकऱ्यांना वेठीस धरू नका. तुमचे पैसे नंतर भेटतील पण शेतकऱ्यांना या काळात त्यांच्या आत्महत्या होतील असं काही करू नका अशा सूचना दिल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. जर कुणी असं करत असेल तर शासन म्हणून कारवाई करु असेही ते म्हणाले. जिल्हा परिषद निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरुन चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यावर टीका केली. विजय वडेट्टीवार नौटंकी करत आहेत. ते २७ टक्के आरक्षण कुठे गेलं? २७ टक्के आरक्षण उद्धव ठाकरे यांच्या काळात गेलं असेही बावनकुळे म्हणाले. विजय वडेट्टीवार खोटारडेपणा करत आहेत. २७ टक्के आरक्षण परत मिळण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्याचे बावनकुळे म्हणाले. २७ टक्केचा निर्णय होत राहील पण ५० टक्के आरक्षण घेऊन निवडणुका घ्या असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, सरकार तशी तयारी करत आहे असेही बावनकुळे म्हणाले.

सुनेत्रा पवारांशिवाय राष्ट्रवादीच्या ६ प्रमुख नेत्यांनी अमित शाहांची भेट घेतली



नवी दिल्ली/वृत्तसंस्था सोमवारी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांनी दिल्लीत अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात होते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीला अधिक मजबूत करण्यासाठी भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे एकत्रीकरण करण्याचा विचार करत असून, यादरम्यान दिवंगत नेते अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि मुलगा पार्थ पवार यांना बाजूला केले जात असल्याच्या बातम्या पसरल्या होत्या.

नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार पक्षाच्या सहा ज्येष्ठ नेत्यांची भेट झाल्यानंतर पक्षात अंतर्गत मतभेद असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसने या सर्व चर्चा फेटाळून लावल्या असून, ही भेट आधीच निश्चित झालेली होती, असे स्पष्ट केले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांना बाजूला सारले जात असल्याचा दावा पक्षाने पूर्णपणे फेटाळून लावला असून, पक्षात कोणतेही मतभेद नसून पक्ष पूर्णपणे एकसंध असल्याचे सांगण्यात आले आहे.'इंडिया टूडे'च्या वृत्तानुसार, या सर्व घडामोडींवर राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. 'ज्येष्ठ नेत्यांना डावलले जात असल्याच्या आणि पक्षात अंतर्गत संघर्ष सुरू असल्याच्या बातम्या पूर्णपणे असत्य, बिनबुडाच्या आणि दिशाभूल करणाऱ्या आहेत,' असे वक्तव्य त्यांनी केले.?

उमेश पाटील यांनी पुढे स्पष्ट केले की, अमित शाह यांच्यासोबत झालेली ही बैठक अचानक ठरलेली नव्हती तर तिचे नियोजन आधीच झाले होते. अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी स्वतः दिल्लीत जाऊन अमित शाह यांची भेट घेतली होती. त्याच बैठकीदरम्यान, पक्षातील इतर ज्येष्ठ नेत्यांचे एक शिष्टमंडळ लवकरच भेट घेईल, असे सुनेत्रा पवार यांनी शाह यांना सांगून ही वेळ मागून घेतली होती.

मतदारसंघाचे प्रश्न अन् महायुतीतील ताळमेळ- या बैठकीत नेत्यांनी पक्षाचे संघटन, महाराष्ट्रातील विविध विकासकामे आणि आपापल्या मतदारसंघातील महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. याशिवाय, दिल्लीत उपस्थित असलेल्या महायुतीच्या इतर घटक पक्षांतील नेत्यांसोबतही अनौपचारिक संवाद साधण्यात आला, अशी माहिती पाटील यांनी दिली. 'काही घटकांकडून या औपचारिक भेटीला विनाकारण राजकीय रंग देण्याचा आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ताळमेळ नसल्याचे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राष्ट्रवादी हा महायुतीचा एक महत्त्वाचा आणि मजबूत घटक पक्ष असून, सुनेत्रा पवार यांच्या कुशल नेतृत्वाखाली संपूर्ण पक्ष एकसंधपणे काम करत आहे,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अतिवृष्टी व पूरबाधित शेतकऱ्यांना २९१ कोटी ९१ लाख रुपयांची मदत

मुंबई/प्रतिनिधी- यंदाच्या वर्षी जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून २९१ कोटी ९१ लाख ४ हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे. यापैकी शेतीपिकांच्या नुकसानीसाठी २६२ कोटी ६९ लाख ९५ हजार रुपये, तर शेतजमिनीच्या नुकसानीसाठी २९ कोटी २१ लाख ९ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात येणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केले आहेत. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यात येणार आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीबाबत ३ लाख ९ हजार २८९ बाधित शेतकऱ्यांच्या २ लाख ६८ हजार ९१८ तर २९ हेक्टर क्षेत्रासाठी २६२ कोटी ६९ लाख ९५ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, कोकण आणि नाशिक विभागातील बाधित शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे. या मदतीचा लाभ सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर आणि नंदुरबार जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांना होणार आहे. शेतीपिकांच्या नुकसानीची मदत थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे, असेही मंत्री जाधव पाटील यांनी सांगितले. अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतजमिनीचेही नुकसान झाले होते. राज्यात शेतपिकाचे नुकसान झालेल्या ३४ हजार ९८४ शेतकऱ्यांच्या ७ हजार ६७५.४० हेक्टर क्षेत्रासाठी २९ कोटी २१ लाख ९ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अमरावती, नागपूर, कोकण, नाशिक आणि पुणे विभागांतील यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, सातारा आणि पुणे जिल्ह्यांतील बाधितांचा यात समावेश आहे. शेतजमिनीच्या नुकसानीसाठी जमीनमालक असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना विहित दराने जास्तीत जास्त दोन हेक्टरच्या मर्यादेत मदत मिळेल. जमिनीतील वाळू, गाळ किंवा क्षार काढणे तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पात्र नुकसानीसाठी हा निधी वापरण्यात येणार आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मिळणारी मदत बँकांनी कर्ज खात्यात किंवा अन्य वसुलीसाठी वळती करू नये, अशा सूचना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांना देण्याचे निर्देश याद्वारे मंत्री जाधव पाटील यांनी दिले आहेत.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील

शेतीपिके आणि शेतजमिनीच्या नुकसानीसाठी निधी वितरणास शासनाची मंजुरी

डेन्मार्कच्या मंत्र्यांनी घेतली महाराष्ट्राच्या राज्यपालांची भेट

मुंबई /प्रतिनिधी- डेन्मार्कचे व्यवसाय आणि स्पर्धात्मकता मंत्री मार्टिन लिडेगार्ड यांनी शिष्टमंडळासह महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन येथे सदिच्छा भेट घेतली. डेन्मार्कमधील लॉजिस्टिक्स क्षेत्रातील आघाडीची कंपनी मर्स्कसह डेन्मार्कच्या ६३ कंपन्या महाराष्ट्रात कार्यरत असल्याची माहिती मंत्री मार्टिन लिडेगार्ड यांनी राज्यपालांना दिली. भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यात होणाऱ्या मुक्त व्यापार कराराचा महाराष्ट्राला मोठा लाभ होईल, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. भारत आणि डेन्मार्क यांच्यात हरित धोरणात्मक भागीदारी असून त्यामध्ये पवन ऊर्जा, सौर ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि जीवन विज्ञान या क्षेत्रांचा समावेश आहे. युरोपीय महासंघ हा जगातील सर्वात मोठा ऊर्जा आयातदार असल्याचे नमूद करून भारत आणि डेन्मार्क यांच्यात ऊर्जा क्षेत्रात सहकार्याच्या मोठ्या संधी असून शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांमध्येही सहकार्य वाढविण्याबाबत त्यांनी विशेष स्वारस्य व्यक्त केले. डेन्मार्क हा आकाराने लहान मात्र समृद्ध देश असल्याचे सांगताना तेथील श्रीमंत आणि गरीब यांच्यातील आर्थिक दरी तुलनेने कमी असल्याचे त्यांनी नमूद केले.

फळबागा जगविण्यासाठी मंत्रिमंडळाच्या मान्यतेने केंद्राकडे प्रस्ताव पाठविणार-रोजगार हमी योजना मंत्री गोगावले

मुंबई /प्रतिनिधी- राज्यात फळबागा असलेल्या एकूण ६ लाख ८५ हजार हेक्टर क्षेत्रापैकी मराठवाडा आणि पश्चिम विदर्भात सुमारे २.५ लाख हेक्टर क्षेत्र आहे. या भागातील तीव्र दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर फळबागा जगविण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक असून या अनुषंगाने शेतकऱ्यांना मदत व्हावी यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल, असे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले. विधानसभा सदस्य सुरेश धस यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील १४ जिल्ह्यांमध्ये बाधित होणाऱ्या फळबागा जगविण्यासंदर्भात शेतकऱ्यांना मदत उपलब्ध करून देण्याची विनंती मंत्री गोगावले यांच्याकडे केली. या अनुषंगाने मंत्रालयात झालेल्या बैठकीत मंत्री गोगावले यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट केले. राज्यात असलेल्या तीव्र दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील शेतकरी बाधित झाला आहे. विविध पिकांसोबतच या भागातील फळबागा लागवडीवरील क्षेत्र सुमारे २.५ लाख हेक्टर एवढे असून पाणी पुरवठ्याअभावी उभी असलेली फळबाग नष्ट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे या भागातील फळबागांना पाणीपुरवठा करणे अथवा त्यासाठी शेतकऱ्यांना व्हीबी जीरामजी योजनेच्या माध्यमातून मदत करणे, अशा उपायोजना करणे गरजेचे आहे. याबाबत मंत्री गोगावले यांच्याशी बैठकीत चर्चा करण्यात आली. केंद्र सरकारकडून व्हीबी जीरामजी योजनेअंतर्गत ३७५ कामांकरिता राज्यासाठी ४४२० कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे.

महापरिनिर्वाण दिनाच्या नियोजनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात-केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

मुंबई/प्रतिनिधी-: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर रोजी होणाऱ्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे येणाऱ्या अनुयायांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. आयोजनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा. कोणतेही काम प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिले.सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री ?ड. आशिष शेलार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) प्राजक्ता वर्मा-लवंगारे, सहायक पोलीस आयुक्त मनोज जोशी, एसटी महामंडळाचे उपमहाव्यवस्थापक सागर पळसुले, परिमंडळाचे सहाय्यक आयुक्त सुहास मनोहर, सहायक पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) नीता पाडवी, सहाय्यक पोलीस (वाहतूक) आयुक्त चेतन राठोड, विश्वशांती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रतीक कांबळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे उपस्थित होते.केंद्रीय राज्यमंत्री आठवले म्हणाले, महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून मोठ्या संख्येने अनुयायी मुंबईत येत असल्याने चैत्यभूमी येथे कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी मुंबई महानगरपालिका, गृह विभाग व सामाजिक न्याय विभाग यांच्यासह सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. प्रत्येक विभागाने आपल्याला दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी. गर्दी टाळण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारी घ्यावी. गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी, शौचालय, आरोग्य सुविधा, प्रकाश व्यवस्था आणि परिसर स्वच्छता या सर्व बाबींकडे विशेष लक्ष द्यावे. तसेच पोलीस प्रशासनाने अनुचित प्रकार टाळण्यासाठी सतर्क राहावे. चैत्यभूमी परिसरात वैद्यकीय मदत केंद्रे, आरोग्य तपासणी केंद्रे, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत.

केंद्रीय राज्यमंत्री आठवले म्हणाले, चैत्यभूमी परिसरासाठी ४, ५ आणि ६ डिसेंबर या तीन दिवसांचा सर्वंकष सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करावा. यासाठी स्थानिक नागरिक, समन्वय समिती आणि संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा करावी. सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवून अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करावा. दरवर्षी ४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या सोयी-सुविधा यावर्षी १ डिसेंबरपासूनच उपलब्ध करून द्याव्यात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा प्रसार करण्यासाठी ५ व ६ डिसेंबर रोजी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ड्रोन शो आयोजित करावा. ६ डिसेंबर रोजी मध्य रेल्वेचा मेगा ब्लॉक टाळण्यासाठी रेल्वे प्रशासन आणि रेल्वेमंत्र्यांकडे पाठपुरावा करावा. बेस्ट आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने अतिरिक्त बसगाड्या उपलब्ध करून द्याव्यात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी वातानुकूलित विशेष बससेवा उपलब्ध करून ती मोफत ठेवण्याबाबत विचार करावा, अशा सूचना यावेळी करण्यात आल्या. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून विविध पुस्तकांचे आणि बार्टीच्या योजनांची माहिती देणारे स्टॉल उभारावेत. वृक्षारोपण, व्यसनमुक्ती जनजागृती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित लघुपट तयार करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. बैठकीत प्रस्तावित संविधान मार्गाच्या विकासकामांचाही आढावा घेण्यात आला. कीर्ती महाविद्यालयापासून व्हीविंग गॅलरीपर्यंत संविधान मार्ग विकसित करण्याचे नियोजन आहे. याबरोबरच चैत्यभूमी परिसरातील अभियांत्रिकी व बांधकामविषयक कामे मुंबई महानगरपालिकेने पूर्ण करावीत. तसेच प्रलंबित प्रॉपर्टी कार्डचा प्रश्न जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने मार्गी लावावा. चैत्यभूमी परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रदर्शन भरवावे आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'लोकराज्य' मासिकाचा विशेषांक प्रकाशित करावा. या विशेषांकाची प्रतसंख्या वाढवून त्यात नामवंत लेखकांचे अभ्यासपूर्ण लेख समाविष्ट करावेत, अशी सूचनाही केंद्रीय राज्यमंत्री आठवले यांनी यावेळी केली.

सेंट्रल बँकेच्या खात्यातून १३.९६ कोटी RTGS द्वारे लंपास

मुंबई/प्रतिनिधी- सध्या ऑनलाईन फ्रॉड आणि इंटरनेट बँकींगच्या माध्यमातून बँक खात्यातील रक्कम काढून ग्राहकांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहे. मात्र, चक्क बँकेच्या खात्यातून तब्बल १३.९६ कोटीं रुपयांची रक्कम RTGS द्वारे विविध



बँकांच्या खात्यात वळवल्याची घटना घडली होती. याप्रकरणातील आरोपीला सायबर पोलिसांनी अटक केली आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या खात्यातून तब्बल १३ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. याप्रकरणाती आरोपी मेहुल सिमारिया (वय ४९) यास महाराष्ट्र सायबरने (Police) अटक केली. फसवणुकीतील १ कोटींची रक्कम दुसऱ्या खात्यांमध्ये वळवण्यापूर्वी आरोपीच्या खात्यात जमा झाल्याचं तपासात निष्पन्न झालं आहे. गत ऑक्टोबर महिन्यात सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) मधील ट्रेझरी खात्यातून ही १३.९६ कोटी रुपयांच्या फसवणुकीने रक्कम वळवण्यात आल्याचं प्रकरण आहे. १५ आणि १७ ऑक्टोबरलाँ ऊठए व्यवहारात फेरफार करून देशभरातील विविध बँकांच्या लाभार्थी खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निधी अनधिकृतपणे हस्तांतरित करण्यात आला होता. बँकेने दिलेल्या तक्रारीनुसार, बँकेच्या सुरक्षित कम्युनिकेशन चॅनेलमधून RBI च्या पेमेंट प्रोसेसिंग सिस्टीमकडे पाठवण्यात येणाऱ्या TGS व्यवहार प्रक्रियेत कथितरीत्या छेडछाड करण्यात आली. त्यामुळे १८७ अनधिकृत व्यवहारांद्वारे १३.९६ कोटी रुपयांची रक्कम फसवणुकीने डेबिट करण्यात आली. अवघ्या तीन दिवसांत ही रक्कम ३६ वेगवेगळ्या बँकांमधील १०७ लाभार्थी खात्यांमध्ये हस्तांतरित करण्यात आली. याप्रकरणी महाराष्ट्र सायबर विभागाच्या मुंबई येथील नोडल सायबर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(२), ३१८(३), ३१८(४) आणि ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ४३, ६६ आणि ६६(D) कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, मुंबई सायबर पोलिसांनी याप्रकरणाचा सखोल तपास केला असून आरोपीला अटक करण्यात यश आलं आहे.

२४ तासाच्या आत स्मार्ट मीटर बसवा, नाहीतर लाईट होणार बंद

मुंबई /प्रतिनिधी- स्मार्ट मीटर बसवण्यास परवानगी द्या, नाहीतर वीज बंद करण्यात येईल, असा इशारा महावितरणाने डोंबिवलीतील सोसायट्यांना दिला आहे. याबाबतची कचक नोटीस पाटवण्यता आली असून २४ तासांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडने डोंबिवलीच्या एमआयडीसी निवासी भागातील दोन गृहनिर्माण



सोसायट्यांना स्मार्ट मीटर बसवण्यासाठी प्रवेश न दिल्यास वीजपुरवठा खंडित करण्याची धमकी देणारी नोटीस बजावली आहे. या नोटिसांमुळे रहिवाशांमध्ये नाराजी पसरली आहे. त्यांनी मीटर बसवण्याच्या मोहिमेला विरोध केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार महावितरणने डोंबिवली एमआयडीसी परिसरातील अनेक हाऊसिंग सोसायटींना एक अत्यंत कडक नोटीस पाठवली आहे. जुने मीटर बदलून तिथे नवीन 'स्मार्ट मीटर' बसवण्यास २४ तासांत परवानगी द्या, अन्यथा वीज पुरवठा खंडित केला जाईल, असा थेट इशारा महावितरणने दिला आहे. गेल्या ६ ते ७ महिन्यांपासून येथील रहिवासी स्मार्ट मीटर बसवण्यास तीव्र विरोध करत आहेत. नवीन स्मार्ट मीटरमुळे लाईटबिल वाढेल, अशी स्थानिकांना भीती वाटत आहे. महावितरण किंवा त्यांच्या कर्मचा-यांना मीटर रूममध्ये प्रवेशच मिळू नये, म्हणून अनेक सोसायट्यांनी आपल्या मीटर रूमला कुलूपे लावून ठेवली आहेत. त्यामुळे आता महावितरणकडून सोसायट्यांना थेट इशारा दिला जात आहे. स्मार्ट मीटर बसवणे सक्तीचे नाही, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. तरीही महावितरणचे अधिकारी आमच्यावर सक्ती करत असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. तसेच, विचार न करता अधिकारी परस्पर मीटर बदलत असल्याचा दावाही स्थानिकांनी केला आहे. दुसरीकडे, महावितरणचे म्हणणे आहे की, स्मार्ट मीटरमुळे वीज वापराची अचूक नोंद होईल आणि बिले वाढणार नाहीत. जे लोक बेकायदेशीरपणे वीज वापरतात, तेच या स्मार्ट मीटरला विरोध करत असल्याचा दावा अधिका-यांनी केला आहे. कल्याणातील ३ लाख ९१ हजार ग्राहकांपैकी १ लाख ८१ हजारहून अधिक ग्राहकांकडे आतापर्यंत स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत.

दिवाळी फराळावर 'एफडीए'ची करडी नजर

पुणे / प्रतिनिधी- दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि भेसळमुक्त फराळ मिळावा यासाठी अन्न व औषध प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. दि पूना मर्चंट्स चेंबरच्या वतीने आयोजित ३५ व्या लाडू-चिवडा उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी फराळ उत्पादक आणि विक्रेत्यांना स्पष्ट शब्दांत गुणवत्ता राखण्याचा कडक इशारा दिला आहे. कोणत्याही



परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे त्यांनी यावेळी सांगितले.मुंढे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, फराळात वापरल्या जाणा-या खाद्यरंगांचे प्रमाण १०० पीपीएमपर्यंत मर्यादित असावे, मात्र या उपक्रमात ते अवघे ३० पीपीएम इतके नगण्य राखले गेले आहे. भविष्यात कोणताही कृत्रिम रंग न वापरता केवळ नैसर्गिक रंगांचाच वापर करावा, अशी ताकीद त्यांनी दिली. उद्घाटनावेळी तुकाराम मुंढे यांनी स्वत: हाताने लाडू फोडून, त्याचा वास घेऊन आणि तेल-तुपाचा दर्जा तपासून प्रात्यक्षिक केले. निकृष्ट तेलामुळे फराळाला खवट वास येऊ नये आणि तळलेले पदार्थ निकषांनुसारच असावेत, यावर त्यांनी भर दिला. तसेच प्रदर्शनासाठी उघड्यावर मांडलेले लाडू माणसांना अथवा गुरांना खाण्यासाठी न देता त्यांची योग्य विल्हेवाट लावण्याचे आदेशही त्यांनी आयोजकांना दिले. सणासुदीच्या काळात भेसळयुक्त खाद्यपदार्थ विकणा-यांवर एफडीएची करडी नजर कायम राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

अमेरिकेत हॅलोविन वीकेंडला गोळीबाराचे तांडव; ६ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- अमेरिकेत हॅलोविन वीकेंडच्या काळात उत्साहाचे आणि उत्सवाचे वातावरण अचानक भयानक शोकांतिकेत बदलले आहे. देशातील विविध शहरांमधील नाईटलाईफ भाग आणि प्रसिद्ध ठिकाणांवर गोळीबाराच्या अनेक घटना घडल्या. या हिंसक घटनांमध्ये एकूण सहा जणांचा मृत्यू झाला असून १५ हून अधिक लोक गंभीर जखमी झाले आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपास वेगाने सुरू केला असून अनेक संशयितांना ताब्यात घेतले आहे.गोळीबाराच्या या सत्रात डलास शहरात सर्वाधिक हिंसाचार पाहायला मिळाला. डलास पोलिसांच्या माहितीनुसार, शहरातील प्रसिद्ध डीप एलम (Deep Ellum) भागात गोळीबाराच्या तीन वेगवेगळ्या घटना घडल्या. डीप एलम हा परिसर संगीत, उपहारगृहे आणि नाईटलाईफसाठी अत्यंत लोकप्रिय मानला जातो, जिथे हॅलोविनच्या निमित्ताने मोठी गर्दी जमली होती. शनिवारी रात्री झालेल्या या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला तर सुमारे १५ जण जखमी झाले.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

महागाई आणि दिवाळी

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा, मांगल्याचा आणि प्रकाशाचा सण! वर्षभरातील कष्ट, चिंता आणि दुःख विसरून चार क्षण आनंदात घालवण्याची संधी म्हणजे दिवाळी. दिवाळीच्या आगमनाने घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते.मात्र यावर्षी दिवाळीच्या तोडावर संपूर्ण महाराष्ट्र सध्या दुष्काळाच्या वणव्यात होरपळत आहे. त्यात सरकारनिर्मित महागाईच्या झळांनी सामान्यांचे जिणे अशक्य केले आहे. या वर्षी महागाई वाढण्यामागे अनेक कारणे आहेत. सगळ्यात मोठे कारण म्हणजे अन्नधान्याचे भाव. अवकाळी पाऊस आणि हवामान बदलामुळे भाज्या आणि धान्याचे उत्पादन घटले आहे. त्यामुळे शेतात माल कमी आणि बाजारात मागणी जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दुसरे कारण म्हणजे इंधन. कच्च्या तेलाचे आंतरराष्ट्रीय भाव वाढल्यामुळे पेट्रोल आणि डिझेल महाग झाले आहे. पेट्रोल महाग झाले की वाहतूक महाग होते आणि वाहतूक महाग झाली की बाजारात येणारी प्रत्येक वस्तू महाग होते. ही साखळीच आहे.सद्यस्थितीत ना महाराष्ट्रातील शेतात पीक आहे, ना येथील जनतेच्या खिशात पैसा आहे. त्यात सरकारने सीएनजी-एलपीजी दरवाढ केल्याने सामान्यांच्या या उरल्यासुरल्या आशेवरही पाणी फेरले आहे. जनतेने यावेळी दिवाळी साजरीच करू नये, अशी राज्यकर्त्यांची इच्छा आहे काय? भीषण दुष्काळ आणि आधीच वाढलेली महागाई यामुळे यंदा दिवाळी कशी साजरी करायची, या विवंचनेत शेतकरी आणि सर्वसामान्य जनता आहे. ही चिंता दूर करण्याऐवजी सरकार सामान्यांना रोज महागाईचे तडाखे देत आहे.व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरातही दहा रुपयांनी वाढ झाली आहे. म्हणजे हॉटेल्स-रेस्टॉरंटस्मधील जेवण, खाद्यपदार्थ आणखी महाग होणार आहेत. परंतु दिवाळीच्या तोंडावर घरोघरी आणले जाणारे तयार पदार्थ, मिठाई, फराळाचे पदार्थदेखील महाग होणार आहेत. दुष्काळ आणि इराण-अमेरिका युद्धामुळे आधीच खाद्यपदार्थांचे दर आकाशाला भिडले आहेत. खाद्यपदार्थांच्या महागाईचा दर आपल्याकडे सर्वाधिक म्हणजे तब्बल ७.७४ टक्के एवढा आहे. कडधान्ये, डाळी चैनीच्या वस्तू वाटाव्यात एवढ्या महाग झाल्या आहेत. या सर्व परिस्थितीमुळे सामान्यांचे घरगुती बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. त्यात रिझर्व्ह बँकेने रेपो दर वाढविला आहे. त्यामुळे सर्वच ईएमआय वाढले आहेत. त्यात आता सीएनजी आणि व्यावसायिक एलपीजी गॅस महाग करून सरकारने सर्वसामान्यांचे कंबरडेच मोडले आहे. सीएनजीची ही मागील सहा महिन्यांतील सहावी दरवाढ आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरवाढीचे चित्रदेखील वेगळे नाही. मे महिन्यात या सिलिंडरची किंमत तब्बल एक हजार रुपयांनी वाढविण्यात आली होती. त्यानंतर हे दर किंचित कमी झाले. कारण आता हे सिलिंडर परत दहा रुपयांनी महाग झाले आहेत. ऐन दिवाळीच्या तोंडावर हा सरकारने हा धक्का दिला आहे.सरकारी आकडेवारी सांगते का,ऑक्टोबर २०२६ मध्ये किरकोळ महागाई साडेपाच टक्क्यांच्या वर गेली आहे. यामध्ये अन्नधान्य महागाई तर आणखी जास्त आहे. याचा अर्थ आपल्या पगारातील जास्तीत जास्त पैसा हा फक्त पोट भरण्यासाठीच खर्च होत आहे. रिझर्व्ह बँकेने ही महागाई आटोक्यात आणण्यासाठी व्याजदर वाढवले आहेत. व्याजदर वाढले की बँकेचे कर्ज महाग होते. घराचे आणि गाडीचे हप्ते वाढतात. म्हणजे एका बाजूने बाजार महाग आणि दुसऱ्या बाजूने कर्जाचा बोजा वाढतो. यात मध्यमवर्गीय माणूस भरडला जातो. कधी पेट्रोल-डिझेल महाग होते, तर कधी सीएनजीचे दर वाढतात. कधी घरगुती गॅस, तर कधी व्यावसायिक गॅस महाग होतो.पंतप्रधान एकीकडे सर्वसामान्यांना काटकसरीचे आवाहन करतात आणि दुसरीकडे महागाईचा तडाखा देत जनतेच्या खिशात काही राहणारच नाही अशी व्यवस्था करतात. सामान्यांनी काटकसर करायची तर त्यासाठी त्यांच्या खिशात पैसा तर हवा? त्यासाठी रोजगार आणि महागाई आटोक्यात हवी. सामान्यांच्या खिशात एकतर पैसाच नाही किंवा जे काही किडुकमिडुक आहे त्याला सरकारची 'महागाई' खाऊन टाकत आहे. जवळजवळ संपूर्ण महाराष्ट्र सध्या दुष्काळाच्या वणव्यात होरपळत आहे. त्यात सरकारनिर्मित महागाईच्या झळांनी सामान्यांचे जिणे अशक्य केले आहे. दिवाळीच्या आगमनाने घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. मात्र, यंदाच्या दिवाळीवरही महागाईचे सावट असल्याने सर्वसामान्यांच्या आनंदावर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे महागाईच्या झळा सोसत दिवाळी साजरी करण्याची वेळ सामान्य नागरिकांवर आली आहे.महागाई ही फक्त सरकारची जबाबदारी नाही तर ती जागतिक परिस्थितीशीही जोडलेली असते. पण सरकारने काळाबाजार आणि साठेबाजी रोखली, शेतकऱ्याचा माल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवला आणि स्वस्त धान्य दुकानांचा पुरवठा सुरळीत ठेवला तर थोडा दिलासा मिळू शकतो. महागाई कमी होणे म्हणजे फक्त आकडे कमी होणे नाही तर सामान्य माणसाच्या ताटात पुन्हा सुखाचे दोन घास येणे आहे. आणि तेच खऱ्या विकासाचे लक्षण आहे. यावर्षी आलेल्या अल निनोमुळे संपूर्ण जगाची अवस्था बिकट झाली असून भारताला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. कारण भारत हा प्रामुख्याने शेतीप्रधान देश असून शेतीवर आपला उदरनिर्वाह करणारा वर्ग मोठा आहे. परंतु अल निनोचा सर्वाधिक फटका नैसर्गिक वातावरणावर पडला आहे. यामुळे शेतीक्षेत्र सर्वाधिक बाधित झाले आहे. तसेच पर्जन्यमान कमी झाल्यामुळे सर्व जलाशयात कमी पाणी पातळी आहे. जलसंकटा बरोबरच शेती क्षेत्र संकटात सापडल्यामुळे महागाईने तोंड वर काढले आहे. अल निनोचे संकट जाईस्तोवर भारतासह जगभराची अवस्था काय होईल याची कल्पना आजच्या परिस्थितीवरुन येत आहे. त्यामुळे या परिस्थितीत सरकारने काही प्रमाणात महागाई कमी करुन शेतक-यासह सर्वसामान्यांना दिलासा द्यावा.

पाणी संपल्यावर विकासाचे इमले काय कामाचे?

निसर्गाच्या मर्यादा ओळखून विकासाचे नियोजन करणे म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे. उलट, विकास टिकाऊ बनवणे होय. हे सरकारने वेळीच लक्षात घ्यावे: पाणी संपल्यावर ना विकासाची जाहिरात तहान भागवू शकते, ना उद्योगपतींचा नफा, ना धार्मिक सोहळ्यांचा भव्यपणा!



सरकारच्या विकासाच्या मॉडेलला दुष्काळाचा आरसा दाखवण्याची वेळ आली आहे! पाण्याची टंचाई डोक्यावर येऊन ठेपली असताना बांधकामांचा वेग वाढवणारे, उद्योगांना पाणी देणारे आणि निसर्गाची कत्तल करणारे सरकार विकास करत नाही; ते भविष्यातील संकटाची पायाभरणी करत आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील नद्या, नाले आणि ओढ्यांची पातळी नेहमी फेब्रुवारी-मार्चमध्ये जितकी खाली जाते, तितकी ती यंदा त्याच्या कित्येक महिने आधीच खालावली असल्याची स्थिती असेल, तर हा केवळ चिंतेचा विषय नाही; तो गंभीर इशारा आहे. सरकारला या संकटाची जाणीव आहे का? की संकट प्रत्यक्ष दारात येऊन उभे राहिल्याशिवाय त्याची दखल घ्यायची नाही, हेच सरकारी धोरण आहे?

मुंबई आणि परिसरात बांधकामांचा धडाका सुरू आहे. नव्या इमारती, व्यावसायिक संकुले, पायाभूत सुविधा आणि वाढत्या शहरीकरणासाठी प्रचंड पाणी लागणार आहे. तरीही या वाढत्या मागणीचा उपलब्ध जलसाठ्याशी मेळ घातला जात आहे का? नव्या बांधकामांना परवानग्या देताना भविष्यातील पाणीपुरवठ्याचा ठोस हिशेब केला जातो का? की इमारती उभ्या करण्याची घाई आहे, पण त्यात राहणाऱ्या माणसांना पाणी कुठून देणार, याचे उत्तर नाही? विकासाच्या नावाखाली लोकसंख्या आणि पाण्याची मागणी वाढवत राहायची, पण पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मात्र निसर्गावर सोपवायची, हा कसला विकास? उद्योगांचा नफा महत्त्वाचा की माणसांची तहान?

डेटा सेंटर, इथेनॉल निर्मिती, शीतपेय उद्योग, मद्यनिर्मिती, वस्त्रोद्योग अशा अनेक क्षेत्रांना पाणी लागते. प्रत्येक उद्योगाची पाण्याची गरज, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक योगदान वेगवेगळे असते. त्यामुळे सर्व उद्योग सरसकट बंद करावेत, असा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो पाण्याच्या वापरातील प्राधान्यक्रमाचा. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असताना कोणत्या उद्योगाला किती पाणी द्यायचे, कोणत्या उद्योगाने प्रक्रिया केलेले सांडपाणी पुन्हा वापरायचे आणि कोणत्या उत्पादनांवर तात्पुरते निर्बंध घालायचे, याचे धोरण सरकारकडे असायला नको का? शीतपेय, मद्य, वस्त्रोद्योग आणि इतर औद्योगिक उत्पादनांसाठी पाणी वापरले जात असताना सामान्य माणसाला मात्र पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जाते. डेटा सेंटरसारख्या डिजिटल अर्थव्यवस्थेशी संबंधित सुविधांचेही नियोजन करताना त्यांच्या प्रत्यक्ष पाणीवापराचा, शीतकरणाच्या तंत्रज्ञानाचा आणि स्थानिक जलस्रोतांवरील परिणामाचा हिशेब आवश्यक आहे.

जंगलतोड करून विकासाचे प्रकल्प उभारायचे आणि नंतर पाऊस कमी पडल्यावर दुष्काळाचे रडगाणे गायचे, हा विरोधाभास आपण किती काळ सहन करणार? जंगले नष्ट करून पावसाची अपेक्षा कशी ठेवणार? जंगले स्थानिक जलचक्र, मातीतील ओलावा, भूजल पुनर्भरण आणि पर्यावरणीय समतोल टिकवण्यासाठी महत्त्वाची असतात. पावसावर अनेक घटकांचा परिणाम होतो. तरीही जंगलांचा नाश करून पर्यावरणीय स्थैर्य धोक्यात घालणे म्हणजे आपल्या जलसुरक्षेचाच पाया कमकुवत करणे होय.

लाखो भाविक एकत्र येणाऱ्या कुंभमेळ्यासारख्या प्रचंड आयोजनासाठी पिण्याचे पाणी, स्वच्छता, स्नानघाट आणि इतर सुविधांची मोठी व्यवस्था करावी लागते. एवढ्या मोठ्या आयोजनाचे नियोजन करताना स्थानिक नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर किती परिणाम होईल, याचे पारदर्शक मूल्यमापन आवश्यक नाही काय? धार्मिक श्रद्धेचा आदर असला, तरी पाण्याच्या मर्यादांकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार कोणालाही नाही.

मोठ्या आयोजनासाठी पाणी उपलब्ध करून देताना स्थानिक नागरिकांना टंचाईचा सामना करावा लागणार नाही, याची हमी सरकारने द्यायला हवी. पाणी किती उपलब्ध आहे, किती खर्च होणार आहे आणि त्याची भरपाई कशी केली जाणार आहे, हे जनतेला स्पष्टपणे सांगितले पाहिजे. पाण्याचे संकट गडद झाले की समुद्राचे खारे पाणी गोड करून वापरण्याचा पर्याय पुढे केला जातो. समुद्राच्या पाण्याचे क्षारीकरण दूर करणारे प्रकल्प निश्चितच उपयोगी ठरू शकतात. मात्र, ते सहजसाध्य किंवा सर्व समस्यांवरचा एकमेव उपाय नाहीत. समुद्राचे पाणी गोड केले तरी ते शेतीसाठी वापरणे आपोआप किफायतशीर ठरत नाही. पिकांचा प्रकार, पाण्याची गुणवत्ता, ऊर्जा खर्च आणि वाहतुकीचा खर्च यांचा विचार करावा लागतो. म्हणजेच, समुद्राचे पाणी गोड करण्याचा पर्याय उपलब्ध आहे म्हणून पाण्याचे संकट सुटले, असे समजणे मूर्खपणाचे ठरेल. त्यापेक्षा पावसाचे पाणी साठवणे, धरणांतील गळती कमी करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा औद्योगिक वापर वाढवणे, भूजलाचे पुनर्भरण करणे आणि शेतीत पाणीबचतीच्या पद्धतींचा विस्तार करणे या उपायांनाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल.

मग यावर उपाय म्हणून सरकारने नेमके काय करायला हवे? पहिली गोष्ट म्हणजे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील सध्याचा जलसाठा, आगामी महिन्यांतील अपेक्षित मागणी आणि संभाव्य तूट यांचा पारदर्शक हिशेब जनतेसमोर ठेवावा. दुसरी गोष्ट म्हणजे पाणीटंचाईचा धोका असलेल्या भागांमध्ये नव्या बांधकामांना परवानगी देताना उपलब्ध पाण्याची क्षमता आणि विद्यमान नागरिकांच्या गरजा यांचा कठोरपणे विचार करावा. तिसरी गोष्ट म्हणजे मोठ्या उद्योगांच्या पाणीवापराचे लेखापरीक्षण करावे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर, पाणीबचतीचे तंत्रज्ञान आणि पाणीवापराच्या मर्यादा यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. चौथी गोष्ट म्हणजे जंगलतोड, पाणलोट क्षेत्रांचा ऱ्हास आणि नैसर्गिक जलस्रोतांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी कठोर पावले उचलावीत. पाचवी गोष्ट म्हणजे मोठ्या धार्मिक, पर्यटनविषयक किंवा व्यावसायिक आयोजनांसाठी स्वतंत्र जलनियोजन करावे. स्थानिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या हक्काला प्राधान्य द्यावे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची वाट न पाहता त्वरित कृती करावी.


कोरोनासारख्या संकटाने जगाला एक गोष्ट शिकवली की, संकटाची चाहूल लागलेली असताना दुर्लक्ष केले, तर नंतर त्याची किंमत अनेक पटींनी मोजावी लागते. पाण्याच्या बाबतीतही हाच नियम लागू होतो. संकटाची पूर्वसूचना मिळाल्यावर त्याचा अंदाज घेऊन वेळेत वृत्ती करणे, हेच सुशासनाचे लक्षण आहे. आज पाणी उपलब्ध असताना त्याचा वापर कसा करायचा, भविष्यातील मागणी कशी भागवायची आणि नैसर्गिक जलस्रोत कसे जपायचे, हे ठरवणे ही सरकारची जबाबदारी आहे. नागरिकांनी पाणी वाया घालवू नये, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण नागरिकांनी बादलीतून आंघोळ करावी, नळ बंद ठेवावेत आणि पाण्याची बचत करावी, असे सांगण्यापूर्वी सरकारनेही उद्योग, बांधकामे आणि मोठ्या आयोजनांमधील पाण्याच्या वापराचा कठोर हिशेब द्यायला हवा. पाण्याच्या संकटाचा सर्वाधिक फटका गरीब आणि वंचित लोकांना बसण्याची शक्यता असते. सरकारने हे वास्तव समजून घेतले नाही, तर सिमेंटची जंगले वाढतील, उद्योगांचे उत्पादन वाढेल, मोठमोठे प्रकल्प उभे राहतील; पण त्या विकासाच्या मध्यभागी माणसाला प्यायला पाणी नसेल, तर त्या विकासाला अर्थ काय?

निसर्गाच्या मर्यादा ओळखून विकासाचे नियोजन करणे म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे. उलट, विकास टिकाऊ बनवणे होय. हे सरकारने वेळीच लक्षात घ्यावे: पाणी संपल्यावर ना विकासाची जाहिरात तहान भागवू शकते, ना उद्योगपतींचा नफा, ना धार्मिक सोहळ्यांचा भव्यपणा!

जगदीश काबरे

जलतारा, शोषखड्डे शेतकऱ्यांसाठी वरदान

पाण्याचा थेंब न् थेंब वाचवण्यासाठी आणि भूजलपातळी वाढवण्यासाठी 'जलतारा' व 'शोषखड्डे' ही काळाची गरज बनली आहे. पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करून संकटावर मात करण्यासाठी हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.



सन २०२६ मध्ये राज्यात मान्सूनचे प्रमाण अत्यंत कमी राहिल्याने शेतकऱ्यांना पावसाचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. शेतीला आवश्यक तेवढा पाऊस न झाल्याने कडक उन्हात पिके करपून जाण्याचा आणि उत्पादन घटण्याचा धोका आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची समस्याही गंभीर होऊ शकते. त्यामुळे पाण्याचा वापर उद्यापासून नव्हे, तर आजपासूनच जपून करणे गरजेचे आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. मात्र, राज्यातील अनेक शेतकऱ्यांना आतापासूनच पाणीटंचाईचे चटके सहन करावे लागत आहेत.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाकडून दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची आगाऊ मदत देण्यात येणार आहे. मात्र, दिवाळीच्या तोंडावर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही वाढत आहेत. त्यात ४ ऑक्टोबर २०२२ रोजी सुरू करण्यात आलेला गोरगरिबांचा 'आनंदाचा शिधा' १० मार्च २०२५ रोजी अधिकृतपणे बंद करण्यात आला. त्यामुळे दुष्काळाच्या झळांसोबतच महागाईचाही सामना सर्वसामान्यांना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत पाण्याची काटकसर करणे ही काळाची गरज बनली आहे. गेल्या काही दिवसांपासून कडक ऊन पडत आहे. कालपासून ढगाळ वातावरण आहे. उद्या कदाचित मुसळधार पाऊसही पडेल. मात्र, पाऊस कधी आणि किती पडेल, याची खात्री नाही. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीचा विचार करताना पाण्याचे योग्य नियोजन करणे महत्त्वाचे आहे. शेवटी पाणी हेच जीवन आहे.

महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने नदी-नाले, तलाव, धरणे आणि विहिरींमधील पाणीसाठा घटत आहे. काही ठिकाणी मे महिन्यासारखे वातावरण जाणवत आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जलतारा आणि शोषखड्डे तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. अधूनमधून पडणाऱ्या पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरावे, यासाठी शेतात तसेच घराजवळ खड्डे खोदले जात आहेत.या कामासाठी नागरिकांनी आपापसांतील वाद बाजूला ठेवून एकत्र येणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत जिरवले, तर भविष्यातील पाणीटंचाईवर काही प्रमाणात मात करता येईल. यासाठी शेतात जलतारा आणि घराशेजारी शोषखड्डे तयार करण्याचा उपक्रम राबवला जात आहे.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी २०२० मध्ये 'आर्ट ऑफ लिव्हिंग' आणि समाजकार्याच्या माध्यमातून डॉ. पुरुषोत्तम वायाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी या उपक्रमाची सुरुवात केली. सुरुवातीला गावांमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला. त्यानंतर लोकसहभागातून वाशीम, जालना आणि सातारा जिल्ह्यांत खड्डे खोदण्यात आले. या उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत त्याला अधिकृत शासकीय स्वरूप दिले. सध्या राज्यातील अनेक जिल्ह्यांत हा उपक्रम सुरू आहे.

शेतात जलतारा खड्डा तयार केल्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. त्यामुळे भूजलपातळी वाढू शकते आणि पिकांना आवश्यक ओलावा मिळतो. मातीची धूप रोखण्यासही मदत होते. त्यामुळे शाश्वत शेतीसाठी जलतारा खड्डा उपयुक्त ठरू शकतो. यासाठी पाच फूट रुंद, पाच फूट लांब आणि सहा फूट खोल खड्डा खोदावा लागतो. संबंधित जमिनीचे सातबारा आणि आठ-अ उतारे असणे, तसेच क्षेत्र ४० गुंठ्यांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. या अटी पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांना ४,७०० रुपयांचे शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे घरात वापरलेले पाणी जमिनीत मुरवण्यासाठी घराशेजारी शोषखड्डा तयार करता येतो. त्यामुळे परिसर स्वच्छ आणि आरोग्यदायी राहण्यास मदत होते. सांडपाणी साचून राहण्याचे प्रमाण कमी झाल्याने डासांची पैदासही रोखता येते. त्याचबरोबर भूजलपातळी वाढण्यास आणि पर्यावरण संवर्धनास हातभार लागतो. यासाठी घराचा असेसमेंट उतारा, सातबारा आणि अडीच हेक्टरपेक्षा जास्त जागा असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. शोषखड्ड्यासाठी चार फूट रुंद, चार फूट लांब आणि चार फूट खोल खड्डा खोदावा लागतो. यासाठी २,६०० रुपयांचे शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. मात्र, या अनुदानासाठी ठरवलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या जमीनमालकांनाच सरकारी मदत मिळणार आहे. काही शेतकरी स्वतःच्या खर्चानेही असे खड्डे तयार करू शकतात. मात्र, आवश्यक अटी पूर्ण होत नसल्यास त्यांना शासकीय अनुदान मिळणार नाही. तरीही भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता असे खड्डे तयार करणे फायदेशीर ठरू शकते. सध्या काही ठिकाणी पाणीकपात सुरू आहे, तर काही भागांत टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. विकसनशील देशासाठी ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी जलतारा आणि शोषखड्डे तयार करणे गरजेचे आहे. आज पाऊस कमी असला, तरी उद्या तो नक्कीच पडेल. त्यावेळी वाहून जाणारे पाणी या खड्ड्यांमध्ये साचून जमिनीत मुरेल. त्यामुळे भूजलपातळी वाढण्यास मदत होईल. शेतकऱ्यांवर कितीही संकटे आली, तरी ते आशा सोडत नाहीत. भूतकाळातील अडचणी मागे टाकून ते वर्तमानात जगतात आणि भविष्याची तयारी करतात. राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता पाण्याचे संवर्धन करणे अत्यावश्यक आहे. शेतात जलतारा आणि घराशेजारी शोषखड्डे तयार केल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होईल. म्हणूनच जलतारा आणि शोषखड्डे हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरू शकतात.

रवींद्र तांबे

जलदेवतेचे पावित्र्य जपा

पूर्वी नदीचे, विहिरीचे पाणी आणून दैनंदिन कार्य करावे लागत असे. आता घरोघरी पाणी सहज उपलब्ध झाले आहे. त्यामुळे त्याची किंमत किती, याची कल्पनाही कुणाला येत नाही. विकतचे पाणी घेऊनसुद्धा त्याचा योग्य विनियोग होत आहे, असे दिसत नाही. पण यंदाच्या पावसाची स्थिती बघता दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. आपले जीवन पंचमहाभूतांनी सामावलेले आहे. त्यांच्याविषयी आपल्या कृतीतून कृतज्ञता व्यक्त होणे आवश्यक आहे.भगवान मनु यांनी जलसंवर्धनासंदर्भात महत्त्वाचे नियम सांगितले आहेत, 'पाणी हे नारायणाचे रूप असल्याने त्याला पवित्र मानावे. नदी ही केवळ जलस्रोत नसून जीवनदायिनी आहे. त्यामुळे कोणत्याही नदीत घाण किंवा कचरा टाकू नये. नदीचे पावित्र्य जपणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. नदीत कपडे धुण्याऐवजी पाणी बाजूला घेऊन कपडे धुवावेत. अंगाला तेल लावून नदीत स्नान करू नये. तसेच नदीच्या पाण्यात चूळ भरून टाकू नये.

प्रांजली ब्रम्हे

मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

45 बौद्ध विहारे प्रथमच एकाच विचारमंचावर,धम्म चळवळीला संघटनात्मक बळ!

डॉ. नीरज वाघमारे यांच्या पुढाकारातून सामूहिक वर्षावासाची सांगता..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २ : यवतमाळच्या धम्म चळवळीत केवळ धार्मिक सोहळा न ठरता सामाजिक एकजुटीचा नवा अध्याय लिहिणारा सामूहिक वर्षावास सांगता समारंभ हजारो बौद्ध बांधवांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. शहरातील तब्बल ४५ बौद्ध विहारे आणि विविध धम्म मातृसंस्थांना प्रथमच एका विचारमंचावर आणण्याचा उपक्रम मुख्य आयोजक डॉ. नीरज वाघमारे यांच्या पुढाकारातून साकार झाला. विखुरलेल्या संघटनात्मक शक्तीला एकत्र आणण्याचा हा प्रयत्न यवतमाळच्या धम्म चळवळीसाठी महत्त्वपूर्ण ठरला.

बौद्ध विहारांचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून परस्परांतील मतभेद बाजूला सारणे, संवाद आणि समन्वय वाढविणे तसेच सामाजिक परिवर्तनासाठी सामूहिक ताकद उभी करणे, हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश होता.





भारतीय बौद्ध महासभेच्या विविध शाखा, समण संघ, सद्धम्म प्रचार केंद्र, धम्ममल्ल विपश्यना केंद्र, त्रिरत्न बौद्ध महासंघ, समता सैनिक दल, बौद्ध संस्कार संघ यांसह विविध संस्थांचे प्रतिनिधी, भिक्खू संघ आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सहभागी झाले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रामदास वीर, नगरसेविका मीराताई वीर, संजय इंगळे, केशव भागवत, आनंद भगत, अरविंद दिवे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संतोष राऊत यांनी केले, तर आभार संघपाल कांबळे यांनी मानले.

अडीच तासांच्या धम्मदेशनेने उपस्थित मंत्रमुग्ध

सोहळ्याचे प्रमुख आकर्षण पूजनीय भंते ज्ञानज्योती महास्थवीर यांची धम्मदेशना ठरली. तब्बल अडीच तास त्यांनी बोधिसत्त्वाचा बुद्धत्वाकडे प्रवास, आर्य अष्टांगिक मार्ग, प्रतीत्यसमुत्पाद आणि त्रिपिटकातील तत्त्वज्ञानाचे सखोल विवेचन केले. धर्मांतराच्या सात दशकांनंतर बौद्ध समाजाची धम्मविषयक वाटचाल, धम्माचरण आणि सामाजिक जबाबदारी यावरही त्यांनी मार्गदर्शन केले. सामाजिक सुरक्षिततेसाठी संघटित व सजग राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

४७ विहारांच्या पदाधिकाऱ्यांचा गौरव यावेळी डॉ. नीरज वाघमारे

यांच्या हस्ते शहरातील ४७ बौद्ध विहारांचे अध्यक्ष व सचिव यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विविध बौद्ध मातृसंस्थांच्या जिल्हाध्यक्षांचाही सन्मान करण्यात आला.

धम्म चळवळीसमोर आता एकजुटीचे आव्हान

४७ विहारांना एका व्यासपीठावर आणण्यापलीकडे ही एकजूट नियमित संवाद, सामूहिक सामाजिक उपक्रम आणि संघटनात्मक सहकार्यात कितपत उतरते, याकडे आता समाजाचे लक्ष राहणार आहे.

विहारे परिवर्तनाची केंद्रे व्हावीत!

मनोगतात डॉ. नीरज वाघमारे यांनी बुद्ध विहारे केवळ धार्मिक उपासनेची केंद्रे न राहता शैक्षणिक जागृती, सामाजिक प्रबोधन, सांस्कृतिक जतन आणि वैचारिक परिवर्तनाची केंद्रे बनली पाहिजेत, असे प्रतिपादन केले. 'विहारे वेगवेगळी असली तरी आपला धम्म एक, बाबासाहेब एक आणि सामाजिक परिवर्तनाचे ध्येयही एकच आहे. वैचारिक मतभेद असू शकतात; मात्र मनभेद विसरून समाजहितासाठी एकत्र आले पाहिजे. व्यक्तीपेक्षा समाज आणि मतभेदांपेक्षा बंधुभाव मोठा मानला पाहिजे,' असे आवाहन त्यांनी केले.

दिवाळीच्या प्रतीक्षेत लाडक्या बहिणींची निराशा, आनंदाचा शिधा गायब!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पांढरकवडा, दि. २ : दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना राज्यातील लाडक्या बहिणींना शासनाकडून मिळणाऱ्या आनंदाच्या शिध्याची प्रतीक्षा कायम आहे. दरवर्षी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना सणाचा आनंद घेता यावा, यासाठी शासनाकडून आनंदाचा शिधा देण्याची घोषणा केली जाते. मात्र यंदा दिवाळी जवळ आली तरी अनेक लाभार्थी महिलांपर्यंत आनंदाचा शिधा पोहोचलेला नसल्याने महिलांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिवाळी म्हणजे सर्वसामान्य कुटुंबांसाठी आनंदाचा आणि उत्साहाचा सण. वाढत्या महागाईमुळे आधीच घरखर्च भागवताना महिलांना मोठी कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणाऱ्या आनंदाच्या शिध्यामुळे दिवाळीच्या खर्चाला काही प्रमाणात हातभार लागेल, अशी अपेक्षा महिलांना होती. मात्र सण जवळ आला तरी शिध्याबाबत स्पष्टता नसल्याने लाभार्थी महिलांचा हिरमोड झाला आहे. एकीकडे शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना मदतीचा हात दिल्याचा दावा केला जात असताना, दुसरीकडे दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणासाठी जाहीर होणाऱ्या आनंदाच्या शिध्याचे वितरण वेळेत का होत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. रेशन दुकानांमध्ये शिधा कधी उपलब्ध होणार, त्याचे वितरण कधी सुरू होणार आणि लाभार्थ्यांना तो दिवाळीपूर्वी मिळणार का, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे. लाडक्या बहिणींना दिवाळीच्या सणात शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची अपेक्षा होती. मात्र आनंदाचा शिधाच गायब असल्याने शासनाच्या घोषणांचे प्रत्यक्ष लाभात रूपांतर कधी होणार, असा सवाल लाभार्थी महिलांकडून उपस्थित केला जात आहे.

थोडक्यात

पारंपरिक शेतीच्या चौकटीतून बाहेर पडा उत्पादन खर्च कमी करा - गोविंदराव देशमुख (सवनेकर)

महागाव : नापिकी, कर्जबाजारीपणा आणि शेतमालाला मिळणारा



कवडीमोल भाव यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. सरकारे बदलतात; मात्र शेतकऱ्यांच्या हिताचे आयात-निर्यात धोरण बदलत नाही. भाव वाढताच आयातीचा हस्तक्षेप करून बाजारभाव पाडले जातात. त्यामुळे केवळ कर्जमाफी आणि सरकारी मदतीच्या घोषणांवर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतीचे धोरण बदलण्याची वेळ आली आहे, असे परखड मत गोविंदराव देशमुख (सवनेकर) यांनी व्यक्त केले. शेती नफ्याची करायची असेल तर उत्पादन वाढविण्यापेक्षा उत्पादन खर्च कमी करण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी त्यांनी एसआरटी (SRT) शेती पद्धतीचा पर्याय मांडला. बियाणे, खते, मजुरी व मशागतीचा खर्च कमी करून शेती अधिक किफायतशीर करता येते, असा त्यांचा दावा आहे.
या पद्धतीमुळे जोडव्यवसायासाठी वेळ, जमिनीची सुपीकता आणि नैसर्गिक अन्नधान्य उत्पादनाला चालना मिळू शकते. शेतकऱ्यांनी सुरुवातीला एक-दोन गुंठ्यांत प्रायोगिक तत्त्वावर एसआरटी पद्धतीचा अवलंब करून प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. सरकारी मदतीची वाट पाहण्यापेक्षा खर्च कमी करणारी स्वयंपूर्ण शेती स्वीकारा, असे आवाहन देशमुख यांनी केले.

स्फोटकांच्या काळा बाजाराचे जाळे उघड सहा जणांना बेड्या!

बनावट नोंदी करून जिलेटिन-कॉर्टेक्सची बेकायदेशीर विक्री
उमरखेड : ढाणकी रोडवरील ट्रॅक्टर वेल्डिंग दरम्यान झालेल्या भीषण स्फोटात पाच जणांचा मृत्यू आणि दहा जण गंभीर जखमी झाल्याच्या घटनेने आता धक्कादायक वळण घेतले आहे. या दुर्घटनेच्या तपासातून स्फोटक पदार्थांच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीचे रॅकेट उघडकीस आले असून, परवान्याचा गैरवापर करून स्फोटकांचा काळाबाजार करणाऱ्या सहा जणांना पोलिसांनी अटक केली आहे. २६ सप्टेंबर रोजी घडलेल्या या दुर्घटनेनंतर स्फोटकांचा पुरवठा नेमका कुठून झाला, याचा तपास पोलिसांनी सुरू केला होता. घटनास्थळावरून जप्त केलेल्या स्फोटक पदार्थांच्या बारकोडने तपासाला महत्त्वाची दिशा दिली. नागपूर येथील सोलार इंडस्ट्रीज आणि पेट्रोलियम अँड एक्सप्लोसिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन (PESO) यांच्या अधिकृत नोंदींची पडताळणी केल्यानंतर गैरव्यवहाराचे धागेदोरे समोर आले. तपासात अधिकृत कामासाठी मंजूर असलेला स्फोटकांचा साठा प्रत्यक्षात अन्यत्र वळविणे, नोंदवही व संगणकीय प्रणालीत बनावट नोंदी तयार करणे आणि आवश्यक परवाना नसलेल्या आप्पाराव बोक्से यांना जिलेटिन व कॉर्टेक्सची विक्री केल्याचे निष्पन्न झाले. नियमबाह्य साठवणूक, वाहतूक आणि निष्काळजी हाताळणी मुळेच वेल्डिंग दरम्यान स्फोट झाल्याचा तपासातील निष्कर्ष आहे. या प्रकरणात दिगंबर डुकरे, राजेंद्र वानखेडे, जगदीश गुर्जर, अर्जुनसिंग राजपूत, गोपाल चौधरी आणि लादूलाल गुर्जर या सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

आठवणीतील नाना यांची शोकसभा भावपूर्ण वातावरणात संपन्न..!

पुसद : येथील सप्तगिरी नगरमधील 'श्री स्वामी समर्थ केंद्र' येथे ज्येष्ठ अभिनेते व सामाजिक कार्यकर्ते नाना पाटेकर यांना आदरांजली वाहण्यासाठी 'आठवणीतील नाना' जाहीर शोकसभा भावपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सभेचे नाम फाउंडेशनच्या पुढाकारात आणि विविध सामाजिक व सेवाभावी संस्थांच्या वतीने संयुक्तपणे आयोजन करण्यात आले होते.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाम फाउंडेशनचे स्वप्नील देशमुख यांनी अत्यंत भावुक होत केले. त्यांनी पुसद परिसरात नाम फाउंडेशनच्या कार्याची माहिती देत दिवंगत नाना पाटेकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. लोकांनी लोकांसाठी सुरू केलेली ही एक लोकचळवळ असल्याचे सांगत, प्रत्येकाने आता नाना आपल्यातच आहेत असे समजून दुष्काळ काळात काम करत राहणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी माजी आमदार एड. निलय नाईक, माजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, डिवायएसपी अमरसिंह मोहिते, नगराध्यक्ष एड. मोहिनी नाईक, संभाजी ब्रिगेडचे सुधीर देशमुख, काँग्रेसचे गटनेते डॉ. मोहम्मद नदीम यांनी दिवंगत नाना पाटेकर यांच्या चित्रपट सृष्टीसह सामाजिक कार्याचा गौरव केला. नानांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे विचार त्यांनी व्यक्त केले. सप्त खंजरी वादक सत्यपाल महाराज यांचे शिष्य पंकज पाल महाराज यांनी अध्यात्मातून जीवनाचे सार सांगितले. मानवी जीवन क्षणभंगुर असले, तरी नाना पाटेकर यांनी आपल्या कर्मातून जीवन सार्थकी लावले. त्यानंतर राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक यशवंत देशमुख यांनी ज्ञानेश्वरीतील कर्मयोगाच्या विचारांचा संदर्भ दिला. मानवतेच्या कल्याणासाठी निरंतर कर्म करण्याचा आदर्श नाना पाटेकर यांच्या जीवनातून मिळतो, असे प्रतिपादन केले.

शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या दारी माणुसकीचा दिवा!

'एक दिवा त्यांच्या दारी' उपक्रमातून ५० कुटुंबांना दिवाळीचा आधार.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २ : शेतकरी आत्महत्येने उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांच्या आयुष्यात दिवाळीचा आनंद पोहोचविण्यासाठी समाजातील संवेदनशील घटकांनी पुढाकार घेतला. शेतकरी संवेदना मंच व संलग्न सामाजिक संस्थांच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'एक दिवा त्यांच्या दारी' या उपक्रमातून यवतमाळ तालुक्यातील सुमारे ५० शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना किराणा साहित्याचे किट, दिवाळी फराळ आणि साड्यांचे वाटप करण्यात आले.

रविवारी (१ नोव्हेंबर) केमिस्ट भवन, शिवाजी गार्डन रोड येथे हा उपक्रम पार पडला. शेतकरी आत्महत्या झाल्यानंतर संबंधित कुटुंबांच्या वाट्याला केवळ आर्थिक संकटच नव्हे, तर सामाजिक आणि मानसिक संघर्षही येतो.



अशा कुटुंबांसाठी दिवाळीसारखा सणही अनेकदा आनंदाऐवजी दुःखाची आठवण घेऊन येतो. या वास्तवाची जाणीव ठेवत त्यांच्या दारी मदतीचा आणि माणुसकीचा दिवा पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमाला भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय कांबळे, तहसीलदार योगेश देशमुख, निवासी तहसीलदार एकनाथ बिजवे, डॉ. सारिका शहा, डॉ. निकिता चव्हाण, नगरसेविका शैलाताई मिर्झापुरे, जलदूत गौरव आगाशे, सुरेशभाऊ राठी, राजूभाऊ पडगिलवार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. महासंघाचे विभागीय अध्यक्ष विजयकुमार बुंदेला, कमलेश बघेल, प्रतीक तराळकर, प्रशांत कातकर, प्रतिभा पवार आणि कल्पना कुल्लारे यांनी उपक्रमासाठी पुढाकार घेतला. प्रकल्प समन्वयक डॉ. दीपक घरझोडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी केवळ सहानुभूती व्यक्त करून शेतकरी कुटुंबांचे प्रश्न सुटणार नाहीत, तर त्यांच्या पुनर्वसनासाठी आणि स्वावलंबनासाठी समाजाने सातत्याने मदतीचा हात पुढे करणे आवश्यक असल्याचा सूर मान्यवरांनी व्यक्त केला. दिवाळीच्या एका दिवसापुरती मदत न थांबता या कुटुंबांच्या जगण्याला कायमचा आधार मिळणार का, हा प्रश्नही या निमित्ताने अधोरेखित झाला.

नॅचरल शुगरच्या कर्मचाऱ्यांना १० टक्के पगारवाढ दिवाळीसाठी २५ टक्के बोनस जाहीर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. २ : गुंज-सवना नॅचरल उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष श्री.बी. बी. ठोंबरे यांनी नॅचरल शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज लिमिटेड, युनिट क्रमांक २, गुंज-सवना, ता. महागाव येथील कारखान्यातील कर्मचाऱ्यांसाठी १० टक्के पगारवाढ आणि येत्या दिवाळी सणानिमित्त २५ टक्के बोनस जाहीर केला आहे. याबाबतची घोषणा नुकत्याच झालेल्या कर्मचारी सभेत करण्यात आली.



यावेळी बोलताना बी. बी. ठोंबरे म्हणाले की, नॅचरल उद्योग समूहाने नेहमीच शेतकरी आणि कर्मचारी या दोघांचेही हित जपण्याचा प्रयत्न केला आहे. साखर उद्योगामध्ये कर्मचाऱ्यांना सर्वाधिक बोनस देण्याची परंपरा नॅचरल शुगरने कायम ठेवली आहे. कर्मचाऱ्यांनी दिवाळीचा सण आनंदाने साजरा करावा, या उद्देशाने यंदाही २५ टक्के बोनस देण्यात येणार आहे. तसेच राज्य शासनाच्या त्रिपक्षीय समितीच्या शिफारशीनुसार कारखान्यातील सर्व कर्मचाऱ्यांना १ ऑक्टोबर २०२६ पासून १० टक्के पगारवाढ देण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. याशिवाय चालू गळीत हंगामात ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कारखान्यात गाळपासाठी आलेल्या उसाच्या बिलाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम दिवाळी सणानिमित्त शेतकऱ्यांना ५ नोव्हेंबरपासून धनादेशाद्वारे वाटप करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. कर्मचाऱ्यांना पगारवाढ व बोनस जाहीर केल्याबद्दल चेअरमन श्री.बी. बी. ठोंबरे व कार्यकारी संचालक यांचे कर्मचाऱ्यांनी आभार मानत समाधान व्यक्त केले. नॅचरल शुगरच्या या निर्णयामुळे कारखाना कर्मचारी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेवर संजय देशमुख अध्यक्षपदी..!

विजय जाधव व नितीन भुतडा उपाध्यक्षपदी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २ : यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्तेवरून सुरू असलेल्या राजकीय तिढ्याला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. बँकेच्या अध्यक्षपदी शिवसेना (शिंदे गट) समर्थित खासदार संजय देशमुख यांची बिनविरोध निवड झाली असून, प्रथम उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे विजय जाधव, तर द्वितीय उपाध्यक्षपदी भाजपचे नितीन भुतडा यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीने जिल्हा बँकेतील राजकीय सत्तासमीकरणाचे नवे चित्र समोर आले आहे. या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो पालकमंत्री संजय राठोड व माजी मंत्री मदन येरावर यांचा पुढाकाराने बँकेच्या सत्तेसाठी वेगवेगळ्या राजकीय भूमिका आणि पक्षीय समीकरणांमुळे निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी त्यांनी सर्वपक्षीय



मात्र, बिनविरोध निवडीच्या जल्लोषापलीकडे बँकेसमोरील आर्थिक आव्हानांचे वास्तव दुर्लक्षित करून चालणार नाही. शेतकऱ्यांची आर्थिक नाडी म्हणून ओळखली जाणारी ही बँक सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत आहे. कर्जपुरवठा, थकबाकी व आर्थिक शिस्त यांसारख्या प्रश्नांवर नव्या नेतृत्वाला ठोस निर्णय घ्यावे लागणार आहेत. संचालकांना एकत्र आणण्याची भूमिका घेतली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांच्यासह विविध पक्षांच्या संचालकामध्ये समन्वय साधत अध्यक्ष आणि दोन्ही उपाध्यक्षांची निवड बिनविरोध घडवून आणण्यात त्यांना यश आले. त्यामुळे या संपूर्ण राजकीय घडामोडीत संजय राठोड यांची भूमिका निर्णायक ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. विशेषतः जिल्ह्यात महायुतीसह विरोधी पक्षांचे संचालक एकाच व्यासपीठावर आणून सहमतीचे सूत्र तयार करणे, हे या निवडीचे राजकीय वैशिष्ट्य ठरले. जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती, शेतीमालाचे घसरलेले दर आणि शेतकऱ्यांची वाढती आर्थिक कोंडी पाहता नव्या पदाधिकाऱ्यांसमोर मोठे आव्हान आहे. आता राजकीय एकमताचे रूपांतर बँकेच्या आर्थिक पुनरुज्जीवनात होते का आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा मिळतो का, याकडे जिल्ह्यातील शेतकरी सभासदांचे लक्ष लागले आहे.

अबब ७० हजारांची एलईडी ५.५० लाखांत!

पुसद नगरपालिकेच्या खर्चावर प्रश्नचिन्ह, चार चौकातील एलईडी टीव्ही बंद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २ : शहरात स्वच्छता आणि पर्यावरणविषयक जनजागृती करण्याच्या नावाखाली पुसद नगरपालिकेने केलेल्या लाखो रुपयांच्या खर्चावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बाजारात सुमारे ७० हजार रुपये किमतीचा असल्याचा दावा करण्यात येणारा एलईडी टीव्ही खरेदीसाठी तब्बल ५ लाख ५० हजार रुपये खर्च दाखविण्यात आल्याची चर्चा असून, चार प्रमुख चौकांत बसविलेले एलईडी टीव्ही सध्या बंद अवस्थेत आहेत.

त्यामुळे जनजागृतीचा उद्देश साध्य झाला की केवळ निधी खर्च करण्याची औपचारिकता पार पडली, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत माहिती, शिक्षण, संवाद आणि वर्तणूक बदल या घटकांसाठी पालिकेला निधी प्राप्त झाला होता. या





निधीतून एकूण २७ लाख ८६ हजार ९०० रुपये खर्च झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी चारचाकी वाहनावर अवघ्या १७ दिवसांच्या जाहिरातीसाठी २३ लाख ८ हजार रुपये, तर एलईडी टीव्ही खरेदीसाठी ५ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आल्याचा आरोप आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा गांधी चौक, गोधाजीराव मुखरे चौक आणि वसंतराव नाईक चौक येथे दोन ते तीन महिन्यांपूर्वी हे डिजिटल फलक बसविण्यात आले. मात्र, आज ते बंद पडल्याने जनजागृतीचा उद्देशच धुळीस मिळाला आहे. एलईडी खरेदीचे दरपत्रक, निविदा प्रक्रिया, बिलांची तपासणी आणि जाहिरातींच्या खर्चाचा तपशील सार्वजनिक करावा. प्रत्यक्ष बाजारभाव आणि खरेदीदरातील तफावत किती, याची स्वतंत्र चौकशी करावी. करदात्यांच्या पैशांचा विनियोग झाला असेल तर त्याचा हिशेब देण्याची जबाबदारी प्रशासनाचीच आहे. संबंधित खर्चाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

दिवाळीच्या तोंडावर निकृष्ट व भेसळयुक्त पदार्थांचा सुळसुळाट..!

अन्न व औषध

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पांढरकवडा, दि. २ : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत मिठाई, खवा, खाद्यतेल, फराळाचे पदार्थ आणि इतर खाद्यपदार्थांची मागणी वाढली आहे. मात्र, या गर्दीच्या काळात निकृष्ट दर्जाचे व भेसळयुक्त पदार्थ विक्रीस येण्याची शक्यता असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सणासुदीच्या काळात खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम राबविणे आवश्यक आहे. शहरातील



केवळ छोट्या दुकानदाराचीच नव्हे, तर नामांकित मिठाईची दुकाने, हॉटेल्स आणि मोठ्या खाद्यपदार्थ विक्री प्रतिष्ठानाचीही तपासणी केली जाणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. खाद्यपदार्थांचे नमुने घेणे, त्यांची गुणवत्ता तपासणे, मुदतबाह्य पदार्थांची विक्री रोखणे तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक आहे. दिवाळीच्या आनंदावर भेसळीचे सावट पडू नये, यासाठी प्रशासनाने वेळीच लक्ष घालून नियमित तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. अन्न व औषध प्रशासनाने तातडीने तपासणी मोहीम राबवून नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सुरक्षा रक्षकाच्या खुनाचा २४ तासांत उलगडा!

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

वणी, दि. २ : कोलारपिंपरी येथील प्रगती नगर कॉलनी परिसरात WCL क्षेत्रीय प्रबंधक कार्यालयात कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकाच्या निर्घृण हत्येचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळला यश आले आहे. घटनेनंतर अवघ्या २४ तासांच्या आत संशयित आरोपीला ताब्यात घेऊन पोलिसांनी खुनाचा गुन्हा उघडकीस आणला.

अंचल मोहन उईके (वय २८, रा. प्रगती नगर कॉलनी, कोलारपिंपरी) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. ओमप्रकाश हिराप्रसाद (वय ४५) हे WCL कार्यालयात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते. ३१ ऑक्टोबरच्या रात्री कार्यालय परिसरात त्यांच्या डोक्यावर, कपाळावर आणि चेहऱ्यावर गंभीर वार करून



त्यांची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी वणी पोलिसांत गुन्हा क्रमांक ११५९/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला असता, घटनेच्या वेळी अंचल उईके घटनास्थळी असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून २ नोव्हेंबर रोजी दुपारी त्याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या माहितीनुसार, कॉलनीत रानडुकरांचा कळप आल्याने मोटारसायकलवरून पडल्याबाबत वरिष्ठांकडे तक्रार करण्यासाठी आरोपी रात्री कार्यालयात गेला होता. मात्र, सुरक्षा रक्षकाने सकाळी येण्यास सांगितल्याने दोघांत वाद झाला. याच वादातून आरोपीने सुरक्षा रक्षकावर प्राणघातक वार करून हत्या केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. पुढील तपास वणी पोलीस करीत आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर निधी कधी मिळणार?

दर्यापूर/ वार्ताहर

नैसर्गिक संकटे, सततची आर्थिक ओढाताण आणि शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आधीच अडचणीत सापडला आहे. त्यातच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळ निधी व प्रोत्साहनपर निधीची तसेच प्रोत्साहनपर निधीची शेतकऱ्यांना प्रतीक्षा लागली आहे.



शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, त्यांना दिलासा मिळावा यासाठी शासनाकडून विविध घोषणा करण्यात आल्या. मात्र या घोषणांचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात कधी जमा होणार, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. अनेक शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करीत असताना मदतीची रक्कम रखडल्याने त्यांच्या चिंतेत भर पडत आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मदतीची नितांत गरज आहे. केवळ घोषणा करून चालणार नाही, तर त्या घोषणांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने दुष्काळ निधी व प्रोत्साहनपर निधीबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करून निधी वितरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.घोषणांनंतर आता प्रत्यक्ष मदतीची प्रतीक्षा असून, बळीराजाला दिलासा देण्यासाठी शासन नेमकी कधी पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नक्षत्र अनासनेची निवड

अंजनगाव बारी-जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय संकुल व जिल्हा परिषद, अमरावती यांच्या वतीने आयोजित जिल्हा व विभागीय जलतरण स्पर्धेत विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित सीबीएसई टायटन्स पब्लिक स्कूलचा विद्यार्थी नक्षत्र अनासने याने उल्लेखनीय कामगिरी केली. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण तलावावर ३१ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या स्पर्धेत त्याची सलग चौथ्या वर्षी १७ वर्षे वयोगटातील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. नक्षत्रने ८०० मीटर फ्रीस्टाइल, २०० मीटर फ्रीस्टाइल आणि १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक या तीन प्रकारांत पात्रता मिळवली असून, राज्यस्तरीय स्पर्धा १६ नोव्हेंबर रोजी सोलापूर येथे होणार आहे. त्याला क्रीडा प्रशिक्षक निलेश फुलंबरकर यांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष डॉ. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे, तसेच टायटन्स पब्लिक स्कूलचे प्राचार्य अजय चौबे, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्रशिक्षक, शिक्षकवृंद व क्रीडाप्रेमींनी नक्षत्रचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.







अमरावती : येत्या दोन दिवसात सुरू होणाऱ्या दीपपर्वानिमित्त संपूर्ण अमरावती शहरातील बाजारपेठ खरेदीकरिता फुलली आहे. मोठ्या व्यापाऱ्यांसह किरकोळ विक्रेते आपले दुकान मांडत असून येथे देखिल खरेदीदारांची गर्दी होत आहे. (छाया : प्रदीप इंगोले)

सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात

संगबाअवि 'अविष्कार २के२६-फेज २' जिल्हास्तरीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन

अमरावती/ का.प्र.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नवीन तंत्रज्ञान, संशोधनपर ज्ञानवर्धन प्रोजेक्टसाठी आयोजित अविष्कार २ के २६-फेज २ डीस्ट्रीक लेवल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील विविध शाखेतील विद्यार्थ्यांनी आपले नाविण्यपूर्ण प्रोजेक्टचे सादरीकरण केले. उद्घाटन सोहळ्यासाठी डॉ. स्वाती शेरेकर, Director, Innovation, incubation & linkages, संगबाअवि ह्यांचे हस्ते आणि डॉ. केतकी कालेले भोकरे, व्यवस्थापकीय संचालक, न्यूरॉन



इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड रिसर्च ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. ह्युमॅनिटीज, लॅंग्वेज फाईन आर्ट, कॉमर्स मॅनेजमेंट अँड लॉ, प्युअर सायन्सेस, अग्रीकल्चर अँड ऑनिमल हसबंडरी, इंजिनिअरिंग अँड टेकनॉलॉजी, मेडिसिन अँड फार्मसी शाखेअंतर्गत पदवी, पदव्युत्तर, डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएचडी रिसर्च) ह्या श्रेणीमध्ये विद्यार्थ्यांचे प्रोजेक्टचे तज्ञांकडून गुणात्मक विश्लेषण करून प्रत्येक श्रेणीकरिता विजेता, उपविजेता १,उपविजेता २ ह्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळ्याकरिता संगबाअविद्यापीठ समन्वयक डॉ. मनीषा कोडापे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. आशिष बर्डेकर सरांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सोहळ्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खेरडे ह्यांनी मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.कार्यक्रमाच्या नियोजनासाठी अधिष्ठाता डॉ. संदीप रोडे, रिसर्च अँड डेव्हलोपमेंट, समन्वयक प्रा. डॉ. मनोज तंबाखे. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगदीश गुप्ता, कार्यकारिणी सदस्य, स्थानिक व्यवस्थापनाचे वेळोवेळी प्रोत्साहन लाभले.

विद्यापीठाचा कबड्डी (पुरूष) संघ घोषित

अमरावती- हरीसिंह गौर विश्वाविद्यालय, सागर (मध्यप्रदेश) येथे १३ ते १८ नोव्हेंबर दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ कबड्डी (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूमध्ये श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा ओम भाकरे, अभिषेक पवार, निखिल डहाणकर, आदित्य वानखडे, व प्रसाद भगत, श्री धाबेकर कला महाविद्यालय, सौरभ मरसकोल्हे व प्रणव खुमकार, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळचा लोकेश टेकाम, महात्मा फुले महाविद्यालय, पातुरचा अर्जून देवकाते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावतीचा सागर चव्हाण, संत गाडगे महाराज महाविद्यालय, वलगांवचा तुषार चव्हाण, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा संकेत सहारे, जय बजरंग कला महाविद्यालय, चन्नी चा कार्तिक राठोड, विनायक विज्ञान महाविद्यालय, ऋतुराज राठोड, अभिषेक सावरकर, चैतन्य खंडारे, पवन तेल्हारकर, ओम अवचार आणि तपस्वी रामराव महाराज कला महाविद्यालय, पोहरादेवीचा खुशाल पवार याचा समावेश आहे.

सणासुदीच्या काळात नागरिकांनी सतर्क राहावे

प्रभारी ठाणेदार रामकृष्ण सोनवणे यांचे मार्गदर्शन

दर्यापूर/ वार्ताहर

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून सर्वत्र सणासुदीची धामधूम सुरू आहे. मात्र, याच गर्दीचा फायदा घेत हातचलाखी करणारे चोरटे तसेच विविध प्रकारे नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळ्याही सक्रिय होण्याची शक्यता असते. त्यामुळे सणासुदीच्या काळात नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी, असे आवाहन दर्यापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी ठाणेदार सोनवणे यांनी केले आहे.

दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत जाताना नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तू, दागिने, मोबाईल व रोख रकमेची विशेष काळजी घ्यावी. हातचलाखी करून पैसे अथवा मौल्यवान वस्तू लंपास करणाऱ्या व्यक्तींपासून सावध राहावे. तसेच दागिने किंवा इतर मौल्यवान वस्तू चमकवून



देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. सोन्या-चांदीच्या वस्तूंची खरेदी नेहमी विश्वासार्ह प्रतिष्ठानांमधूनच करावी. फेरीवाले तसेच घरोघरी विक्रीसाठी येणाऱ्या अनोळखी व्यक्तींबाबतही सतर्कता बाळगावी.

याशिवाय सध्या वाढत्या सायबर गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आर्थिक व्यवहार करताना अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. एटीएममधून पैसे काढताना अनोळखी व्यक्तीची मदत घेऊ नये. आपला एटीएम पिन, बँक खात्याची गोपनीय माहिती अथवा मोबाईलवर आलेला ओटीपी कोणत्याही व्यक्तीला सांगू नये. बँक अधिकारी असल्याचे भासवून माहिती मागणाऱ्या व्यक्तींपासूनही सावध राहावे. सणाचा आनंद साजरा करताना नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. कोणत्याही संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाली आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी. नागरिकांनी स्वतःची तसेच आपल्या कुटुंबीयांची काळजी घेत दिवाळीचा सण सुरक्षित आणि आनंदात साजरा करावा, असे आवाहन प्रभारी ठाणेदार रामकृष्ण सोनवणे यांनी केले आहे.

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात गृहअर्थशास्त्र विभागाची शैक्षणिक भेट

परतवाडा - भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथील गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२६-२७ अंतर्गत एम.ए. भाग-१ व २ गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी अंगणवाडी केंद्र क्रमांक ९८, आझाद नगर, परतवाडा येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

गृहअर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये बालविकास, पोषण, आरोग्य,स्वच्छता तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासाला विशेष महत्त्व आहे. या विषयांचे केवळ पुस्तकी ज्ञान न घेता प्रत्यक्ष कार्यपद्धतीची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, या उद्देशाने या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी अंगणवाडी केंद्राच्या दैनंदिन कामकाजाची माहिती जाणून



घेतली.या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना अंगणवाडी व्यवस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्याची संधी मिळाली. बालकांच्या विकासासाठी अंगणवाडी केंद्राची भूमिका किती महत्त्वपूर्ण आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. तसेच समाजातील माता व बालकांच्या आरोग्यविषयक समस्या, कुपोषण प्रतिबंध आणि पोषण शिक्षणाचे महत्त्व समजून घेण्यास मदत झाली. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल एस. खांडेकर यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. दयाश्री कोकाटे यांच्या पुढाकारातून या शैक्षणिक भेटीचे आयोजन वर्गशिक्षिका प्रा. जोत्स्ना भोयर यांनी आले. अंगणवाडी केंद्र क्रमांक ९८ येथील सेविका वर्षा वानखडे यांनी विद्यार्थ्यांना सहकार्य करून केंद्राच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमामध्ये एम. ए भाग १ च्या प्रियंका ढेमरे, अनुसया परते, नेहा जावरकर, मधुरा देशमुख, वैष्णवी इंगळे, कशिश गिरी, वैशाली गवई, अजरा शेख, प्रियंका मैद, शुभांगी नवघरे इत्यादी विद्यार्थिनी उपस्थिती होत्या

११० शिक्षकांची 'आयडॉल टीचर' म्हणून निवड

अमरावती- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्यावतीने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ४ हजार ४८४ शिक्षकांची 'आयडॉल टीचर' म्हणून निवड करण्यात आली आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील तब्बल ११० शिक्षकांचा समावेश असून, जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे. आयडॉल टीचर निवडीचा सर्वांत महत्त्वाचा निकष म्हणजे संबंधित शिक्षकाच्या वर्गातील किमान ९० टक्के विद्यार्थ्यांनी सर्व मूलभूत क्षमता १०० टक्के संपादित केलेल्या असणे हा आहे. या निकषांची सखोल तपासणी केल्यानंतर SCERT ने राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ३७६ तालुक्यातील २ हजार ८०७ समूह साधन केंद्रांमधून निवड झालेल्या ४ हजार ४८४ शिक्षकांची २०६ पानी यादी प्रसिद्ध केली आहे. निवड झालेल्या आयडॉल शिक्षकांना राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी महत्त्वाची जबाबदारी देण्यात येणार आहे. त्यामध्ये दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी अन्य जिल्ह्यातील ११० शिक्षकांची या प्रतिष्ठेच्या उपक्रमासाठी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर, शिक्षक नेते उदय शिंदे, जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार, जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे यांच्यासह जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी सर्व निवड झालेल्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

नागरवाडी आश्रम शाळेतील ४३० विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

माऊली फाउंडेशन व कार्ला संकल्प व्यसनमुक्ती केंद्र'चा स्तुत्य उपक्रम

अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर

सामाजिक बांधिलकी जपत येथील माऊली फाउंडेशन व कार्ला संकल्प व्यसनमुक्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आठवड्यातील एक दिवस सामाजिक कार्यासाठी समर्पित करण्याचा एक स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ करत श्रीक्षेत्र नागरवाडी येथील गाडगे बाबा मिशन संचलित आदिवासी आश्रम शाळेतील ४३० विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार करण्यात आले.माऊली ग्रुप आणि कार्ला व्यसनमुक्ती केंद्राचे पदाधिकारी व वैद्यकीय पथक नांगरवाडी येथे दाखल होताच, शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे जंगी स्वागत केले.

या विशेष आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने शाळेतील सर्व ४३० विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी केली. तपासणीदरम्यान ज्या विद्यार्थ्यांना उपचारांची गरज आढळून आली, त्यांना जागेवरच मोफत औषध वितरण करण्यात आले. तसेच बदलत्या हवामानानुसार विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्याची कशी काळजी घ्यावी, याबाबत



तज्ज्ञ डॉक्टरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सामाजिक उपक्रमाप्रसंगी कार्ला संकल्प व्यसनमुक्ती केंद्राच्या अध्यक्षा श्रीमती उमाताई दाळू, महादेव भाबेरे, तसेच माऊली फाउंडेशन व माऊली ग्रुपचे पदाधिकारी डॉ. शोण देशमुख, अतुल येवले, डॉ. अमोल ब्राम्हणकर, मनिष टांक, सचिन अब्रुक,संजय टाले, दिनेश सायखडे, चंद्रकुमार चौखंडे, निखिल देशमुख, युवराज टांक, रविंद्र हरणे, डॉ. सौ. दौड, सचिन माटे, सचिन गुरव , गोपाल जांभेकर, भरत तेलगोटे, माने यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माऊली फाउंडेशन आणि कार्ला संकल्प व्यसनमुक्ती केंद्राच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी अशा शिबिरांची नितांत गरज असल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. आयोजित कार्यक्रमात नांगरवाडी इंद्र भवनचे संचालक सागर बापूसाहेब देशमुख यांनी माऊली ग्रुपच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. ते म्हणाले, 'नांगरवाडीचे इंद्र भवन ही केवळ एक आदिवासी आश्रम शाळा नसून संस्कारांचे माहेरघर आहे. या संस्थेच्या माध्यमातून आजवर अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर आणि शिक्षक म्हणून घडले आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि मानवतेचा संदेश घराघरात पोहोचवण्याचे मोलाचे कार्य येथे अविरतपणे सुरू आहे. माऊली फाउंडेशनने या कार्यात आरोग्याचा हातभार लावल्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.'

खाजगी संस्थांच्या बेकायदेशीर 'हलाल सक्ती'विरोधात संसदेत आवाज उठवणार-डॉ.अनिल बोंडे

अमरावती/ का.प्र.

हलाल मुक्त दिवाळी अभियानात सहभागी व्हा-हिंदू राष्ट्र समन्वय समितीचे आवाहन

भारतात खाद्यपदार्थांना प्रमाणपत्र देण्याचा कायदेशीर अधिकार केवळ शासनाच्या 'भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण' आणि 'अन्न व औषध प्रशासन विभाग' यांना आहे; खाजगी धार्मिक संस्थांना नाही. इएर्ए्ड चे प्रमाणपत्र जगातील १९२ देश स्वीकारतात. भारतात बहुसंख्य हिंदू समाज राहतो आणि संविधानाने आपल्याला 'फ्रीडम टू ईट' (खाण्याचे स्वातंत्र्य) दिले आहे. त्यामुळे केवळ विशिष्ट धर्माची आहार पद्धती इतरांवर थोपवली जाणे योग्य नाही. ज्याप्रमाणे उत्तर प्रदेश सरकारने राज्यात अवैध 'हलाल' प्रमाणपत्रांवर बंदी घालण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला आहे, त्याच धर्तीवर संपूर्ण देशात या बेकायदेशीर सक्तीवर बंदी घालण्यात यावी, यासाठी संसदेच्या येत्या हिवाळी अधिवेशनात आपण हा विषय मांडणार आहोत, असे प्रतिपादन भाजपचे अमरावती येथील खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी आज पत्रकार परिषदेत केले.

अमरावती येथे हलाल प्रमाणपत्राच्या विरोधात हिंदु राष्ट्र समन्वय समिती आणि अन्य हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या पत्रकार परिषदेची प्रस्तावना हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे विदर्भ समन्वयक श्रीकांत पिसोळकर यांनी केली. या वेळी 'हिंदु जनजागृती समिती'चे महाराष्ट्र राज्य संघटक सुनील घनवट, राष्ट्रीय श्रीराम सेना (महाराष्ट्र)चे प्रदेशाध्यक्ष कवलजीत पांडे, हिंदु क्रांती सेनेचे प्रदेशाध्यक्ष श्री. हेमंत मालवीय, श्री योग वेदांत सेवा समितीचे प्रतिनिधी मानव बुद्धदेव, सुधीर बोपुलकर, हिंदू हुंकार संघटना, ऋषिकेश ठेलकर, जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय श्रीराम सेना यांच्यासह अन्य हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार डॉ. अनिल बोंडे पुढे म्हणाले की, लोकसभेतील अतारांकित प्रश्न क्र. ७२४ च्या अधिकृत उत्तरात शासनाने स्पष्ट केले आहे की, 'भारतीय गुणवत्ता परिषद' आणि 'राष्ट्रीय मान्यता मंडळ' यांनी काही खाजगी संस्थांना दिलेली मान्यता ही केवळ 'मांस व मांसजन्य पदार्थांच्या निर्यातीपुरतीच'



मर्यादित आहे. देशांतर्गत अनधिकृत हलाल प्रमाणीकरणाला आळा घालण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत.युरोपमधील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार ६ युरोपीय देशांनी 'हलाल'वर बंदी घातली आहे. आपल्या देशातही 'पशू क्रूरता प्रतिबंधक कायदा' आहे. ज्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने काही मंदिरांतील पशुबळींबाबत बंदी लागू केले आहेत, तसाच विचार हलालच्या प्रक्रियेतील क्रूरतेबाबतही व्हायला हवा.

या वेळी 'हिंदु राष्ट्र समन्वय समिती'चे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी 'हलाल मुक्त दिवाळी अभियाना' ची घोषणा केली. ते म्हणाले की, पूर्वी हलाल केवळ निर्यातीपुरते मर्यादित होते, पण आता दिवाळीचे फराळ, गणेशोत्सवातील मोदक, लाडू आणि करंजी यांच्या पीठ या पदार्थांनादेखील 'हलाल प्रमाणपत्र' घ्यावे लागते.

हे अत्यंत संतापजनक आहे. मॅक्डोनाल्ड, पिझ्झा हट, डॉमिनोज, केएफसी यांसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या केवळ 'हलाल' पद्धतीने बनवलेले अन्नपदार्थ विकून हिंदू, जैन, शीख बांधवांवर 'इस्लामी धार्मिक परंपरा' लादत आहेत. १०० हून अधिक देशांत 'हलाल' प्रॉडक्ट्स नाहीत. घनवट पुढे म्हणाले, खाद्यपदार्थ, सौंदर्यप्रसाधने, औषधे आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू तयार करणाऱ्या सुमारे ४०० कंपन्यांनी ३,२०० उत्पादनांसाठी हे हलाल प्रमाणपत्र घेतले आहे. नवीन हलाल प्रमाणपत्र नोंदणीसाठी ४० हजार ते ९० हजार रुपयांपर्यंत आणि वार्षिक नूतनीकरणासाठी ३५ हजार ते ७५ हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाते. 'अॅडराइट रिसर्च' आणि 'हलाल कौन्सिल ऑफ इंडिया' यांच्या हवाल्यानुसार जागतिक बाजारपेठेत हलाल उत्पादनांचा वाटा सुमारे १९३ (सुमारे ७ अब्ज डॉलर्स अर्थात साडेसात लाख कोटी रुपयांहून अधिक) असून यात भारतीय कंपन्या आणि हॉटेल्स यांचा वाटा सुमारे ८० हजार कोटी रुपये इतका मोठा आहे.

म्हणजेच हलाल प्रमाणपत्राच्या नावाखाली खाजगी संस्था कोट्यवधी रुपये उकळत आहेत.आपली अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी हिंदू व्यापाऱ्यांनी 'चितळे' यांच्यासारखे स्वाभिमानी उद्योजक बनले पाहिजे. आपला व्यवहार आपल्याच लोकांशी व्हायला हवा. या दिवाळीत आम्ही हलाल प्रमाणित उत्पादने घेणार नाही आणि हलाल संस्थांकडे आमचा पैसा जाऊ देणार नाही.या समांतर आणि राष्ट्रविरोधी अर्थव्यवस्थेला मोडून काढण्यासाठी समितीच्या वतीने देशभरात 'हलाल मुक्त दिवाळी अभियान' राबवले जाणार आहे. या अंतर्गत देशभरात व्यापाऱ्यांच्या बैठका, मार्गदर्शन आणि जागोजागी होर्डिंग्स लावून व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

सांडपाण्याच्या फेरवापरातून समृद्धीकडे



दररोज मोठ्या प्रमाणावर वाया जाणाऱ्या सांडपाण्याचा पुनर्वापर करण्याची गरज आज प्रकर्षाने निर्माण झाली आहे. योग्य प्रक्रिया आणि नियोजनाच्या माध्यमातून सांडपाणी शेती, बागायती आणि वृक्ष संवर्धनासाठी उपयुक्त ठरू शकते. जगभरात अशी अनेक उदाहरणे आहेतच, शिवाय महाराष्ट्रातीलच काही गावांनी त्याची यशस्वी उदाहरणेही निर्माण केली आहेत.

सध्या महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये दुष्काळाचे सावट बिकट बनत चालले आहे. महाराष्ट्रात तर यंदा १९७२ पेक्षाही भीषण स्थिती आहे. पर्जन्यतुटीमुळे देशातील अनेक राज्यांमध्ये पाणीसाठा खालावला आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली असली, तरी आपण अद्याप पाणी निर्माण करू शकत नाही; परंतु याच विज्ञानाच्या साहाय्याने वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे शक्य आहे. स्वयंपाकघर, स्नानगृह, कपडे आणि भांडी धुण्यासाठी वापरलेले पाणी बहुतांश गावांमध्ये उघड्या गटारांतून वाहते. अनेक ठिकाणी ते रस्त्यावर साचते किंवा थेट जलस्रोतांमध्ये मिसळते. पाण्याची टंचाई वाढत असताना दररोज मोठ्या प्रमाणावर वाया जाणाऱ्या या पाण्याचा पुनर्वापर करण्याची गरज आज प्रकर्षाने निर्माण झाली आहे. योग्य प्रक्रिया आणि नियोजनाच्या माध्यमातून हेच सांडपाणी शेती, बागायती आणि वृक्ष संवर्धनासाठी उपयुक्त ठरू शकते. जगभरात अशी अनेक उदाहरणे आहेतच, शिवाय महाराष्ट्रातील काही गावांनी त्याची यशस्वी उदाहरणेही निर्माण केली आहेत.

घरगुती वापरातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. शौचालयातून बाहेर पडणारे पाणी हा एक प्रकार, तर स्वयंपाकघर, स्नानगृह, कपडे आणि भांडी धुण्यातून निर्माण होणारे पाणी हा दुसरा प्रकार आहे. दुसऱ्या प्रकारातील पाण्याला 'धूसर जल' किंवा 'ग्रे वॉटर' असे म्हटले जाते. भारतातील एकूण घरगुती पाणीपुरवठ्यापैकी सुमारे ६५ ते ७० टक्के पाणी या स्वरूपात बाहेर पडते. जलजीवन मिशनच्या आकडेवारीनुसार ग्रामीण भारतात दररोज ३१ हजार दशलक्ष लिटरपेक्षा अधिक सांडपाणी निर्माण होते. या पाण्यावर योग्य प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर केल्यास गोड्या पाण्याची मोठ्या प्रमाणावर बचत होऊ शकते.

ग्रामीण भागात घराघरांत नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू झाल्यामुळे पाण्याची उपलब्धता वाढली आहे. साहजिकच घरगुती वापरानंतर बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचे प्रमाणही वाढत आहे. या पाण्याची योग्य विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसल्यास गावातील रस्त्यांवर पाणी साचते. उघड्या नाल्यांमधून दुर्गंधी पसरते. डासांची उत्पत्ती वाढून मलेरिया, डेंग्यूसारख्या आजारांचा धोका निर्माण होतो. त्याचबरोबर जमिनीची गुणवत्ता आणि भूजलस्रोतांवरही विपरीत परिणाम होऊ शकतो. तलाव, विहिरी आणि इतर जलस्रोतांमध्ये प्रक्रिया न केलेले सांडपाणी मिसळल्यास पाण्याच्या प्रदूषणाची समस्या अधिक गंभीर बनते. त्यामुळे ग्रामीण भागात पाणीपुरवठ्याच्या योजनांबरोबरच सांडपाण्याचे व्यवस्थापन करणेही आवश्यक झाले आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाच्या ग्रामीण भागातील दुसऱ्या टप्प्यात सांडपाणी व्यवस्थापनाला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. हागणदारीमुक्त गावांच्या पुढील टप्प्यात स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थापनाची शाश्वत व्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी कमी खर्चाच्या आणि स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध होणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले जाते. शोषखड्डे, झिरपण खड्डे, मॅजिक पिट आणि परसबागांशी जोडलेल्या जलव्यवस्थापन पद्धतींचा त्यामध्ये समावेश होतो. या व्यवस्थांमुळे घरातून बाहेर पडणारे पाणी योग्य पद्धतीने जमिनीत मुरविणे किंवा त्याचा स्थानिक पातळीवर उपयोग करणे शक्य होते.

ज्या गावांमध्ये घरांच्या परिसरात पुरेशी जागा उपलब्ध नाही, तेथे सामुदायिक स्तरावरील प्रक्रिया प्रकल्प उभारता येतात. सांडपाणी स्थिरीकरण तलाव, कृत्रिम पाणथळ क्षेत्रे आणि विकेंद्रित सांडपाणी प्रक्रिया प्रणाली यांसारख्या पर्यायांचा वापर करता येतो. पाण्याचा वापर कमी करणे, वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे आणि भूजल पुनर्भरणाला चालना देणे, ही या व्यवस्थापनाची प्रमुख तत्त्वे आहेत. गावाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार आणि उपलब्ध जागेनुसार योग्य पद्धत निवडल्यास सांडपाण्याच्या व्यवस्थापनावरील खर्चही कमी करता येतो. सांडपाणी व्यवस्थापनासाठी केंद्र सरकारने राबविलेल्या 'सुजलाम' अभियानानेही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सरकारी आकडेवारीनुसार २०२१ ते २०२३ या कालावधीत अभियानाच्या विविध टप्प्यांत सुमारे ५० लाख शोषखड्ड्यांची निर्मिती करण्यात आली. गावांमध्ये सांडपाणी साचण्याचे प्रमाण कमी करणे, पाण्याची स्थानिक पातळीवर विल्हेवाट लावणे आणि जलस्रोतांचे प्रदूषण रोखणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. सांडपाण्याचे व्यवस्थापन करताना त्याच्या पुनर्वापराला प्राधान्य दिल्यास या प्रयत्नांचा अधिक व्यापक फायदा होऊ शकतो. योग्य प्रक्रिया केलेले पाणी बागकाम, वृक्षारोपण आणि पिण्याव्यतिरिक्त इतर योग्य कामांसाठी वापरता येते. त्यामुळे उपलब्ध गोड्या पाण्यावरील ताण कमी होतो.

पंजाबमधील मालेरकोटला जिल्ह्यातील सुलतानपूर गावाने सांडपाण्याच्या व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणली. सुमारे २३० कुटुंबे आणि १,१४१ लोकसंख्या असलेल्या या गावात दुर्गंधीयुक्त तलावाची समस्या निर्माण झाली होती. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने सांडपाणी व्यवस्थापनाची योजना तयार करण्यात आली. २०२०मध्ये सुमारे ११ लाख ९५ हजार रुपये खर्च करून सांडपाणी स्थिरीकरण तलाव उभारण्यात आला. या उपाययोजनेमुळे गावातील स्वच्छता, पर्यावरण आणि तलावाच्या स्थितीत सुधारणा होण्यास मदत झाली. ग्रामीण भागातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी मोठ्या खर्चाच्या अत्याधुनिक प्रकल्पांचीच आवश्यकता असते, हा गैरसमज आहे. स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून कमी खर्चाच्या आणि सहज देखभाल करता येणाऱ्या प्रणाली विकसित केल्यास चांगले परिणाम मिळू शकतात. गावातील सांडपाण्याचे व्यवस्थापन शेती आणि स्थानिक पाण्याच्या गरजांशी जोडल्यास त्याचा लाभ अधिक व्यापक होऊ शकतो.

धूसर जल व्यवस्थापनासाठी प्रक्रिया प्रकल्प उभारणे ही सुरुवात असते. त्यानंतर त्याची नियमित देखभाल, स्वच्छता आणि योग्य वापर यांची व्यवस्था करणे आवश्यक असते. यासाठी गावपातळीवर जलसर्वेक्षण आणि पाण्याच्या प्रवाहाचे नकाशे तयार करणे उपयुक्त ठरते. प्रत्येक ग्रामपंचायतीने गावात दररोज किती पाणी वापरले जाते, त्यातून किती सांडपाणी निर्माण होते, ते कोणत्या मार्गाने वाहते आणि कोणत्या भागात पाणी साचण्याची समस्या आहे, याची माहिती संकलित करायला हवी. या अभ्यासाच्या आधारे घरगुती किंवा सामुदायिक स्वरूपातील योग्य प्रक्रिया प्रणाली निवडता येईल. डोंगराळ भागात अशा प्रकल्पांची उभारणी करताना जमिनीचा उतार, उपलब्ध जागा आणि भूस्खलनाचा धोका लक्षात घ्यावा लागतो. मैदानी प्रदेशातही जमिनीची पाणी शोषण्याची क्षमता, भूजल पातळी आणि आसपासचे जलस्रोत यांचा अभ्यास आवश्यक असतो. स्थानिक परिस्थितीचा विचार न करता उभारलेल्या प्रकल्पांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

ग्रामपंचायतींनी घरांबरोबरच शाळा, अंगणवाड्या आणि सार्वजनिक इमारतींना सांडपाणी व्यवस्थापनाच्या योजनेत सहभागी करून घेणे गरजेचे आहे. महिला बचत गट, महिला मंडळे आणि युवकांच्या सहभागातून जनजागृती आणि प्रकल्पांच्या देखरेखीची व्यवस्था निर्माण करता येईल. शाळा आणि अंगणवाडी परिसरात छोट्या प्रक्रिया प्रणाली उभारून त्यांचा जलसंवर्धनाच्या प्रात्यक्षिकांसाठी उपयोग करता येईल. त्यामुळे लहान वयापासूनच पाणी बचत आणि पुनर्वापराचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल. ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा विचार करताना आतापर्यंत प्रामुख्याने नवीन जलस्रोत निर्माण करणे, विहिरींचे पुनर्भरण, बंधारे बांधणे आणि पाणीपुरवठा योजनांचा विस्तार करणे यांवर भर दिला गेला आहे. या प्रयत्नांबरोबरच वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन करण्याची गरजही तितकीच महत्त्वाची आहे. घरातून बाहेर पडणारे पाणी योग्य प्रक्रिया न करता वाहू दिल्यास ते प्रदूषणाचे कारण ठरते. त्याच पाण्यावर प्रक्रिया करून पुनर्वापर केल्यास शेती, बागायती आणि वृक्ष संवर्धनासाठी अतिरिक्त जलस्रोत उपलब्ध होतो. ग्रामीण जलसुरक्षेसाठी धूसर जल व्यवस्थापनाला गावांच्या विकास आराखड्यात स्थान देणे आवश्यक आहे.

करंजवण आणि बाजार भोगावचा आदर्श

महाराष्ट्रातील काही गावांनी धूसर जल व्यवस्थापनाच्या माध्यमातून पाणी बचतीबरोबरच आर्थिक लाभ मिळविण्याचा मार्ग दाखविला आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील करंजवण गाव त्यापैकी एक आहे. सुमारे ५ हजार २५६ लोकसंख्या असलेल्या या गावात दररोज निर्माण होणाऱ्या जवळपास एक लाख लिटर धूसर जलावर प्रक्रिया करण्यासाठी व्यवस्था उभारण्यात आली. त्यासाठी लहान पाईपलाईनच्या माध्यमातून सांडपाणी संकलनाची व्यवस्था करण्यात आली आणि सुमारे अर्धा एकर क्षेत्रात सांडपाणी स्थिरीकरण तलाव तयार करण्यात आला. या प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर ग्रामपंचायतीच्या सुमारे पाच एकर जमिनीवर सिंचनासाठी केला जातो. या परिसरात चिंच, आंबा, पेरू आणि जांभूळ यांसारख्या विविध प्रजातींची सुमारे ११०० झाडे लावण्यात आली. प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या वापरामुळे झाडांच्या उत्पादकतेत सुधारणा झाल्याचे नोंदविण्यात आले आहे. २०२० मध्ये सुमारे अडीच क्विंटल चिंचेचे उत्पादन झाले होते. त्यातून सुमारे चार लाख रुपयांचे संभाव्य विक्रीमूल्य असल्याचे नमूद करण्यात आले होते. सांडपाण्याची योग्य व्यवस्था निर्माण केल्यास गावातील पर्यावरण सुधारण्याबरोबरच स्थानिक पातळीवर आर्थिक संधीही उपलब्ध होऊ शकतात, हे या उदाहरणातून दिसून येते. केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या स्वच्छ भारत मिशनच्या (ग्रामीण) २०२१च्या अधिवृत्त मॅन्युअलमध्ये या गावाची यशोगाथा नमूद केलेली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील बाजार भोगाव या गावानेही सांडपाण्याच्या पुनर्वापराचा मार्ग स्वीकारला आहे. येथे धूसर जलावर प्रक्रिया करण्यासाठी तीन तलावांची व्यवस्था विकसित करण्यात आली. या प्रणालीमुळे दररोज सुमारे २५ हजार लिटर प्रक्रिया केलेले पाणी उपलब्ध होऊ लागले. स्थानिक शेतकऱ्यांनी या पाण्याचा सिंचनासाठी वापर सुरू केला. त्यामुळे गावातील सांडपाण्याची समस्या कमी करण्याबरोबरच शेतीसाठी अतिरिक्त जलस्रोत उपलब्ध झाला. पाणीटंचाईच्या परिस्थितीत अशा स्थानिक उपाययोजना उपयुक्त ठरू शकतात.

विधिषा देशपांडे

बेरोजगारांचा आक्रोश



दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्मितीच्या प्रलोभनाच्या पार्श्वभूमीवर प्रतिकूल परिस्थितीशी झुंजणाऱ्या बेरोजगारांचा संघर्ष टोकदार बनला आहे. स्पर्धा परीक्षा आणि रेल रोको ही आंदोलने या संघर्षाची बोलकी उदाहरणे ठरली. ६९ जागांसाठी २ लाख अर्ज येणे आणि कायम नोकरीसाठी रेल रोको होणे ही त्याची ठिणगी होती. दुर्लक्षाने तिचा वणवा होऊ शकतो, हे शासनकर्त्यांनी आणि विरोधकांनी लक्षात घेतले नाही, हे या मोर्चांनी उजागर केले.

शिक्षण आणि वास्तव यातील दरी

शिक्षणाचे खाजगीकरण आणि अनधिकृत शिकवणी वर्ग हे बेरोजगार निर्मितीचे कारखाने बनले आहेत. पदवीपर्यंत १६ वर्षे आणि त्यानंतर प्राविण्य व स्पर्धा परीक्षांमध्ये आणखी ५ ते ९ वर्षे घालवल्यानंतर पदवी आणि स्पर्धा परीक्षा रोजगारासाठी उपयोगी नसल्याचे विदारक वास्तव समोर येते.प्रिस्कूलपासून अखेरच्या शिक्षणापर्यंतचे आवाक्याबाहेरचे शुल्क, प्रवेश शुल्क आणि महागड्या शिकवण्यांमधून मिळवलेल्या पदव्या निकामी ठरतात. आपली शिक्षण व्यवस्था रोजगाराभिमुख नसल्याने अनावश्यक आणि निरुपयोगी शिक्षितांचे प्रमाण वाढते. शहर आणि ग्रामीण भागात नोकऱ्यांच्या शोधात फिरणाऱ्या मध्यमवर्गीय सुशिक्षित बेरोजगारांची संख्या मोठी आहे.विशेषतः एससी, एसटी, ओबीसी या समाजघटकांनी काबाडकष्ट करून, प्रसंगी अर्धपोटी राहून आपल्या पाल्यांना शिकवले, त्यांच्यासाठी तर बेरोजगारी शाप ठरते.

कायम नोकऱ्या बंद, कंत्राटी पद्धत सुरू

केंद्र आणि राज्य सरकारांनी कायमस्वरूपी नोकऱ्याच बंद केल्या आहेत. शासनातील कंत्राटी नोकऱ्या आणि खाजगी शिक्षण संस्थांमधील नोकऱ्यांसाठी लागणाऱ्या लाखो रुपयांच्या देणग्यांमुळे बेरोजगार आणि त्यांचे पालक धास्तावले आहेत. शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्था, खाजगी उद्योग, सरकारी उद्योग या सर्व ठिकाणी नोकरभरती अल्प प्रमाणात सुरू आहे. मात्र कोणीही कायमस्वरूपी कर्मचारी नेमत नाही. रोजंदारीवर, अस्थायी स्वरूपात भरती केली जाते. मिळालेल्या नोकरीमुळे जीवनाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटत नाही, हेच तरुणांचे खुपणारे शल्य आहे.शासनाने नेमलेला कंत्राटदार १० हजार रुपयांची नोकरी ५ हजारांत देतो. वरचे पैसे वाटले जातात. असहाय तरुणांना बेरोजगारीमुळे ही फसवणूक कळूनही दुर्लक्ष करावे लागते.राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातील ५६% खर्च हा नोकरदार आणि निवृत्तीधारकांवर होतो. त्यामुळे राज्याचे अर्थकारण बाधित झाले आहे. परिणामी सरकारांनी भरतीऐवजी कंत्राटी पद्धतीवर लक्ष केंद्रित केले आहे.

आंदोलनांचा भडका

२०१८ मधील स्पर्धा परीक्षा आणि रेल्वे भरतीसाठी झालेली तरुणांची आंदोलने बेरोजगारांचे सुन्न करणारे वास्तव अधोरेखित करणारी ठरली. २०१८ मध्ये रोजगारासाठी युवकांनी मुंबईची लाईफलाईन रोखली होती.कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर आले की सुरुवातीच्या काळात स्पर्धा परीक्षा आणि भरतीकडे दुर्लक्ष केले जाते. जसजसा निवडणूक काळ जवळ येतो, तसे जागा भरण्याचा आभास निर्माण केला जातो. २०१४ ते २०१९ च्या काळात फसव्या घोषणांनी तरुणांच्या आशा पल्लवित झाल्या, मात्र रोजगारासाठी नऊ वर्षे वाट पाहावी लागली.दरवर्षी पोलीस आणि सैन्य भरती होते, पण गेल्या नऊ वर्षांत जागांची संख्या कमी होत आहे. जिल्हा आणि विभागीय स्तरावरील परीक्षांच्या निवड याद्या बोर्डावर लावल्या जातात आणि लगेच रद्द केल्या जातात. यामुळे तरुणांची तयारी, पैसे आणि प्रवास खर्च वाया जातो.

सध्याची स्थिती

कॉकरोच जनता पार्टीचा उदय झाल्यापासून बेरोजगारांची तीव्र आंदोलने अविरत सुरू आहेत. विरोधी पक्षांच्या सहकार्यातून आंदोलनाची धग वाढत आहे. राहुल गांधी यांच्या १ नोव्हेंबरच्या मोर्चात हजारो सामान्य नागरिक आणि २३ विरोधी पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाल्याचा दावा केला जात आहे. संसदेत ज्ञानेशकुमार यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्तावावरूनही चर्चा सुरू आहे.रोजगाराच्या अपुऱ्या संधी, कायमस्वरूपी नोकऱ्यांचे नगण्य प्रमाण आणि सरकारच्या धरसोड वृत्तीमुळे तरुणांमधील रोष वाढत आहे. कॉर्पोरेट शहरातील अभ्यासिका आणि शिकवणी वर्गांमधील तरुणांशी बोलले की त्यांच्यातील अस्वस्थता लक्षात येते.त्वरित उपाययोजना न केल्यास या आक्रोशाचे रूपांतर स्फोटक परिस्थितीत होण्यास वेळ लागणार नाही, असा जाणकारांचा होरा आहे.

- पुरुषोत्तम गुळवे
(मो. ९४२२३२५०७४)

जुना ओलावा...

मागे वळून पाहिल्यावर लक्षात येते की ज्या गोष्टींची आपण खूप चिंता केली होती त्यांना आपल्याकडून अकारण अधिक महत्व दिले गेले.

आपण काहींना खूप वेळ दिलेला असतो, त्यांच्यासाठी झटलेलो असतो. मात्र एक वेळ अशी येते की त्यांच्या सुखदुःखाच्या परिघात आपण कुठेच नसतो! आपल्याला हे उमगते तेव्हा त्यांच्या गरजा संपलेल्या असतात, मग बाकी आयुष्यात आपण त्यांच्याशी अंतर राखले तरी त्याचे त्यांना काही सोयरसूतक नसते!

ज्या व्यक्तींना आपण मानाचे, जवळचे स्थान दिले त्या व्यक्ती आपल्या आयुष्यात असत्या नसत्या तरी काहीच फरक पडला नसता हे आपल्याला उमजते!



वर्तमानात जगताना भविष्याची अधिक चिंता केल्याने या चुका आपल्याकडून झालेल्या असतात ज्याचे रुपांतर कडवट भूतकाळात होऊन जाते!

विशेष बाब म्हणजे ज्यांना आपण थोडे अधिक जवळीकीचे स्थान दिलेले असते तेच असे वागताना दिसतात!

इतर लोक आपल्याशी असे वागले तर त्याची आपल्याला काडीमात्र खंत नसते, जगाचा व्यवहार आहे अशीच रीत असते असे म्हणत आपण त्या गोष्टी विसरुनही जातो.

मात्र जवळच्या लोकांची अशी वागणूक असह्य आणि क्लेशदायी ठरते.

काही काळ गेल्यानंतर आपल्या मनातला हा विषादही दूर होतो.

आपण अगदीच टोकाचे सूडबुद्धीचे असू तर आपण ती गोष्ट डोक्यात घेऊन बसतो!

परंतु काही काळानंतर एक वेळ अशी येते की आपण त्या व्यक्तीला माफ करतो, ती व्यक्ती पुन्हा जवळ येऊ पाहते मात्र आपण त्याच जुन्या ओलाव्याने, आस्थेने त्या व्यक्तीशी नाते प्रस्थापित करू शकत नाही!

तुम्ही टॅली करून पहा!

- समीर गायकवाड

कुंभमेळा: दुष्काळाच्या सावटातील सुवर्णसंधी!

राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे म्हणून कुंभमेळा रद्द करा आणि त्यावरील पैसा शेतकऱ्यांना वाटा, अशी मागणी करणे म्हणजे समस्येकडे एकांगी दृष्टिकोनातून पाहण्यासारखे आहे. कुंभमेळा ही काही सरकारने आयोजित केलेली साधी यात्रा नाही. हजारो वर्षांच्या परंपरेनुसार ठरलेल्या तिथीला लाखो भाविक एकत्र येतात. सरकारची भूमिका या गर्दीचे नियोजन आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची आहे.

कुंभमेळ्यासाठी होणाऱ्या खर्चातील मोठा हिस्सा रस्ते, पूल, उड्डाणपूल, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अन्य कायमस्वरूपी पायाभूत सुविधांवर खर्च होणार आहे. याचा लाभ कुंभमेळ्यानंतरही नाशिककरांना मिळणार आहे. त्याचबरोबर देशभरातून येणाऱ्या कोट्यवधी भाविकांमुळे पर्यटन, व्यापार आणि स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळणार आहे.

हॉटेल व्यावसायिक, रिक्षाचालक, टॅक्सीचालक, विक्रेते, शेतमाल पुरवठादार, छोटे व्यावसायिक अशा अनेक घटकांना उत्पन्नाची संधी उपलब्ध होणार आहे. विशेषतः दुष्काळामुळे अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांतील तरुणांनी या संधीचा विचार करून तात्पुरते व्यवसाय उभारण्याचा प्रयत्न करायला हवा.

दुष्काळ निवारण आणि विकासकामे या परस्परविरोधी गोष्टी नाहीत. शेतकऱ्यांना मदत झालीच पाहिजे; पण त्यासाठी रोजगार आणि आर्थिक उलाढाल निर्माण करणाऱ्या संधींना विरोध करण्याचे कारण नाही. कुंभमेळा हा दुष्काळात तेरावा महिना नसून, संकटाच्या काळात अर्थव्यवस्थेला उभारी देणारी एक मोठी संधी आहे!



- अनिकेत शेटे, पुणे

सिंहस्थ महाकुंभमेळ्याची मंगल नांदी

भारतीय संस्कृतीत नद्यांना लोकमातेचे स्थान दिले गेले आहे आणि त्यातही दक्षिण गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीचे महात्म्य अनन्यसाधारण आहे. प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेले नाशिकचे रामतीर्थ हे शतकानुशतके भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचे प्रमुख केंद्र राहिले आहे. दर १२ वर्षांनी याच पवित्र भूमीवर सिंहस्थ महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये देशभरातून लक्षावधी भाविक आणि साधू-महंत सहभागी होतात. कुंभमेळा हा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि सामाजिक एकतेचा एक भव्य संगम मानला जातो. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या याच भक्तीपरंपरेने एक नवा आणि अभूतपूर्व अध्याय रचला आहे, जो केवळ अध्यात्मिकदृष्ट्या नव्हे तर सामाजिक आणि जागतिक दृष्टिकोनातूनही अत्यंत अभ्यासपूर्ण आणि दिशादर्शक ठरला आहे.

धार्मिक सोहळे आणि महाआरती यांसारखे उपक्रम सहसा पारंपारिक पुरोहित किंवा विशिष्ट वर्गापुरते मर्यादित राहतात, असा एक सर्वसामान्य समज असतो. मात्र, या समजाला छेद देत समाजातील तळागाळातील घटकांना मुख्य प्रवाहात आणणारा एक अत्यंत भव्य आणि शिस्तबद्ध सोहळा नुकताच नाशिकमध्ये पार पडला. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी रामतीर्थावर तब्बल ६२३३ जनजातीय बंधू-भगिनींनी एकत्रितपणे गोदामाईची महाआरती केली. हजारो हातांमध्ये तेवणारे दिवे, आकाशात निनादणारा मंत्रघोष आणि शिस्तीचे काटेकोर पालन करत एकाच वेळी, एकाच तालात संपन्न झालेली ही महाआरती जागतिक विक्रमपुस्तकात सुवर्णअक्षरांनी नोंदवली गेली. या महाआरतीसाठी ६२३३ या प्रचंड संख्येने आदिवासी बांधवांचे एकत्र येणे, हे केवळ एका विक्रमापुरते मर्यादित नसून, तो एका प्रदीर्घ आणि सूक्ष्म नियोजनाचा, तसेच अफाट श्रद्धेचा परिपाक आहे.

सामाजिक समरसतेच्या दृष्टिकोनातून या घटनेचे सखोल विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, जनजातीय समाज हा मुळातच निसर्गपूजक राहिला आहे. अरण्य, पर्वत आणि नद्या यांच्याशी त्यांचे प्राचीन काळापासूनचे अतुट नाते आहे. आधुनिकतेच्या आणि शहरीकरणाच्या प्रवाहात हा समाज अनेकदा उपेक्षित राहिल्याची चर्चा समाजशास्त्रीय पातळीवर होत असते. परंतु, या महाआरतीच्या माध्यमातून वनवासी आणि आदिवासी समाजाला कुंभमेळ्यासारख्या जागतिक पातळीवरील महासोहळ्याच्या अगदी केंद्रस्थानी प्रस्थापित करण्यात आले. ६२३३ हातांनी एकाच वेळी आरती करणे, हे समाजातील सर्व स्तरांना एकाच धाग्यात गुंफण्याचे आणि त्यांच्यातील निसर्गदत्त श्रद्धेला सन्मान मिळवून देण्याचे एक उत्तम उदाहरण आहे. हा सोहळा भारतीय समाजरचनेतील भेदाभेद विसरून सर्वांना समान आध्यात्मिक अधिकार प्रदान करणारा एक क्रांतिकारक टप्पा मानला पाहिजे.

नाशिकच्या भक्तीपरंपरेचा हा गौरव केवळ एका शहराचा किंवा राज्याचा नसून तो संपूर्ण भारतीय संस्कृतीच्या सर्वसमावेशकतेचा विजय आहे. सिंहस्थ महाकुंभमेळ्याची ही मंगल नांदी एका सकारात्मक, ऊर्जावान आणि वैश्विक एकतेच्या विचारांवर उभी राहिली आहे. जागतिक विक्रमपुस्तकात नोंदवला गेलेला हा क्षण केवळ आकड्यांचा विक्रम नाही, तर तो हजारो मानवी मनांच्या एकत्रीकरणाचा आणि श्रद्धेचा विजय आहे.

प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल,
वर्धा.९५६१५९४३०६

मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

एमपीडीएचा बडगा की पोलिसांच्या 'रेकॉर्ड मेंटेन'चा खेळ?

इम्रानला वर्षभर स्थानबद्ध; पोलिसांच्या कारवाईवरच संशयाचे सावट! हल्ल्यातील पीडितावरही गुन्हे; तक्रारींची शहानिशा झाली का? उरळ पोलिसांच्या भूमिकेची चौकशी करा!

■ ॲड. समिर ठाकूर ■

अकोला : गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी कायद्याचा बडगा उगारायचा की गुन्ह्यांच्या नोंदींचा डोंगर उभा करून एखाद्याला वर्षभर तुरुंगात डांबायचे? अकोला पोलिसांच्या एमपीडीए कारवाईनंतर हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गायगाव येथील शेख इम्रान शेख कयुम (४२) याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचा आदेश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी २ नोव्हेंबर रोजी जारी केला. पोलिसांच्या दाव्यानुसार, त्याच्यावर विविध गंभीर गुन्हे दाखल आहेत. मात्र, या कारवाईविरोधात इम्रानच्या बाजूने मांडण्यात आलेली घटनांची पार्श्वभूमी वेगळीच कहाणी सांगते. खंडणी, खून, खुनाचा प्रयत्न किंवा अवैध शस्त्र बाळगण्यासारखे गुन्हे नसल्याचा दावा केला जात असताना, नेमक्या कोणत्या आधारावर एमपीडीएचा प्रस्ताव तयार झाला? तक्रारींची सत्यता तपासली की केवळ गुन्ह्यांची संख्या मोजून स्थानबद्धतेचा मार्ग मोकळा केला? पोलिसांच्या या कार्यपद्धतीवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हल्ला झाला, पीडितावरही गुन्हा; पोलिसांचा तपास नेमका कोणासाठी?

काही काळापूर्वी इम्रानच्या राहत्या घरावर कथितरीत्या गुंडांनी हल्ला चढविला. घरावर दगडफेक झाली, नासधूस करण्यात आली. हल्ल्याचा बळी ठरलेल्या इम्रानविरुद्धही उरळ पोलिसांनी (तत्कालीन ठाणेदार पंकज कांबळे) यांनी हल्लेखोरांसोबत प्रतिगुन्हा दाखल केल्याचा आरोप आहे. म्हणजे हल्ला करणारे आणि हल्ल्याचे पीडित यांना एकाच तराजूत तोलण्याची भूमिका पोलिसांनी घेतली होती काय? या प्रकरणातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय होती? सीसीटीव्ही, साक्षीदार आणि इतर पुराव्यांची शहानिशा करण्यात आली होती का? की तक्रार आली आणि गुन्हा दाखल झाला, एवढ्यावरच पोलिसांचा तपास थांबला?

त्यानंतरही तक्रारीच्या आधारे इम्रानविरुद्ध गुन्हे दाखल झाल्याचा दावा करण्यात येत आहे. संबंधित तक्रारदारांची विश्वासार्हता, घटनांची सत्यता आणि इम्रानची प्रत्यक्ष भूमिका तपासण्यात आली होती का, याचे उत्तर पोलिसांनी द्यायला हवे. कारण गुन्हा दाखल होणे म्हणजे गुन्हा सिद्ध होणे नव्हे. मग अशा गुन्ह्यांचा आधार घेऊन एखाद्याला धोकादायक व्यक्ती ठरविताना पोलिसांनी कोणती खबरदारी घेतली?

गुन्हेगारीचे निर्मूलन की कागदी गुन्हेगारीचा विस्तार?

पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकात चोरी, मारहाण, घातक हत्यारांनी दुखापत, बेकायदेशीर जमाव, दंगल, अवैध शस्त्र बाळगणे, धमकावणे आदी गुन्ह्यांचा उल्लेख आहे. यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करूनही सुधारणा झाली नसल्याचेही पोलिसांचे म्हणणे आहे. मात्र, या प्रत्येक गुन्ह्याची सद्यस्थिती काय आहे? किती प्रकरणांत दोषसिद्धी झाली? किती प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत? किती गुन्ह्यांमध्ये इम्रानची भूमिका प्रत्यक्ष पुराव्यांनी सिद्ध झाली आहे? या प्रश्नांची उत्तरे जनतेसमोर येणे आवश्यक आहे.

एखाद्या व्यक्तीविरुद्ध गुन्हे दाखल झाल्याच्या नोंदी वाढविणे आणि त्याच्या प्रत्यक्ष गुन्हेगारी कारवायांवर नियंत्रण ठेवणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. पोलिसांच्या दप्तरी गुन्ह्यांची संख्या वाढली म्हणून समाजाला धोका सिद्ध होत नाही. त्यासाठी ठोस पुरावे आणि वस्तुनिष्ठ कारणे आवश्यक आहेत. मग या प्रकरणात नेमके काय घडले?

एसपींचे धोरण एकीकडे, स्थानिक पोलिसांची कार्यपद्धती दुसरीकडे?

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक हे गुन्हेगारांना सुधारण्याची संधी देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देत असल्याचे सांगितले जाते. मात्र, त्यांच्याच अधिपत्याखालील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असतील, तर ही बाब वरिष्ठांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे.गुन्हेगारी सोडून सामान्य जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध जुन्या वादातून दाखल झालेल्या तक्रारींचा वापर होत असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? तक्रारींची पडताळणी न करता गुन्हे दाखल झाले असतील, तर संबंधित अधिकाऱ्यांना जाब कोण विचारणार? आणि अशा गुन्ह्यांचा आधार घेऊन एमपीडीएचा प्रस्ताव तयार करण्यात आला असेल, तर त्या प्रस्तावाची सत्यता तपासण्याची जबाबदारी कोणाची?

उरळ पोलिसांच्या भूमिकेची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करा!

या प्रकरणात उरळ पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यांचा घटनाक्रम, हल्ल्याच्या प्रकरणातील प्रतिगुन्हा, तक्रारदारांची पार्श्वभूमी आणि तपासातील निष्कर्ष यांची स्वतंत्र चौकशी होणे गरजेचे आहे. बाळापूर पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यांचीही स्वतंत्रपणे पडताळणी व्हावी. एमपीडीए प्रस्ताव तयार करताना कोणती माहिती वापरण्यात आली, ती कितपत सत्य आणि अद्ययावत होती, तसेच स्थानबद्धतेचा आदेश देताना कोणत्या कारणांचा विचार झाला, हे स्पष्ट झाले पाहिजे. एमपीडीए हा कायदा सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आहे; पोलिसांच्या तपासातील त्रुटी झाकण्यासाठी किंवा तक्रारींच्या आधारे एखाद्याला गुन्हेगारीच्या चौकटीत कायमचे अडकविण्यासाठी नव्हे. कायद्याचा धाक गुन्हेगारांना असला पाहिजे; पण कायद्याच्या अंमलबजावणीवर प्रश्न विचारण्याचा अधिकार सामान्य नागरिकांनाही आहे.

आता प्रश्न एकच... इम्रान खरोखरच सार्वजनिक सुरक्षेला धोका ठरणारा धोकादायक इसम आहे, की काही गुन्ह्यांच्या नोंदींच्या आधारे तयार झालेली प्रतिमा त्याच्या स्थानबद्धतेस कारणीभूत ठरली? याचे उत्तर केवळ प्रसिद्धीपत्रकातून मिळणार नाही. निष्पक्ष चौकशी, पुराव्यांची पडताळणी आणि पोलिसांच्या भूमिकेची जबाबदारी निश्चित केल्याशिवाय या प्रकरणावरील संशयाचे सावट दूर होणार नाही.

पाण्याचा अपव्यय भोवला; मनपाची १० हजारांची दंडात्मक कारवाई!

बांधकामधारकासह भारती एअरटेल कंपनीला दंड

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर मनपाची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. शहरात पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या कारवाईअंतर्गत दोन वेगवेगळ्या प्रकरणांत प्रत्येकी पाच हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. त्यामुळे एका दिवसात मनपाने एकूण १० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी झोननिहाय पथके तैनात करण्यात आली आहेत. या पथकांकडून शहरातील विविध भागांत पाहणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. १ नोव्हेंबर रोजी पूर्व झोनच्या पथकाने प्रभाग क्रमांक ६ मधील रामदास पेठ परिसरात, दत्त मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या बांधकामस्थळाची तपासणी केली. यावेळी संघवी नामक बांधकामधारकाकडून पाण्याचा अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी संबंधित बांधकामधारकावर पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

दरम्यान, पश्चिम झोनच्या पथकाला प्राप्त झालेल्या तक्रारीनंतर पोळा चौक परिसरात तपासणी करण्यात आली. येथे भारती एअरटेल कंपनीकडून केबल टाकण्याचे काम सुरू असताना पाण्याची पाइपलाइन क्षतिग्रस्त झाल्याचे आढळून आले. यामुळे पाण्याचा अपव्यय झाल्याप्रकरणी कंपनीवरही पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

ही कारवाई मनपाचे सहायक आयुक्त राजेश सरप व गजानन घोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये पूर्व झोनचे स्वच्छता निरीक्षक राजेश पथरोट, प्रवीण मनोहर, गोविंद करिहार, विशाल पारोचे, सुनील कंडेरा, तसेच पश्चिम झोनचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक अमर खोडे, स्वच्छता निरीक्षक धनराज पचेरवाल व आदर्श गोहर यांचा सहभाग होता.

पाणी जपण्याचे आवाहन; तक्रारीसाठी हेल्पलाइन

संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता नागरिकांनी पिण्याचे पाणी तसेच भूजलाचा वापर अत्यंत काटकसरीने करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे. शहरात कुठेही पाण्याची पाइपलाइन फुटलेली आढळल्यास, बांधकामासाठी महापालिकेच्या पाण्याचा किंवा बोअरवेल-विहिरीच्या पाण्याचा अनावश्यक उपसा होत असल्यास नागरिकांनी माहिती द्यावी. तसेच वाहन धुण्याची केंद्रे सुरू असल्यास किंवा आरओ प्लांटवर महापालिकेच्या पाण्याचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी नागरिकांना ०७२४-२४३४४१२ या क्रमांकावर संपर्क साधता येणार असून, तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे मनपा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जाहीर नोटीस

वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७४१/२०२६ प्रोसेस नं.१३१३८/२०२६
चौ.ता. २६/११/२०२६ दिनांक : १४/१०/२०२६

अर्जदार : १. श्रीमती. कौशल्या सिद्धार्थ वानखडे २. जयदिगनाथ सिद्धार्थ वानखडे ३. प्रविण सिद्धार्थ वानखडे ४. सौ. प्रज्ञा अमोल तेलगोटे लग्नाआधीचे नाव - प्रज्ञा सिद्धार्थ वानखडे रा. अंजनगाव रोड, अकोट, ता. अकोट, जि. अकोला. ५. अमोल सिद्धार्थ वानखडे, मो. क. ८८३०८४५०१४ क. १ ते ३, ५ रा. शांती नगर, भिम नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : सिद्धार्थ विठुजी वानखडे
पत्ता :- रा. शांती नगर, भिम नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. मो. क. ८८३०८४५०१४

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सिद्धार्थ विठुजी वानखडे यांचे दि. २३/०७/२०२६ रोजी बालाजी हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/११/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७४२/२०२६ प्रोसेस नं.१३१६४/२०२६
चौ.ता. ३०/११/२०२६ दिनांक : १५/१०/२०२६

अर्जदार : १. अरविंद श्यामराव सुरवाडे २. किरण श्यामराव सुरवाडे दोघेही रा. तथागत नगर, गंगा नगर नं. २, एम. पी. हॉटेल जवळ, वाशिम बायपास, बाळापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. श्यामराव बापुना सुरवाडे २. लक्ष्मीबाई श्यामराव सुरवाडे
पत्ता :- रा. तथागत नगर, गंगा नगर नं. २, एम. पी. हॉटेल जवळ, वाशिम बायपास, बाळापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्यामराव बापुना सुरवाडे यांचे दि. २१/०७/२०१० रोजी तथागत नगर, गंगा नगर नं. २, एम. पी. हॉटेल जवळ, वाशिम बायपास, बाळापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे सागर प्रकाशराव शेंगोकार उर्फ सागर प्रकाश शेंगोकार हया दोन्ही नावाच्या व्यक्ती हया एकच असून सदरची दोन्ही नावे ही एकाच व्यक्तीची आहेत.

माझ्या पक्षकाराचे नाव हे त्यांचे काही वैयक्तिक दस्तऐवजांमध्ये सागर प्रकाशराव शेंगोकार असे नजरचुकीने नमूद केलेले असुन माझ्या पक्षकाराचे खरे नाव सागर प्रकाश शेंगोकार असे आहे. सदरच्या नावाची दोन्ही व्यक्ती हया एकच आहेत, करीता ही जाहिर नोटीस.

अकोला.
दि. ०२/११/२०२६

पक्षकार तर्फे अधिवक्ता
ॲड. निखील देशमुख.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

प्रभातच्या अनयचा राष्ट्रीय ॲरोबिक्समध्ये डंका!

■ प्रतिनिधी | अकोला ■



सीबीएसई राष्ट्रीय ॲरोबिक्स स्पर्धेत प्रभात किड्स स्कूलचा विद्यार्थी अनय तायडे याने उल्लेखनीय कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. पुणे येथील एस.एन.बी.पी. इंटरनॅशनल स्कूलमध्ये २६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान ही स्पर्धा पार पडली.स्पोर्ट्स ॲरोबिक्स प्रकारात अनयने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तिसरा क्रमांक मिळविला. त्याच्या या यशामुळे अकोला जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.अनयच्या या यशाबद्दल प्रभात किड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, सचिव नीरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ, क्रीडा विभागप्रमुख स्वप्निल मांदाळे व उपक्रीडा विभागप्रमुख आशिष बेलोकार यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७४३/२०२६ प्रोसेस नं.१३१११/२०२६
चौ.ता. ०४/१२/२०२६ दिनांक : १३/१०/२०२६

अर्जदार : १. काशिनाथ रंगराव वावरे २. गोकुळ रंगराव वावरे ३. दिलीप रंगराव वावरे ४. विनोद रंगराव वावरे सर्व रा. आखतवाडा, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. रंगराव रामराव वावरे २. कमलाबाई रंगराव वावरे
पत्ता :- रा. आखतवाडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रंगराव रामराव वावरे यांचे दि. १६/१०/२०१३ रोजी व मयत कमलाबाई रंगराव वावरे यांचे दि. ०७/१२/२००२ रोजी आखतवाडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

Change In Name

I have change my name From
VAISHNAVI MADHUKARRAO DESHMUKH -TO-
VAISHNAVI MUDHUKAR DESHMUKH
My Residential Address is V. H. B. COLONY TARFAIL AKOLA - 444001

पोलिसांची भीती नको, संकटात मदतीचा विश्वास हवा!

मिशन उडाण अंतर्गत किडझी स्कूलच्या ७५ विद्यार्थ्यांची पोलीस दलाला भेट

■ प्रतिनिधी | अकोला ■

पोलिसांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा, संकटाच्या वेळी पोलिसांची मदत घेण्याचे धाडस निर्माण व्हावे आणि बालवयातच सुरक्षिततेचे धडे मिळावेत, या उद्देशाने अकोला जिल्हा पोलीस दलाच्या वतीने 'मिशन उडाण' अंतर्गत विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. किडझी स्कूलच्या ७५ विद्यार्थ्यांनी पोलीस दलाला भेट देत विविध विभागांचे कामकाज जाणून घेतले. यावेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्याशी विद्यार्थ्यांनी थेट संवाद साधत प्रश्नांची सरबत्ती केली.

एसपी अर्चित चांडक यांच्याशी साधला थेट संवाद



एसपींशी संवाद; विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे!

या भेटीतील विशेष आकर्षण ठरले ते पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्याशी झालेला विद्यार्थ्यांचा थेट संवाद. चांडक यांनी विद्यार्थ्यांशी आपुलकीने संवाद साधत पोलीस दलाची कार्यपद्धती, शिस्त, नागरिकांची सुरक्षा आणि समाजाप्रती पोलिसांची जबाबदारी विशद केली. विद्यार्थ्यांनीही उत्सुकतेने विविध प्रश्न विचारून पोलिसांच्या कामकाजाची माहिती घेतली. विशेष म्हणजे, मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी डायल ११२, सायबर हेल्पलाइन आणि अन्य महत्त्वाच्या हेल्पलाइन क्रमांकांची माहिती आत्मविश्वासाने सांगितली. बालकांच्या मनातील पोलिसांविषयीची भीती दूर करून त्यांच्यात विश्वास निर्माण करणे, संकटाच्या वेळी मदत मागण्याचे धैर्य देणे आणि सुरक्षिततेचे संस्कार रुजविणे, हाच 'मिशन उडाण'चा मुख्य हेतू आहे. अशा उपक्रमांतून बालसुरक्षेचा जागर आणि पोलिसांशी मैत्रीचे नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न अकोला जिल्हा पोलीस दल करीत आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, डायल ११२ आणि 'गुड टच-बॅड टच' या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. मोबाईल आणि इंटरनेट वापरताना कोणती खबरदारी घ्यावी, अनोळखी व्यक्तींचे फोन किंवा संदेश आल्यास काय करावे, ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याची माहिती सोप्या भाषेत देण्यात आली. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी पालक, शिक्षक किंवा पोलिसांना माहिती देण्याचे आवाहनही करण्यात आले.

डायल ११२ पासून गुड टच-बॅड टचपर्यंत धडे!

आपत्कालीन परिस्थितीत डायल ११२ या क्रमांकावर संपर्क साधून पोलीस मदत कशी मिळवावी, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच 'गुड टच-बॅड टच'च्या माध्यमातून अयोग्य स्पर्श ओळखणे, स्वतःच्या शरीराच्या वैयक्तिक सीमांचे महत्त्व समजून घेणे आणि अशा प्रसंगी न घाबरता विरोध करून विश्वासू व्यक्तीला सांगणे, याबाबत जागरूक करण्यात आले.

दामिनी पथक, सीसीटीव्ही कमांड सेंटरची पाहणी

केवळ पुस्तकी माहिती न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पोलीस यंत्रणेची ओळख करून देण्यात आली. महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या दामिनी पथकाची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली.

'पोलीस काका-दीदी' उपक्रमातून पोलीस आणि विद्यार्थ्यांमधील मैत्रीपूर्ण नात्याचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले.

सीसीटीव्ही कमांड सेंटरला भेट देताना शहरातील विविध भागांवर कॅमेऱ्यांच्या माध्यमातून कशी नजर ठेवली जाते, गुन्ह्यांचा तपास आणि प्रतिबंधात या यंत्रणेची भूमिका काय असते, हे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवले. क्विक रिस्पॉन्स टीमच्या (क्यूआरटी) कामकाजाची माहिती घेत आपत्कालीन परिस्थितीत पोलीस दल किती तत्परतेने मदतीला धावते, याचीही त्यांना जाणीव झाली.

दिवाळीच्या गर्दीत चोरट्यांचा 'हातसफाई'चा डाव!

खरेदीला जाताय? सावधान! मौल्यवान वस्तू सांभाळा; बंद घरांवरही चोरट्यांची नजर

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

दिवाळीचा उत्साह, बाजारपेठांतील झगमगाट आणि खरेदीसाठी उसळणारी गर्दी... मात्र, याच गर्दीच्या आड चोरट्यांना आयती संधी मिळू शकते! सणासुदीच्या काळात नागरिकांच्या निष्काळजीपणाचा फायदा घेत मोबाईल, पाकीट, सोन्याचे दागिने आणि मौल्यवान वस्तूंवर हात साफ करणाऱ्या चोरट्यांपासून सावध राहा, असे आवाहन मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार धर्मेंद्र जोशी यांनी केले आहे.

दिवाळीच्या खरेदीसाठी शहरातील मुख्य बाजारपेठा, कपड्यांची दुकाने, सराफा बाजार आणि गर्दीच्या ठिकाणी नागरिकांची मोठी वर्दळ वाढली आहे. गर्दीचा फायदा घेत चोरटे हातचलाखीने नागरिकांचे मोबाईल, पाकीट आणि दागिने लंपास करू शकतात. त्यामुळे



खरेदीच्या नादात आपल्या मौल्यवान वस्तूंकडे दुर्लक्ष करू नका, असा पोलिसांचा इशारा आहे. महिलांनी गर्दीच्या ठिकाणी जाताना दागिन्यांची विशेष काळजी घ्यावी. पर्स, मोबाईल आणि रोख रक्कम सुरक्षित ठेवावी. अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवून अडचण ओढवून घेऊ नये.

घराला कुलूप लावून जाताय? चोरट्यांना निमंत्रण देऊ नका!

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये अनेकजण कुटुंबासह गावाला किंवा बाहेरगावी जातात. अशा वेळी बंद घरांची रेकी करून चोरटे डाव साधण्याची शक्यता असते. त्यामुळे घरातील दागिने, रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तू उघड्यावर ठेवू नयेत. शक्यतो बँकेच्या लॉकरमध्ये सुरक्षित ठेवाव्यात. घरातील दिवे आणि सीसीटीव्ही यंत्रणा सुरू असल्याची खात्री करावी. आपण बाहेरगावी जात असल्याची माहिती समाजमाध्यमांवर अथवा अनोळखी व्यक्तींना देणे टाळावे. शेजाऱ्यांना विश्वासात घेऊन घरावर लक्ष ठेवण्याची विनंती करावी.

पोलिसांचा बंदोबस्त वाढला; नागरिकांनीही सतर्क राहावे!

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बंदोबस्तात वाढ केली असून, शहरातील सुरक्षेवर लक्ष केंद्रित केले आहे. मात्र, केवळ पोलिसांच्या बंदोबस्तावर अवलंबून न राहता नागरिकांनीही सतर्क राहणे गरजेचे आहे. बाजारपेठेत संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाली आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी. चोरी किंवा अन्य अनुचित घटना घडल्यास आपत्कालीन क्रमांक ११२ वर संपर्क साधावा किंवा मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याला कळवावे. दिवाळी आनंदात आणि सुरक्षित वातावरणात साजरी करण्यासोबतच प्रदूषण नियंत्रणासाठीही नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन ठाणेदार धर्मेंद्र जोशी यांनी केले आहे.

वय सातवीचे, विचार वाघिणीचे
डोंगररांगांतील सह्याद्री वाचवायला 'सह्याद्री' मैदानात

हिंगणघाट/जनमाध्यम

वय अवघे सातवीत शिकण्याचे पण विचार मात्र सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याइतके प्रगल्भ आजच्या काळात चिमुकल्यांच्या हातात मोबाईल दिसतो, मात्र हिंगणघाटच्या एका चिमुकलीने त्याच वयात पर्यावरणाच्या रक्षणासाठी लेखणी हाती घेत थेट मुख्यमंत्र्यांनाच पत्र लिहिले आहे. भारतीय विद्या भवन्स शाळेतील सह्याद्री चंद्रशेखर गव्हाणे पाटील या विद्यार्थिनीने कर्जत परिसरातील सुमारे ६०० एकर जमिनीवरील संभाव्य वृक्षतोडीविरोधात आवाज उठविला आहे. तिच्या या धाडसाची सर्वत्र चर्चा होत आहे.

कर्जतचा परिसर सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधील जैवविविधतेचा अनमोल ठेवा आहे. हरित ऊर्जा प्रकल्पासाठी या भागातील मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होण्याची शक्यता समोर आल्यानंतर सह्याद्रीने थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून वृक्षतोड थांबविण्याची मागणी केली. विकासाला विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी का, असा मूलभूत प्रश्न तिने उपस्थित केला आहे. प्रकल्पासाठी पर्यायी जागा शोधण्याची मागणीही तिने केली आहे.

विशेष म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या निसर्ग आणि भूमी रक्षणाच्या विचारांचा दाखला देत तिने पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले आहे.सह्याद्री ही उदगीरचे माजी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अशोकराव पाटील यांची नात, अतनूरचे सरपंच चंद्रशेखर पाटील यांची कन्या असून तिची आई जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका आहे.या घटनेचे खरे वेगळेपण म्हणजे राजकीय संबंधांची पार्श्वभूमी असूनही तिने सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याचे धाडस दाखविले. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा अधिकार आहे आणि निसर्गरक्षण ही जबाबदारी, याची जाणीव या चिमुकलीने करून दिली आहे.तिचा संदेश केवळ मुख्यमंत्र्यांसाठी नाही, तर संपूर्ण व्यवस्थेसाठी आहे.



मुख्यमंत्र्यांना पाठविले पत्र

गुलाल उधळला, आमदार झाले, आता पदवीधरांच्या प्रश्नांचे काय
निवडणुकीत आश्वासनांचा पाऊस,सहा वर्षे प्रतीक्षेची शिक्षा

सेलू /अभय बेदमोहता

निवडणूक संपली, मतपेट्यांचा निकाल लागला, विजयाचा गुलाल उधळला आणि आमदारांच्या गळ्यात विजयाच्या माळाही पडल्या. मात्र,ज्या पदवीधर मतदारांच्या मतांवर हा राजकीय विजय उभा राहिला,त्यांच्या आयुष्यातील प्रश्नांचे काय, बेरोजगारी, रखडलेल्या नोकरभरत्या, परीक्षांमधील घोळ, शैक्षणिक संस्थांमधील अनागोंदी आणि सुशिक्षित तरुणांचे भविष्य या प्रश्नांवर आता कोण बोलणार, निवडणुकीच्या रणांगणात पदवीधरांच्या नावाने गळा काढणारे लोकप्रतिनिधी पुढील सहा वर्षे त्यांच्या दारात दिसणार तरी का? हा प्रश्न आज सुशिक्षित तरुणाईला अस्वस्थ करीत आहे.

निवडणुकीच्या प्रचारात पदवीधरांचे प्रश्न म्हणजे उमेदवारांच्या भाषणातील हुकमी मुद्दे असतात. बेरोजगारांना रोजगार, रखडलेल्या नियुक्त्या, स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार, शिक्षक-प्राध्यापकांचे प्रश्न आणि तरुणांच्या



भविष्याचे चित्र बदलण्याची आश्वासने दिली जातात. मात्र, निवडणूक संपली की या आश्वासनांचे काय होते, याचा अनुभव पदवीधरांना अनेकदा आला आहे. मत मागताना पदवीधरांचा दरवाजा ठोठावणारे नेते निकालानंतर मात्र त्याच मतदारांना भेटण्यासाठी वेळ काढतील का, हा खरा प्रश्न आहे.

जबाबदारी सरकारची, मग आमदार कशासाठी

प्रश्न उपस्थित केला की, 'हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीत येतो, आमच्या हातात काही नाही', अशी नेहमीची पळवाट काढली जाते. मग विधान परिषदेत जाण्याचा आणि पदवीधरांचे प्रतिनिधित्व करण्याचा नेमका उपयोग काय? सरकारच्या अखत्यारीतील प्रश्न सरकारपर्यंत पोहोचवणे, सभागृहात आवाज उठवणे, संबंधित मंत्र्यांना जाब विचारणे आणि निर्णय होईपर्यंत पाठपुरावा करणे हीच तर लोकप्रतिनिधींची खरी जबाबदारी आहे. केवळ अधिकार नसल्याचे सांगून हात झटकायचे असतील, तर पदवीधरांनी मतदानातून निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून अपेक्षा तरी काय ठेवायची,

सहा वर्षांचा कार्यकाळ की सहा वर्षांची प्रतीक्षा

आता पुढील सहा वर्षांसाठी पदवीधरांनी आपले प्रतिनिधी निवडून दिले आहेत. त्यामुळे हा कार्यकाळ केवळ सत्कार, समारंभ, उद्घाटने आणि राजकीय व्यासपीठांवरील भाषणांमध्येच जाणार की पदवीधरांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय होणार, याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. बेरोजगार तरुणांना नोकरी मिळवून देण्यासाठी कोणती ठोस भूमिका घेतली जाणार रखडलेल्या भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी कोणता दबाव निर्माण केला जाणार परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कोणती पावले उचलली जाणार या प्रश्नांची उत्तरे आश्वासनांतून नव्हे, तर कृतीतून मिळाली पाहिजेत.

गुलालाचा रंग उतरला; आता कामाचा हिशेब द्या

लोकशाहीत निवडणूक जिंकणे ही लोकप्रतिनिधींची पात्रता असू शकते; मात्र जनतेचे प्रश्न सोडवणे ही त्यांची खरी कसोटी असते. विजयाच्या जल्लोषात पदवीधरांचे प्रश्न हरवता कामा नयेत. निवडणुकीपूर्वी मतदारांच्या दारात जाणारे आमदार निवडणुकीनंतरही त्यांच्यासाठी उपलब्ध राहणार का, याचीच आता परीक्षा सुरू झाली आहे.

पदवीधरांना सहा वर्षे केवळ आश्वासनांच्या कुबड्यांवर चालायचे नाही. त्यांना रोजगार हवा, न्याय हवा आणि त्यांच्या शैक्षणिक पात्रतेला साजेशी संधी हवी आहे. त्यामुळे नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींनी आता भाषणबाजी बाजूला ठेवून कामाचा हिशेब द्यावा. कारण निवडणुकीचा गुलाल काही दिवसांत उतरतो पण जनतेच्या अपेक्षांचा हिशेब सहा वर्षे संपेपर्यंत कायम राहतो.

जमनालाल बजाज जयंतीनिमित्त उद्या वर्धेत कार्यक्रमांची मेजवानी
बजाज चौकाचे सौंदर्यीकरण लोकार्पण; फायर शोसह शंभर वर्षांच्या औद्योगिक प्रवासाचे होणार दर्शन

वर्धा/जनमाध्यम

उद्योग, समाजसेवा आणि स्वातंत्र्यलढ्यात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे वर्ध्याचे भूषण पद्मभूषण जमनालाल बजाज यांच्या जयंतीनिमित्त उद्या,४ नोव्हेंबर रोजी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बजाज चौक परिसराचे सौंदर्यीकरण,औद्योगिक वारशाचे दर्शन आणि आकर्षक फायर शो ही या सोहळ्याची प्रमुख आकर्षणे ठरणार आहेत.

जमनालाल बजाज यांचा जन्म ४ नोव्हेंबर १८८९ रोजी राजस्थानातील काशी का बास येथे झाला. वयाच्या चौथ्या वर्षी बच्छराज बजाज यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यानंतर वर्धा हीच त्यांची कर्मभूमी बनली. महात्मा गांधी यांचे निकटवर्तीय म्हणून ओळख असलेल्या बजाज यांनी उद्योगासोबतच खादी, ग्रामोद्योग, अस्पृश्यता निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी आयुष्य समर्पित केले.

१९२४ मध्ये वर्ध्यातील



जिनिंग व्यवसायातून सुरू झालेल्या बजाज उद्योगसमूहाच्या शंभर वर्षांच्या प्रवासाचा लेखाजोखा मोठ्या स्क्रीनवर सादर केला जाणार आहे.जयंतीदिनी सकाळी ८ वाजता बजाज चौक परिसराच्या सौंदर्यीकरण कामाचा लोकार्पण सोहळा होईल. नागरिकांनी सकाळी ७.४५ वाजता लक्ष्मीनारायण मंदिर परिसरात उपस्थित राहावे,असे आवाहन शेखर बजाज यांनी केले आहे. सायंकाळी बजाज चौकात आकर्षक फायर शो होणार असून, या कार्यक्रमांतून वर्धा आपल्या महान सुपुत्राला अभिवादन करणार आहे.

आनंदवाडीतील महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

आष्टी - तालुक्यातील आनंदवाडी येथील ३९ वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. कविता विलास शिंदे असे मृत महिलेचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, कविता शिंदे यांनी १४ ऑक्टोबर रोजी दुपारी १.०५ वाजण्यापूर्वी राहत्या घरी गळफास घेतला होता.

ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, २४ ऑक्टोबर रोजी दुपारी २.०५ वाजता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मृतदेह इर्विन रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला होता. याप्रकरणी अमरावती शहरातील सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. पुढील चौकशीसाठी मर्ग डायरी तळेगाव (शा.पं.) पोलिसांकडे पाठविण्यात आली. तळेगाव पोलिसांनीही या प्रकरणाची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

कौशल्याच्या बळावर विद्यार्थिनींना स्वावलंबनाची संधी
श्री समर्थ महाविद्यालयात मेकअप व स्कीन ट्रीटमेंट कार्यशाळा

आष्टी/जनमाध्यम

शिक्षणासोबतच व्यावसायिक कौशल्य आत्मसात केल्यास रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. विशेषतः सौंदर्य क्षेत्रात वाढणारी मागणी लक्षात घेता विद्यार्थिनींना स्वावलंबनाचा मार्ग उपलब्ध व्हावा,या उद्देशाने आष्टी येथील श्री समर्थ कला व वाणिज्य महाविद्यालयात मेकअप आणि स्कीन ट्रीटमेंट (हायड्रा फेशियल) विषयावर विशेष कार्यशाळा घेण्यात आली. महिला तक्रार निवारण कक्षाच्या वतीने आयोजित या कार्यशाळेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण हरने होते. प्रमुख अतिथी म्हणून आयक्यूएसी समन्वयक डॉ. मोरेश्वर देशमुख आणि आष्टी येथील प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट मंजुषा सावरकर उपस्थित होत्या.प्रा.प्रियंका जवाडे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेचा उद्देश



स्पष्ट केला.यावेळी मंजुषा सावरकर यांनी विद्यार्थिनींना मेकअपची आधुनिक तंत्रे, त्वचेची निगा राखण्याच्या पद्धती, स्कीन ट्रीटमेंटचे महत्त्व आणि सौंदर्यप्रसाधनांचा योग्य वापर याबाबत सविस्तर माहिती दिली. केवळ माहितीपुरते मार्गदर्शन न करता त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मेकअपचे विविध प्रकार आणि बारकावे समजावून सांगितले. ब्युटी पार्लर व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, या क्षेत्रातील वाढत्या संधी आणि स्वतःचा व्यवसाय उभारून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचे मार्गही त्यांनी विद्यार्थिनींसमोर मांडले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. अरुण हरने यांनी महिला सक्षमीकरणासाठी शिक्षणाबरोबरच कौशल्य विकासाला महत्त्व देण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थिनींनी केवळ नोकरीच्या संधींची वाट न पाहता स्वतःच्या कौशल्याच्या जोरावर रोजगारनिर्मिती करावी आणि स्वावलंबी बनावे,असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. कपिल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. देवेंद्र खडगी यांनी संचालन केले.

निवडणूक आयोग सरकारच्या दावणीला
आंदोलनात खा.अमर काळे यांचा सहभाग

वर्धा/दिल्ली/जनमाध्यम

देशातील लोकशाहीचा कणा असलेल्या निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवरच आता विरोधकांनी हल्लाबोल केला आहे. निवडणूक आयोग सरकारच्या हातचे बाहुले बनल्याचा गंभीर आरोप करीत इंडिया आघाडीने केंद्र सरकारविरोधात दिल्लीतील रामलीला मैदानावर रणशिंग फुंकले.१ नोव्हेंबर रोजी झालेल्या या आंदोलनात केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटविण्याची मागणी करण्यात आली. वर्ध्याचे खासदार अमर काळे यांनीही या आंदोलनात सहभागी होत विरोधकांच्या भूमिकेला पाठिंबा दिला.विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेतील त्रुटी आणि फॉर्म-६ मधील अनियमिततेवरून विरोधक आक्रमक झाले आहेत. निवडणुका निष्पक्ष व्हाव्यात यासाठी निर्माण झालेली घटनात्मक संस्था सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली काम करीत



असल्याचा आरोप इंडिया आघाडीने केला. लोकशाहीत मतदार सर्वोच्च असतो, मात्र मतदार याद्यांबाबतच संशय निर्माण होत असेल तर निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेचे काय असा प्रश्न आंदोलनातून उपस्थित करण्यात आला. सत्ताधाऱ्यांना अनुकूल निर्णय आणि विरोधकांच्या प्रत्येक आक्षेपावर मौन, अशी आयोगाची प्रतिमा निर्माण होत असेल तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे, अशी भूमिका इंडिया आघाडीने मांडली. आता या आंदोलनानंतर केंद्र सरकार आणि निवडणूक आयोग विरोधकांच्या आरोपांना काय उत्तर देतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

जिद्दीच्या बळावर वैशाली गायकवाड यांची गरुडभरारी
'लॉरिअल महाराष्ट्र-२०२६' आणि 'गोल्ड इंडिया-२०२६-२७' किताबावर कोरले नाव

वर्धा/जनमाध्यम

स्वप्नांना परिस्थितीची बंधने नसतात, तर जिद्द आणि मेहनतीच्या बळावर त्यांना यशाचे पंख मिळतात, याचा प्रत्यय वर्ध्याच्या वैशाली गायकवाड यांनी दिला आहे. फॅशन आणि सौंदर्य क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची स्वतंत्र ओळख निर्माण करत त्यांनी एकाच स्पर्धेत दोन मानाचे किताब पटकावून वर्ध्याच्या शिरपेचात मानाचा दुहेरी मुकुट रोवला आहे.

छत्तीसगडमधील दुर्ग येथील प्रतिष्ठित पृथ्वी पॅलेस येथे झील एंटरटेनमेंट ऑफिशियलच्या वतीने आयोजित 'मिस्टर इंडिया, मिस इंडिया आणि मिसेस इंडिया फॅशनिंग अँड मॉडेलिंग शो'मध्ये वैशाली गायकवाड यांना 'लॉरिअल महाराष्ट्र-२०२६' आणि 'गोल्ड इंडिया-२०२६-२७' या किताबांनी गौरविण्यात आले.

लहानपणापासूनच फॅशन, सौंदर्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाची आवड असलेल्या



वैशाली यांनी आपल्या छंदाला ध्येयाची जोड दिली.

सातत्यपूर्ण मेहनत, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत यशाचा ठसा उमटविला.एकाच वेळी दोन प्रतिष्ठित किताब मिळविणे ही त्यांच्या मेहनतीची आणि प्रतिभेची पावती मानली जात आहे. त्यांच्या यशामुळे वर्ध्यातील महिलांसमोर आत्मविश्वासाने स्वप्नांचा पाठलाग करण्याचा प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे. वैशाली यांच्या या दुहेरी यशाचे वर्ध्यात सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तरुणाचा मृतदेह आढळला

वर्धा- शहरातील नालवाडी परिसरात देशमुख लॉनच्या मागे हनुमान मंदिराजवळील नाल्याशेजारी ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. मोहन शंकरराव मुरखे (रा. महाकाळ, ता. जि. वर्धा) असे मृत तरुणाचे नाव आहे. रविवारी (१ नोव्हेंबर) सकाळी गावातील एका ऑटोचालकाने मोहनच्या आईला फोन करून मुलाचा मृतदेह आढळल्याची माहिती दिली. त्यानंतर आई कलावती मुरखे यांनी नातेवाइकांसह घटनास्थळी धाव घेतली. मोहन हा वर्ध्यातील कारला चौक परिसरात पत्नीसमवेत भाड्याने राहत होता. मात्र,दारूच्या व्यसनामुळे पत्नी महिनाभरापूर्वी माहेरी गेल्यानंतर तो महाकाळ येथे आईकडे राहण्यास आला होता. शनिवारी नागपूरला इलेक्ट्रिक साहित्य आणण्यासाठी जात असल्याचे सांगून तो घराबाहेर पडला होता. त्यानंतर तो बेपत्ता होता. रामनगर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

नागसेननगरातील तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

वर्धा- नागसेननगर परिसरातील २५ वर्षीय तरुणाचा सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. कुणाल यशवंत बोरकर असे मृत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्याला २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३६ वाजता कस्तुरबा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्याच दिवशी रात्री ११.२५ वाजता त्याची प्राणज्योत मालवली.

खरीपाने कंबरडे मोडले, रब्बीनेही पाठ फिरवली
शेतात पीक नाही,विहिरीत पाणी नाही शेतकऱ्यांनी जगायचे तरी कसे!
जलाशयांत ठणठणाट पेरणीच्या उंबरठ्यावरच रब्बी हंगामाचे गणित कोलमडले

वर्धा/जनमाध्यम

शेतकऱ्यांच्या नशिबी संकटांची मालिका संपण्याचे नाव घेत नाही. कधी अस्मानी संकट तर कधी सुलतानी संकट यंदा पावसाने दगा दिल्याने खरीप हंगामाचे अक्षरशः वाटोळे झाले. पिके उभी असताना पावसाने दडी मारली. उत्पादनात ५० टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. पदरात उत्पन्नाऐवजी नुकसान पडले. आता खरीपातील नुकसान भरून काढण्याची शेवटची आशा असलेल्या रब्बी हंगामावरही पाणीटंचाईचे सावट गडद झाले आहे. विहिरींनी तळ गाठला, बोअरवेलची पाणीपातळी खालावली आणि जलाशयांतही नाममात्र साठा उरला. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी रब्बीची पेरणी करायची तरी कशाच्या भरवशावर असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शेतीसाठी वर्षभर राबायचे, कर्ज काढून बियाणे, खते, कीटकनाशके आणि मशागतीवर लाखोंचा खर्च करायचा, मात्र निसर्गाने साथ सोडली की संपूर्ण संसाराचे गणित कोलमडते. यंदा खरीप हंगामात शेतकऱ्यांनी हेच भोगले. पावसाच्या खंडामुळे कापूस, सोयाबीनसह अन्य पिकांच्या उत्पादनाला मोठा फटका बसला.

खरीपात झालेले नुकसान रब्बीतील हरभरा, गहू आणि अन्य पिकांतून भरून काढण्याचे स्वप्न शेतकरी पाहत होते. मात्र, ऑक्टोबर संपण्यापूर्वीच विहिरी आणि बोअरवेलमधील पाणी आटण्यास सुरुवात झाली. पेरणी



केली तरी पिकांना पाणी द्यायचे कुठून? पेरणीनंतर पिके पाण्याअभावी वाळली तर पुन्हा कर्जाचा डोंगर वाढणार. त्यामुळे रब्बीची पेरणी करावी की पडिक जमीन ठेवावी, अशा कात्रीत शेतकरी सापडले आहेत. शेती करणेही धोक्याचे आणि शेती न करणेही परवडणारे नाही, अशी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे.जिल्ह्यातील जलाशयांमध्ये उपयुक्त पाणीसाठा अत्यल्प राहिला आहे. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन बोअरवेल खोदण्यावर निर्बंध घातले आहेत. उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असल्याने त्याला प्राधान्य देणे आवश्यकच आहे.कृषी विभागाने कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांची निवड करण्याचे आवाहन केले आहे. कागदावर हा सल्ला योग्य असला तरी प्रत्यक्ष शेतात पाणीच नसेल तर कमी पाण्यातील पीक घेऊनही उपयोग काय? विहिरींची पाणीपातळी खालावत असताना आणि बोअरवेलवरही पाण्याची शाश्वती नसताना शेतकऱ्यांनी कोणत्या आधारावर पेरणी करावी, हा प्रश्न अनुत्तरित आहे. केवळ सल्ले देऊन शेतकऱ्यांचे संकट संपणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष उपाययोजना कराव्या लागतील.

शेतकऱ्यांच्या मदतीला सरकार धावणार कधी

शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्ज, घरात खर्चाची चिंता आणि शेतात पाण्याचा ठणठणाट आहे. खरीप हंगामाने आर्थिक कंबरडे मोडले आणि रब्बी हंगामाने उरलीसुरली आशाही हिरावून घेतली, तर शेतकऱ्यांनी जगायचे तरी कसे? सरकारकडून मदतीच्या घोषणा होतात; मात्र संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या हातात ठोस मदत पोहोचणे गरजेचे आहे. खरीप नुकसानीची योग्य भरपाई, पीकविम्याचा लाभ आणि रब्बी हंगामासाठी पाणी नियोजन यावर तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे. अन्यथा यंदाचा दुष्काळ शेतकऱ्यांच्या शेतापुरता मर्यादित राहणार नाही, तर त्यांच्या संपूर्ण संसारावरच आर्थिक संकटाचे सावट गडद करेल.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलला सर्व्हिस वीकमध्ये तीन पुरस्कार



अमरावती/प्रतिनिधीः- लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलने सर्व्हिस वीक २०२६ अंतर्गत राबविलेल्या विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रमांसाठी तीन प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले. डायबेटिस सेवाकार्यासाठी सिल्व्हर अवॉर्ड, युवा सेवाकार्यासाठी गोल्डन अवॉर्ड तसेच सर्व्हिस वीक स्क्रॅपबुकसाठी पुरस्कार मिळाल्याने क्लबच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नागपूर येथील हॉटेल रीजेंटा येथे १ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित सर्व्हिस वीक अवॉर्ड सेलिब्रेशन सोहळ्यात डिस्ट्रिक्ट गव्हर्नर MJF लायन विलास साखरे यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलचे अध्यक्ष डॉ. दीपक क-हे, कॅबिनेट ऑफिसर दिनेश अग्रवाल, राजा किंगराणी आणि डॉ. निखिल जैन यांनी पुरस्कार स्वीकारले. या प्रसंगी किरण साखरे तसेच सर्व्हिस वीक चेअरपर्सन सुनील जोशी उपस्थित होते. क्लबने आरोग्य, युवा सेवा, सामाजिक बांधिलकी आणि विविध मानवतावादी उपक्रमांच्या माध्यमातून समाजहितासाठी केलेल्या कार्याची ही गौरवपूर्ण पावती असून, या यशामुळे क्लबच्या सर्व सदस्यांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

घरकाम करणाऱ्या तरुणीनेच लंपास केले आठ लाखांचे दागिने!

अमरावती/प्रतिनिधीः- घरात विश्वासाने काम करणाऱ्या तरुणीनेच मालकाच्या घरातील सोन्या-चांदीचे लाखो रुपयांचे दागिने चोरल्याची घटना राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शंकरनगर रोड परिसरात उघडकीस आली. या चोरीत सोन्या-चांदीचे दागिने आणि अन्य मौल्यवान वस्तू असा एकूण ८ लाख २९ हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. याप्रकरणी देवल विजयकुमार मानसाता (वय ३८) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी १८ वर्षीय तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

चोरीला गेलेल्या ऐवजात १५ ग्रॅमचा नेकलेस सेट, ५ ग्रॅमचे कानातील झुमके, ३ ग्रॅमच्या कानातील बाळ्या, १५ ग्रॅमचे ब्रेसलेट, ३० ग्रॅमचे मंगळसूत्र, १० ग्रॅमची चैन, ३ ग्रॅमची अंगठी, एक ग्रॅमचे पेंडंट तसेच अन्य वजनाच्या सोन्याच्या चेन आणि जुने वापरलेले मंगळसूत्र यांचा समावेश आहे. याशिवाय १० ग्रॅमच्या चांदीच्या पायातील पैंजण, २०० ग्रॅमची चांदीची नाणी, तीन ग्रॅमचे जोडवे, २५ ग्रॅमची चांदीची वाटी, १० ग्रॅमचा चांदीचा दिवा आणि अन्य जुने वापरलेले चांदीचे दागिनेही चोरीस गेले आहेत. या सर्व ऐवजाची एकूण किंमत ८ लाख २९ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. देवल मानसाता यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी १८ वर्षीय तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

E-TENDER NOTICE

MAHATRANSCO

MSETCL invites online bids (SRM e-Tender) from registered agencies on MSETCL's e-Tendering website. For further details please visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

Sr. No.	Tender No. & Description of Work
1	Work of stub strengthening of tower legs & Chimney Height raising of EHV towers of various EHV lines under jurisdiction of EHV (O&M) Circle, Akola. (1st Call) **RFX No. 7000041999 Tender No.: MSETCL/SE/EHV/O&M/CRL/AKL/Tech/2026-27/T-19-Stub Strengthening & Chimney Height Raising Estimated Cost = Limited to Rs. 50,00,000.00/-**

Publicity period of tender	Tender Available at
Start Date:- From:- 03/11/2026 @ 00:00 Hrs. onwards	https://srmetender.mahatransco.in
Submission Deadline :-	Tender Opening Date :-
12/11/2026 @ up to 23:59 Hrs.	Technical Bid: Date : 13/11/2026, 11:00 Hrs, if possible. Price Bid: Date : 13/11/2026, 12:00 Hrs, if possible.

Contact Person: The Dy. Executive Engineer, EHV O&M Circle, AKOLA.
Contact No.: 8554989534 (Dy. Executive Engineer), e-mail id: se1200@mahatransco.in

1. Relevant portions of the Tender which the bidders have to fill up, would be available online on abovesaid website.
2. EMD amount of **Rs. 50,000.00/- and Tender Fees Rs. 500 + GST** as applicable (per tender & non-refundable) should be paid on-line only. **Payment in cash/DD will not be accepted.** Bidder can pay through credit card/Debit Card/ Net Banking. The payment confirmation will be done by the Corporate Office.
3. Tender documents can be downloaded only online from above-said website.
4. Eligible bidders shall submit their bids well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
5. If the payment of tender fee and EMD by a bidder is not confirmed, then the bidder will be straight-way disqualified and his bids will not be considered for further tendering process.

Note: All eligible & interested bidders are mandated to get enrolled on SRM e-Tendering portal. (https://srmetender.mahatransco.in/)

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV O&M CIRCLE, AKOLA

सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.७०६/२०२६ ने.ता.१६.१२.२०२६

अर्जदार -
१. **श्रीमती लिलाबाई रमेशराव धांडे,** वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री सतिश रमेशराव धांडे,** वय ४६ वर्षे, धंदा - शेती
३. **श्री निलेश रमेशराव धांडे,** वय ४१ वर्षे, धंदा - शेती
तिघेही रा. गिट्टीखान, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **सौ.संगीता वसंतराव भवाळकर,** वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
५) **सौ.सविता घनशाम पडोळे,** वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.दाभा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

-- विरुध्द --
कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ चे वडिल नामे **रमेशराव दमडाजी धांडे** हे **दिनांक २९/०९/२०२६** रोजी **मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०२/११/२०२६ शिक्का
आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.७१४/२०२६ ने.ता.२१.१२.२०२६

अर्जदार -
१. **सविता सुरेश गोहाड,** वय ४० वर्षे, धंदा - घरकाम
२. **मोहित सुरेश गोहाड,** वय १९ वर्षे, धंदा - शिक्षण
३. **उन्नती सुरेशराव गोहाड,** वय १२ वर्षे, धंदा - शिक्षण
अर्जदार नं.३ करीता अ.पा.क. आई अर्जदार नं.१
सर्व रा. रामजीबाबा नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **सुरेश महादेवराव गोहाड** हे **दिनांक २९/०९/२०२६** रोजी **मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०२/११/२०२६ शिक्का
आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.६८५/२०२६ ने.ता.२०.११.२०२६

अर्जदार -
१. **सौ.रोहिणी संजय बोंडे,** वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री संजय हरिरामजी बोंडे,** वय ६३ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.राजुरवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदाराचा मुलगा नामे **शुभम संजयराव बोंडे** हा अविवाहीत असतांना **दि.०१/११/२०२३** रोजी **पीडीएमसी हॉस्पिटल, अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मय्यत झालेला आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ३१/१०/२०२६ शिक्का
आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६

घरगुती स्वयंपाकासाठी उत्साही व कल्पक व्यक्ती पाहिजेत

Personal Cook / Home Chef

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ५९
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती
आर.एम.जे.सी.क्र.५२१/२०२६ ने.ता.२६.११.२०२६

अर्जदार : १. **दिलीप रंगलाल जोशी,** वय ६१ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.गुलजार पेठ, शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक रंगलाल कोंदूजी जोशी** यांचा **मृत्यू दि.०५/०६/१९८१** रोजी तसेच **मृतक सरस्वताबाई रंगलाल जोशी** यांचा **मृत्यू दि.०१/०७/२०२०** रोजी रा.शिरजगाव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५२१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.३१.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.७१५/२०२६ ने.ता.०२.१२.२०२६

अर्जदार -
१. **श्री रामदास सदाशिवराव पुंड,** वय ६२ वर्षे, धंदा - शेती
२. **श्री शुभम रामदासराव पुंड,** वय ३० वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.स्नेहल राहुल ठाकरे,** वय २६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.दुर्गा नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१ ची पत्नी तर अर्जदार नं.२ व ३ ची आई नामे **अरुणा रामदासराव पुंड** ही **दिनांक ३१/०७/२०२०** रोजी **मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मय्यत झालेली आहे. तिचे मृत्यूनंतर तिचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०२/११/२०२६ शिक्का
आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.)क्र.२६९/२०२६ ने.ता.३०.१०.२०२६

अर्जदार : १. सुशिला दिलीपराव देशमुख
२. शैलेष दिलीपराव देशमुख
३. उमेश दिलीपराव देशमुख
नं.१ ते ३ रा.वार्ड नं.३ नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. स्मिता कैलास गवळी,
रा.नं.४/१४ब/२/२/२अ१ रामनगर कौतिक हॉटेल जवळ, रहाटनी, पुणे शंहर पिंप्री, कॉलनी, पुणे, ता.जि.पुणे

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **दिलीप प्रल्हादराव देशमुख** यांचा मृत्यू दि.**०७.०८.२०२५** रोजी मुंडनिशांकराव नांदगांव खंडे., ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ व ३ ही मुले व अर्जदार नं.४ ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२८ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२६१/२०२६
डेव्हीड अधिक एक -वि- निरंक
पुढील ता.३०.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Devid Vijendra Prasad
Age 59 Yrs. Occu.: Labourer
2. Abhishek Devid Prasad
Age 59 Yrs. Occu.: Service
All R/o Lane No., Near Mahakali Mutton Shop, Yashoda Nagar, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sonali Devid Prasad हे दिनांक 14.05.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Devid Vijendra Prasad + 1 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Devid Vijendra Prasad + 1 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती
आर.एम.जे.सी.क्र.५५०/२०२६ ने.ता.१०.१२.२०२६

अर्जदार :
१. **अनिता शिवा आठवले,** वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. **लिला पंजाबराव आठवले,** वय ७३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार क्र.१ व २ रा.आदर्श विद्यालय जवळ, जवळा शहापुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक शिवा पंजाबराव आठवले** यांचा **मृत्यू दि.१९/०९/२०२६** रोजी सोनेगाव निपाणी, ता.जि.नागपूर येथे झालेला असून ते कायमचे रा. जवळा शहापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५५०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.०२.११.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९२५/२०२६
Smt.Ramrati Ambadas Yadav+3 -वि- निरंक
पुढील ता.०४.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Smt.Ramrati Ambadas Yadav, Age 60 Yrs. Occu.: Household
R/o Near Ram Mandir, Sangani Nagar, Amravati.
2. Smt.Kanchan Vikas Yadav, Age 47 Yrs. Occu.: Household
3. Yash Vikas Yadav, Age 53 Yrs. Occu.: Education/Student
Appli.No.1 & 2 R/o Near Ram Mandir, Sangani Nagar,Galli No.2 Amravati.
4. Ku.Riyanshi Vikas Yadav (Minor), Age 10 Yrs. Occu.: Education
Being Minor represented and signed through her Natural Guardian Mother Appli.No.2, Smt.Kanchan Vikas Yadav,
R/o Near Ram Mandir, Sangani Nagar,Galli No.2 Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Vikas Ambadas Yadav हे दिनांक 13.07.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Ramrati Ambadas Yadav+3 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Ramrati Ambadas Yadav+3 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.)क्र.२७९/२०२६ ने.ता.०५.१२.२०२६

अर्जदार : १. चंद्रभागा महादेव गहुकार
२. नलु मुकिंदा गहुकार
३. नागेश मुकुंदा गहुकार
सर्व रा.वार्ड नं.३ हिवरा मुरादे ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. सिमा बाळू सैरिसे
रा.फुलआमला, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **मुकुंदराव महादेवराव गहुकार** यांचा मृत्यू दि.**१४.०७.२०१५** रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती, ता. जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही आई असून अर्जदार नं.२ ही पत्नी, अर्जदार नं.३ हा मुलगा व अर्जदार नं.४ ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३१ ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.)क्र.२९६/२०२६ ने.ता.०५.१२.२०२६

अर्जदार : १. स्मिता अक्षय भोंगळे
२. अद्वीता अक्षय भोंगळे
३. भक्ती अक्षय भोंगळे
सर्व रा.वार्ड नं.३ जळू, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **अक्षय सुखदेवराव भोंगळे** यांचा मृत्यू दि.**१७.०९.२०२५** रोजी जळू, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ व ३ ह्या मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३१ ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

-सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.६५३/२०२६ ने.ता.०२.११.२०२६

अर्जदार -
१. **भाऊराव शंकरराव बारस्कर,** वय ६७ वर्षे, धंदा - शेती
२. **कैलास शंकरराव बारस्कर,** वय ६० वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा. पिंपळखुरा, हिवरखेड, ता.मोर्शी, जि. अमरावती
३. **मयुरा रामदास धोटे,** वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. **निर्मला युवराज ठाकरे,** वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पिंपळगाव वखाजी, पो.ता.नरखेड, जि.नागपूर

-- विरुध्द --
निल (कुणीही नाही)

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांचे **वडिल नामे शंकरराव ईष्णाजी बारस्कर** यांचा **दि. ०३/१०/२००५** रोजी **हिवरखेड, ता.मोर्शी, जि. अमरावती** येथे मृत्यू झाला. तसेच अर्जदार क्र.१ ते ४ यांची **आई तुळसा शंकरराव बारस्कर** हिचा **दि.०६/०६/२००३** रोजी **हिवरखेड ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मृत्यू झाला. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदार व गैरअर्जदारा शिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.१०.२०२६ शिक्का
आदेशान्वये,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर), मोर्शी

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

वि. ए.बी.कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०१)
कि.कि.अर्ज क्रमांक १२२३/२०२६

अर्जदार : राजेंद्र गोपाल अग्रवाल
वय ५९ वर्षे,
रा.नांदुरा बु., ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार: मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, नांदुरा बु.ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार राजेंद्र गोपाल अग्रवाल, यांनी दुलारी गोपाल अग्रवाल यांच्या मृत्यूची नोंद दिनांक ०३.०३.२०१३ रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.१ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक २३.११.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.न्यायालय योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का
आदेशान्वये,
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भातकुली

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी. क्र.२०५/२०२६ ने.ता.२०.११.२०२६

जाहीरनामा

अर्जदार :
१. श्रीमती सुधा दामोदरराव ठवळी, वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
रा.महालक्ष्मी नगर, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
२. संध्या सुदाम काकडे, वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.एस.टी.डेपो जवळ, वसाहत सिंचन, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. ज्योती दामोदरराव ठवळी, वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वार्ड नं.२, बासलापूर, पो.मांजरखेड कसबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. राहुल दामोदर ठवळी, वय ४० वर्षे, धंदा - नोकरी
रा.महालक्ष्मी नगर, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **श्रीमती सुधा दामोदरराव ठवळी व ईतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **दामु अमृतराव ठवळी उर्फ दामोदर अमृतराव ठवळी,** रा.महालक्ष्मी नगर, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांचा मृत्यू दिनांक **१८.०७.२०२५** रोजी झेनिथ हॉस्पीटल, अमरावती ता. जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक **०५ माहे ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

एस.एस.भिंगारदेव, ७ वे न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०७)
कि.कि.अर्ज क्रमांक १२२५/२०२६

अर्जदार : राजेंद्र गोपाल अग्रवाल
वय ५९ वर्षे,
रा.नांदुरा बु., ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार: मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, नांदुरा बु.ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०७ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार अर्ज दाखल करतो की, अर्जदाराचे वडील नामे गोपाल बिसनलाल अग्रवाल यांचा मृत्यू दिनांक १६.११.२०१४ रोजी झाला आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ पुढील योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का
आदेशान्वये,
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे हळद पिकाबद्दल मार्गदर्शन

अमरावती-येथील पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे मौजे आरहट,अंजनगाव बारी येथे प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कृषी महाविद्यालयातील प्रा. डॉ. स्वप्नील ज्ञानेश्वर देशमुख यांनी हळद पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापन व कीडरोग व्यवस्थापन आणि पीक काढणी पश्चात तंत्रज्ञान याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच कापूस पिकातील उत्पन्न वाढीसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांवर शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या शंकांचे निरसन केले.सदर प्रक्षेत्र भेटी मधील मार्गदर्शना बाबत उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून भविष्यात देखील पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे पिक उत्पादन,संरक्षण,काढणी पश्चात तंत्रज्ञान व शेतमालाचे विपणन यासंदर्भात मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे श्री.विजयादशमी उत्सवाचे आयोजन

कुऱ्हा - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कुऱ्हा नगराच्या वतीने बुधवार, ४ नोव्हेंबर रोजी श्री संत विठोबा महाराज मंदिर परिसरात श्री विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाच्या माध्यमातून हिंदू संस्कृती, परंपरा आणि सामूहिक शक्ती जागरणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.सत्याचा असत्यावर विजय,धर्माचे रक्षण आणि समाजातील एकता यांचे प्रतीक म्हणून हा सण साजरा केला जातो.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कुऱ्हा येथील भूषण इन्स्टिट्यूशन अकॅडमीचे संचालक भूषण पचारे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख वक्ते म्हणून अमरावती जिल्ह्यातील सामाजिक समरस्ता मंचाचे राजेश झुटी मार्गदर्शन करणार आहेत.कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ६.३० वाजता होणार असून, सायंकाळी ७.३० वाजता पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले आहे.या उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका संघचालक विजय मा. डहाके, शाखा कार्यवाह भिमराव मा. मेश्राम आणि सहकार्यवाह अशोक शा. शिंगाणे परिश्रम घेत आहेत.या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाला नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कुऱ्हा नगराच्या वतीने करण्यात आले आहे.



डीएसओ कराटे चॅम्पियनशिपमध्ये टायटन्स पब्लिक स्कूलचे उल्लेखनीय यश

अंजनगाव बारी-जिल्हा क्रीडा अधिकारी डीएसओ यांच्या वतीने २८ ते ३० ऑक्टोबर दरम्यान आयोजित कराटे चॅम्पियनशिपमध्ये विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीद्वारा संचालित सीबीएसई टायटन्स पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत चार पदकांची कमाई केली. या स्पर्धेत तन्मय राठोड याने सुवर्णपदक पटकावत प्रथम क्रमांक मिळवला असून, त्याची पुढील विभागीय स्तरावरील कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.स्पर्धेत तन्मय राठोड याने सुवर्णपदक (प्रथम क्रमांक), आराध्या मेश्राम हिने रौप्यपदक (द्वितीय क्रमांक), तर अर्णव चार्वेकर आणि परीधी नवघरे यांनी कांस्यपदक (तृतीय क्रमांक) पटकावले.विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक जफर खान आणि निलेश फुलंबरकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य अजय चौबे, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद आणि पालकांनी सर्व पदकविजेत्या विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. तन्मय राठोड याच्या विभागीय स्पर्धेतील पुढील वाटचालीसाठीही शुभेच्छा दिल्या.

एडिफायच्या अमिताभ सिरसाट याची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड



अमरावती-एडिफाय शाळा, अमरावती येथील इयत्ता सातवीचा विद्यार्थी अमिताभ धनराज सिरसाट याने आपल्या उत्कृष्ट क्रीडाकौशल्याच्या जोरावर शालेय क्रीडा स्पर्धेतील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. त्याने फेन्सिंग (तलवारबाजी) सेबर या क्रीडाप्रकारात, १४ वर्षाखालील मुलांच्या गटात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या यशामागे क्रीडा प्रमुख आनंद उईके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. क्रीडा शिक्षिका नेहा मानमोडे, क्रीडा शिक्षक अनुराग शिरसाठ आणि शहजाद खान यांनीही त्याला मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. या यशाबद्दल मुख्याध्यापक तुषार येरपुडे यांचे शाळेचे सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख भारत मोंढे, माध्यमिक विभागाचे समन्वयक ईशान कापडिया,शिक्षकवृंद आणि सर्व कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले.एडिफाय शाळा व्यवस्थापनाचे अध्यक्ष डॉ. पुरनलाल हबलानी, संचालक रवी इंगळे तसेच संचालक शिवा रामा कृष्णा यांनी क्रीडागुणांना वाव देऊन त्यांना संधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.

रत्नाबाई दळवी यांचे निधन



लेहेगाव-नजीकच्या धामणगाव काटपुर येथील प्रतिष्ठित नागरिक पवन दळवी यांच्या मातोश्री श्रीमती रत्नाबाई प्रभाकरराव दळवी यांचे वयाच्या (६५)व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती,दोन मुले,मुली आणि नातवंड असा आप्त परिवार होता.त्यांचा अंत्यविधी धामणगाव (काटपुर) येथील हिंदू स्मशानभूमीत करण्यात आला.यावेळी समाज बांधव मित्रमंडळी गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खरीपपाठोपाठ रब्बी हंगामावरही दुष्काळाचे सावट!

अमरावती/का.प्र.

हवामानामुळे खरीप हंगाम वाया गेल्यानंतर शेतकऱ्यांची संपूर्ण मदार रब्बी हंगामावर अवलंबून होती. मात्र, जमिनीत पुरेसा ओलावा शिल्लक नसल्याने आता रब्बी हंगामालाही दुष्काळाचा मोठा फटका बसताना दिसत आहे. अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये रब्बीचे सरासरी पेरणी क्षेत्र ९ लाख १३ हजार १७९ हेक्टर इतके असताना, प्रत्यक्षात केवळ ३६ हजार ३६४ हेक्टरवर म्हणजेच अवघ्या ३.१८ टक्के क्षेत्रावरच पेरण्या आटोपल्या आहे.

विभागात पाणीटंचाईचे सावट गडद असल्याने शेतकरी अत्यंत कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य देत आहेत. कडधान्यांपैकी हरभरा पिकावर शेतकऱ्यांची सर्वाधिक भिस्त असून त्याची लागवड अग्रक्रमाने केली जात आहे.

विभागात बुलढाणा जिल्हा पेरणीत आघाडीवर असून ३ लाख २९ हजार ८०५ हेक्टर उद्दिष्टापैकी -२५ हजार ६८३ हेक्टरवर (७.७९ टक्के) पेरणी पूर्ण झाली आहे. विभागातील एकूण पेरणीपैकी एकट्या बुलढाणा जिल्ह्याचा वा सुमारे ७० टक्के आहे. यात हरभऱ्याचे क्षेत्र २०,२८८ हेक्टर (८.९३ टक्के) आहे.

अकोला जिल्ह्याची स्थिती सर्वात पिछाडीवर असून १ लाख २७ हजार ७२० हेक्टरपैकी केवळ ५५० हेक्टरवर (०.४३ टक्के) पेरणी शक्य झाली आहे. यात हरभऱ्याची पेरणी अवघ्या ५५० हेक्टरवर (०.५४ टक्के) रखडली आहे.

अमरावती जिल्ह्यात १ लाख ५४ हजार १० हेक्टरपैकी अवघ्या १.९५९.८० हेक्टरवर (१.२७ टक्के) पेरण्यांची नोंद झाली असून ही विभागातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात कमी पेरणी आहे.

यवतमाळमध्ये १ लाख ८२ हजार ८७७ हेक्टर उद्दिष्टाच्या तुलनेत ५,५१८.४० हेक्टरवर (३.०६ टक्के) पेरणी झाली असून हरभऱ्याची लागवड ४,३१६ हेक्टरवर (३.४९ टक्के) झाली आहे.

अमरावती विभागात केवळ ३.१८ टक्के पेरण्या



वाशीम जिल्ह्यात १ लाख १८ हजार ७६७ हेक्टरपैकी २,५७२.१० हेक्टरवर (२.१७ टक्के) पेरणी नोंदवली गेली असून यात १,७७०.८० हेक्टर (१.६२ टक्के) हरभरा लागवड झाली आहे.

बुलढाणा आणि यवतमाळ या दोन जिल्ह्यांचा मिळून विभागाच्या एकूण पेरणीत जवळपास ८६ टक्के वाटा आहे.

सिंचनाची जोड अत्यावश्यक

साधारणपणे नोव्हेंबर महिन्यात रब्बीच्या पेरण्या वेगाने सुरू होतात. मात्र, जमिनीतील ओलावा वाढला नाही किंवा पुरेसा पाऊस व सिंचनाची सोय उपलब्ध झाली नाही, तर रब्बीचे एकूण क्षेत्र नियोजित उद्दिष्टापेक्षा प्रचंड खाली राहण्याची दाट भीती व्यक्त होत आहे. याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नासोबतच बाजारातील धान्य व कडधान्यांच्या पुरवठ्यावरही बसणार आहे. विभागातील दुष्काळी परिस्थिती पाहता शेतकऱ्यांनी रब्बीमध्ये कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड करावी. ज्वारीसारखी पिके मर्यादित पाण्यातही चांगला उतारा देतात, असे तज्ज्ञांचे मत आहे.

श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात दीक्षारंभ कार्यक्रम उत्साहात

सामाजिक योगदान देण्यासाठी शिक्षकांनी डॉ. भाऊसाहेब देशमुख यांचा आदर्श ठेवावा- प्राचार्य.डॉ.किरण खंडारे

अमरावती/का.प्र.

स्थानिक, श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात सत्र २०२६-२८ मध्ये प्रवेशित शिक्षक प्रशिक्षणार्थींसाठी दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. किरण खंडारे, प्राचार्य, एच. एन. सिन्हा महाविद्यालय पातुर, यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या उद्घाटन समारंभास प्रमुख अतिथी म्हणून डॉ.जी.एम. जाधव प्राचार्य, श्री.शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा जिल्हा बुलढाणा. यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदर दीक्षारंभ कार्यक्रम श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या प्रसंगी विचार मंचावर कार्यक्रमाच्या समन्वयक ग्रंथपाल डॉ.माधुरी देशमुख,ज्येष्ठ प्रा. डॉ. किशोर क्षत्रीय, प्रा. डॉ.अंजली ठाकरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक डॉ. किरण खंडारे म्हणाले की, श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची व समाजाची उन्नती करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.असे प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ. विनय राऊत यांनी अध्यक्षीय मनोगतातून दीक्षारंभ कार्यक्रमांचा उद्देश स्पष्ट करतांना म्हणाले की, शिक्षक प्रशिक्षणार्थींनी आपल्या परिस्थितीचे व ध्येयाचे भान ठेवण्यासाठी सहाय्य करणे.शिक्षण महाविद्यालयातील सुविधा आणि उपक्रम याचा पुरेपूर लाभ करून देणे असल्याचा सांगितला.

उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. माधुरी देशमुख यांनी केले,तर आभार व्यक्त प्रा. डॉ. किशोर क्षत्रीय यांनी केले होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. वैशाली कडू यांनी केले होते. दीक्षारंभ कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात डॉ सय्यद राजोकी शिक्षणाधिकारी योजना,अमरावती. यांनी 'नियुक्ती ते निवृत्ती : कर्तव्य व जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, शिक्षकांनी नियुक्ती ते निवृत्ती या कालावधीत स्वतःची जबाबदारी व कर्तव्य पार पाडताना नैतिकतेला व प्रामाणिकतेला प्राथमिक स्थान दिले पाहिजे.



तिसरे पुष्प 'स्पर्धा परीक्षा :यश - अपयश'या विषयावर प्रा. पंकज निर्मळ, संचालक, अनंत पंजाबराव देशमुख स्पर्धा परीक्षा अकादमी अमरावती. तसेच प्रा. सुचित कुंभारकर यांनीही TET, TAIT, CTET यासारख्या शिक्षण क्षेत्रातील विविध परीक्षा विषयी मार्गदर्शन केले.चौथे पुष्प 'शाळा व्यवस्थापन' यामध्ये मयूर चौधरी यांनी आपल्या अतिथी व्याख्यानांमधून शाळा व्यवस्थापनातील कौशल्य आणि महत्त्व यावर प्रकाश टाकला.यानंतर पाचवे पुष्प हे 'मानसिक व शारीरिक आरोग्य' या विषयावर पार पडले.

यामध्ये डॉ. प्रज्ञा एस. चौधरी स्त्रीरोगतज्ञ अमरावती. यांनी आपल्या मार्गदर्शनातून मानसिक आरोग्य जपण्याचे कौशल्य विद्यार्थी प्रशिक्षणार्थीने आत्मसात कशी करावीत.शेवटचे व सहावे पुष्प 'आंतरवासीयता' या विषया अंतर्गत अर्चना लुंगे प्रा. डॉ. अंजली ठाकरे, प्रा.डॉ. अमित गावंडे, प्रा.डॉ. वैशाली कडू, प्रा. डॉ. शिल्पा येळणे, प्रा.डॉ. श्वेता सत्तुरवार,प्रा सुरेश पवार, प्रा. डॉ. कविता मेसकर आणि प्रा. अंकिता वानखडे, तसेच कार्यालयीन मुख्य लिपिक नवनिता मोर्शे, वरिष्ठ लिपिक सुनीता गावंडे, यांनीही महाविद्यालयाच्या विविध विभागाची, बी.एड. अभ्यासक्रमाची, विविधअंगी उपक्रमाची माहिती प्रवेशित शिक्षक प्रशिक्षणार्थींना करून दिली. दीक्षारंभ कार्यक्रमात निमंत्रित सर्व अतिथी पाहुण्यांचे स्वागत शाल व पुष्पगुच्छ देऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील संजय बोबडे, ईश्वरदास बोंडे, प्रतीक वानखेडे, आयुष धनवटे, आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास बी. एड. प्रथम व द्वितीय वर्षाच्या सर्व प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

राष्ट्रसंतानी सांगितलेला धर्मसमभाव व्यवहारात आणावा- अमोल मिटकरी

गुरुकुंज मोझरी/वार्ताहर


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या भजनांच्या माध्यमातून समाजात बंधुभाव आणि धर्मसमभाव निर्माण करण्याचा संदेश दिला.'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे, दे वरची असा देष्ठ नांदोत सुखी गरीब-अमीर एकमतांनी, मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी' तसेच 'मंदिर मे भी है खुदा, मस्जिद मे भी राम है' अशा भजनांतून त्यांनी सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली. राष्ट्रसंतांचा हा धर्मसमभाव केवळ विचारांपुरता मर्यादित न ठेवता तो व्यवहारात आणण्याची गरज आहे, असे प्रतिपादन माजी विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी यांनी केले.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुल येथे आयोजित पालखी पदयात्रा शिबीर महोत्सवात आयोजित सर्वधर्म प्रार्थना संमेलनात ते बोलत होते.या सत्राच्या विचारपीठावर सनातन धर्माचे प्रतिनिधी नामदेवराव गव्हाळे, इस्लाम धर्माचे प्रतिनिधी इस्तियाक अहमद, ख्रिश्चन धर्माचे प्रतिनिधी नितीन सरदार, जैन धर्माचे प्रतिनिधी डॉ. मेघराज कोचर आणि बौद्ध धम्माचे प्रतिनिधी भदंत आनंद उपस्थित होते.प्रत्येक धर्माच्या प्रतिनिधींनी आपापल्या धर्मातील सर्वसमावेशकता, समता आणि मानवतेच्या मूल्यांचे विवेचन केले. समाजात वाढत असलेल्या धार्मिक विद्वेषाला नाकारून संतांच्या समता, बंधुभाव आणि मानवतेच्या विचारांचा स्वीकार करण्याचे आवाहन त्यांनी केले.सदर सत्राचे प्रास्ताविक ज्येष्ठ साहित्यिक ज्ञानेश्वर रक्षक यांनी केले, तर सूत्रसंचालन सप्तखंजेरी वादक आकाश टाले यांनी केले.

बी.एस.पाटील महाविद्यालयाच्या वतीने आ.बच्चू कडू यांचा सत्कार

परतवाडा-परतवाडा येथील भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते तथा आ.बच्चू कडू यांचा दिवाळीनिमित्त शुभेच्छा देऊन आत्मीय सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांच्या हस्ते आ.बच्चू कडू यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि ग्रंथ भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.शिक्षणसंस्था आणि सामाजिक क्षेत्रातील नेतृत्व यांच्यातील संवाद व परस्पर स्नेह वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने अशा सदिच्छा भेटी महत्त्वपूर्ण ठरतात.



यावेळी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, राजा टेकाम, दिनेश भागडकर आणि ऋषिकेश महल्ले उपस्थित होते. आ.कडू यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्यातून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, दिव्यांग बांधव तसेच वंचित घटकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या संघर्षशील नेतृत्वाचा आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव म्हणून महाविद्यालयाच्या वतीने हा सन्मान करण्यात आला.

पीकविमा रखडला; यंदा पावसानेही फिरवली पाठ

गतवर्षीच्या भरपाईची प्रतीक्षा कायम; यंदा पावसाच्या लहरीपणामुळे पिके संकटात, शेतकऱ्यांना शासनाच्या ठोस मदतीची अपेक्षा

अंजनगाव बारी/वार्ताहर

निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत असून, एकीकडे गतवर्षीच्या पीकविमा भरपाईची प्रतीक्षा कायम आहे,तर दुसरीकडे यंदा पावसाने पाठ फिरवल्याने पिकांवर संकट ओढवले आहे. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर यांसह विविध पिकांचे नुकसान झाले. पाहणी आणि पंचनामे होऊनही अंजनगाव बारी परिसरातील शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. त्यातच यंदा पावसाच्या अनिश्चिततेमुळे पिकांची वाढ खुंटली असून,काही भागांत पिके वाळण्याची भीती निर्माण झाली आहे.त्यामुळे गतवर्षीचा पीकविमा कधी मिळणार आणि यंदाच्या संभाव्य नुकसानीतून शेतकऱ्यांना दिलासा कसा मिळणार? असा सवाल उपस्थित होत आहे.

गतवर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीनंतर पीकविमा आर्थिक आधार ठरेल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. मात्र, नुकसान होऊनही भरपाईसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. शेतीचा वाढता खर्च, बियाणे, खते, कीटकनाशके आणि मशागतीसाठी केलेली गुंतवणूक यामुळे शेतकरी आधीच आर्थिक तणावात आहेत. अशा परिस्थितीत मागील वर्षाची भरपाई रखडणे आणि चालू हंगामात पावसाने दडी मारणे, यामुळे शेतकऱ्यांसमोरील संकट अधिकच गंभीर बनले आहे.

बांधावरील पाहणी पुरेशी नाही; प्रत्यक्ष मदत कधी?

यंदा पावसाच्या अनिश्चिततेमुळे पिकांची स्थिती चिंताजनक बनत असताना विविध राजकीय पक्षांचे नेते शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करीत आहेत. प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने ही पाहणी महत्त्वाची असली, तरी त्यातून शेतकऱ्यांच्या पदरात प्रत्यक्ष मदत पडणेही तितकेच आवश्यक आहे. केवळ पाहणी आणि आश्वासनांपुरते मर्यादित न राहता, गतवर्षीचा प्रलंबित पीकविमा मिळवून देण्यासाठी तसेच यंदाच्या संभाव्य नुकसानीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी शासन व संबंधित विमा कंपन्यांकडे ठोस पाठपुरावा होणे गरजेचे आहे.



गतवर्षीच्या पीकविम्याची प्रलंबित रक्कम आणि यंदाच्या पावसाअभावी निर्माण झालेल्या संकटाचा विचार करून शासनाने शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पीकविमा भरपाईबाबत स्पष्ट भूमिका घेऊन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करावा आणि यंदाच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून नियमानुसार मदतीची कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

'गतवर्षी एक रुपयात पीकविमा काढूनही भरपाई मिळाली नाही. यंदा पावसाअभावी संकट वाढल्याने तीन पिकांसाठी २,६०० रुपये भरून विमा काढला आहे. शासनाने प्रलंबित भरपाईसह यंदाच्या विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी ठोस पाठपुरावा करावा.'

-विनोद बोरकर, शेतकरी

'पीकविमा अद्याप मिळाला नाही आणि यंदा पावसाअभावी पिके संकटात आहेत. शेतीचा वाढता खर्च आणि हातातोंडाशी आलेला घास हिरावण्याची भीती यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने तरी आमच्या व्यथा समजून घेऊन प्रलंबित विमा भरपाई तातडीने द्यावी.'

- टिळकराम हटवार, शेतकरी

शेतकरी दुहेरी संकटात!

गतवर्षी अतिवृष्टी आणि यंदा पावसाची अनिश्चितता, अशा दुहेरी संकटाचा सामना अंजनगाव बारी परिसरातील शेतकऱ्यांना करावा लागत आहे. एका वर्षाच्या नुकसानीची भरपाई अद्याप मिळालेली नसताना नव्या हंगामातील पिकेही धोक्यात आल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थिती जाणून घेण्यासोबतच त्यांच्या हक्काचा पीकविमा मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत. अन्यथा, नैसर्गिक संकटासोबतच आर्थिक संकटाचाही भार शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे.

दुष्काळसदृश्य स्थितीत प्रशासकीय यंत्रणेने सतर्क राहावे

-पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

-७३४ कोटींच्या मदतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर, -जलसंधारणाची कामे प्राधान्याने करण्यावर भर

अमरावती/प्रतिनिधीः-
अल-निनोचे परिणाम सर्वत्र दिसून येत आहे. जिल्ह्यातही कमी पावसामुळे दृष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे येत्या काळात जलसंधारणाची कामे करून या परिस्थितीला समोर जावे लागणार आहे. यात प्रशासकीय यंत्रणांची भूमिका महत्वपूर्ण राहणार असून त्यांनी दृष्काळस्थितीमध्ये सतर्क राहावे, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.





नियोजन भवनात आज जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य स्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी खासदार बळवंत वानखेडे, डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे, केवलराम काळे, प्रताप अडसड, सुलभा खोडके, राजेश वानखेडे, गजानन लवटे, उमेश यावलकर, प्रविण तायडे, विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ५६ टक्के पाऊस झाला आहे. कमी पावसामुळे दृष्काळी परिस्थिती☞(पान २ वर)

कळाशी येथील सुबोध विद्यालयात टाकल्या दारूच्या बाटल्या





खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर तालुक्यातील कळाशी येथील सुबोध विद्यालयाच्या आवारात काल रविवारी (दि.१) अज्ञाताने दारूच्या बाटल्या टाकल्याचा धक्कादायक प्रकार आज सोमवारी (दि.२) उघडकिस आल्याने परिसरात खळबळ उडाली. कळाशी या गावात गेल्या कित्येक वर्षांपासून अवैध देशी दारूचा व्यवसाय सुरू आहे. या देशी दारूच्या व्यवसायामुळे गावातील तरुण पिढी नशेच्या आहारी जात आहे. या गंभीर घटनेसंदर्भात संदर्भात ग्रामस्थांनी दर्यापूर पोलीस स्टेशनला वारंवार तक्रारी सुद्धा दिल्यात परंतु दर्यापूर पोलीस पोलिसांच्या वतीने थातूर मातुर कारवाई करून त्या दारू विक्रेत्यांना सोडून देतात असा असल्याचा आरोप आता या ग्रामस्थांनी केला आहे.

आज (दि.२) कळाशी येथील सुबोध विद्यालयाच्या गेटच्या आत अनेक☞(पान २ वर)

अवैध सावकारीविरोधात अमरावती, अकोल्यासह तीन ठिकाणी छापे

विभागीय सहनिबंधकांच्या तीन पथकांची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- अवैध सावकारीविरोधात विभागीय सहनिबंधक कार्यालयाने आक्रमक पवित्रा घेत अमरावती व अकोला जिल्ह्यांतील☞(पान २ वर)



बाभूळगाव जहांगीरमध्येही तपासणी-

तिसऱ्या पथकाने सहायक निबंधक रोहिणी विटणकर यांच्या नेतृत्वाखाली अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील बाभूळगाव जहांगीर येथील एका महिलेच्या निवासस्थानी छापा टाकून तपासणी केली. दुपारी १२.२० ते १२.५० या वेळेत ही कारवाई करण्यात आली. मात्र, येथे कोणतेही आक्षेपार्ह दस्तऐवज आढळून आले नाहीत. जप्त करण्यात आलेल्या १३ दस्तऐवजांची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदींनुसार तपासणी करण्यात येणार आहे. विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन आणि जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निबंधक सचिन पतंगे पुढील तपासणी करणार आहेत.

सरकारची १२ तास वीज देण्याची घोषणा पोकळ

-माजी आमदार वीरेंद्र जगताप यांचा आरोप

-सातेफळ, निमगव्हाण, जावरा येथील शेतकरी आक्रमक!

-महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलनाचा इशारा

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-
राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना सुरळीत व दिवसा १२ तास वीज देण्याची घोषणा करण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात ती केवळ पोकळ व कागदावरच ठरली आहे. चांदूर रेल्वे तालुक्यातील सातेफळ, निमगव्हाण, जावरा येथील शेतकरी तसेच चांदूर रेल्वे शहरातील रहिवासी, व्यापारी महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात आक्रमक झाले आहेत.



माजी आमदार प्रा. वीरेन्द्र जगताप यांच्या नेतृत्वाखाली या सर्व भागातील शेतकरी व नागरिकांनी महावितरण प्रशासनाकडे तीव्र रोष व्यक्त केला आहे. निमगव्हाण येथील राघोते यांच्या शेतातील ६३ क्क्र ची डी.पी. ओव्हरलोड होऊन वारंवार जळत असल्याने मागील २१ दिवसांपासून वीज पुरवठा पूर्णपणे बंद आहे. तसेच सातेफळ वैरागळे येथील डी.सी.टी. चा वीज पुरवठा देखील☞(पान २ वर)

दुष्काळ मदत निधीची शेतकऱ्यांना प्रतीक्षा

प्रोत्साहनपर निधी कधी मिळणार?

खल्लार/प्रतिनिधीः-
नैसर्गिक संकटे, सततची आर्थिक ओढाताण आणि शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आधीच अडचणीत सापडला आहे. त्यातच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळ निधीची तसेच प्रोत्साहनपर निधीची शेतकऱ्यांना प्रतिक्षा लागली आहे.

शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, त्यांना दिलासा मिळावा यासाठी शासनाकडून विविध घोषणा करण्यात आल्या. मात्र या घोषणांचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात कधी जमा होणार, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. अनेक शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करीत असताना मदतीची रक्कम रखडल्याने त्यांच्या चिंतेत भर पडत आहे.☞(पान २ वर)



पुलाच्या पाण्यात बुडून ११ वर्षीय बालकाचा मृत्यू

ब्राह्मणवाडा थडी येथील घटना

बेलोरा/प्रतिनिधीः-
ब्राह्मणवाडा थडी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या जुन्या पुलाच्या ठिकाणी बांधकाम विभागाच्या अनास्थेमुळे ११ वर्षीय बालकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. संकेत संतोष भुसारे (वय ११) असे मृत बालकाचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ब्राह्मणवाडा थडी येथील जुना पूल तोडून त्या ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम करण्यात आले आहे. मात्र, जुन्या पुलाचे मटेरियल व लोखंडी सलाखी पाण्यातच पडून असून त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. संकेत हा आंघोळीसाठी गेला असता, जुन्या☞(पान २ वर)

कर्ज पुनर्वित्त मोहिमेत अमरावती जिल्हा राज्यात प्रथम

-कृषी कर्जवाटपातही अव्वल

अमरावती/प्रतिनिधीः-
जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या कर्ज पुनर्वित्त मोहिमेत अमरावती जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाधिकारी यांच्या पुढाकाराने जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे तसेच बँकांच्या समन्वित सहभागामुळे जिल्ह्याच्या कर्ज पुनर्वित्त मोहिमेला उल्लेखनीय यश मिळाले आहे. दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्याची कर्ज पुनर्वित्ताची प्रगती केवळ ८ टक्के होती. ती ऑक्टोबरअखेर ५५ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. राज्यातील अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत अमरावती जिल्ह्याची कामगिरी लक्षणीय असून, बुलढाणा जिल्ह्यात ३३ टक्के, धुळे व अकोला जिल्ह्यांत प्रत्येकी ३१ टक्के, यवतमाळ जिल्ह्यात २१ टक्के, छत्रपती संभाजीनगर☞(पान २ वर)



दर्यापूरात रेल्वे फाटकाजवळ आढळला वृद्धाचा मृतदेह

खल्लार/प्रतिनिधीः-
दर्यापूर शहरातील रेल्वे फाटकाजवळ एका वृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विठ्ठलराव आंबादासजी साखरे (वय अंदाजे ७० वर्षे), रा. गायवाडी, असे मृत व्यक्तीचे नाव असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.



सोमवारी सकाळी ८:३० वाजताच्या सुमारास दर्यापूर पोलिसांना☞(पान २ वर)

विद्यापीठाचे कामकाज ९ ते १३ नोव्हेंबर पर्यंत बंद

अमरावती/प्रतिनिधीः-
दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ रोजी विद्यापीठाचा बेचाळिसावा दीक्षांत समारंभामुळे विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभाग सुरू ठेवण्यात आले होते. सदर तारखेची पर्यायी सुटी दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२६ रोजी जाहीर करण्यात आली असून १२ व १३ नोव्हेंबर रोजी दिवाळी निमित्य विद्यापीठाच्यावतीने सुटी जाहीर करण्यात येत आहे. तर १० व ११ नोव्हेंबर रोजी शासकीय सुटी आहे, त्यामुळे विद्यापीठाचे सर्व



कामकाज हे ०९ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर पर्यंत बंद राहणार आहे. दिनांक १२ व १३ नोव्हेंबर या सुटीच्या ऐवजी दिनांक २८ नोव्हेंबर व १२ डिसेंबर या दोन सुटीच्या दिवशी विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग नियमित☞(पान २ वर)

शेतामधून ३ क्विंटल सोयाबीन चोरी

नांदगाव खंडेश्वर / प्रतिनिधीः- मौजा शहापूर येथे विजय ठाकरे (रा.ओंकारखेडा) यांच्या मालकीचे चार एकर शेत असून या शेतामधील काढलेले सोयाबीन चे वीस कट्टे शेतामध्ये असलेल्या कांदा चाळमाध्ये वाळविण्यासाठी ठेवले होते. त्यातील ५ कट्टे अंदाजे ३ क्विंटल सोयाबीन किंमत २० हजार रुपयाचा माल चोरी गेल्याची तक्रार विजय ठाकरे यांनी नांदगाव पोलीस स्टेशनमध्ये केली. त्यांच्या शेतामध्ये ८ हजार रुपये महिन्याने सोकारी असल्यामुळे आठ दिवसापूर्वी थ्रेशर मशीन मधून काढलेले सोयाबीन☞(पान २ वर)



चिपर्डा येथून रात्री अवैध वाळूची तस्करी

महसूल प्रशासनाला लाखोचा चुना

खल्लार/प्रतिनिधीः-
नजिकच्या चिपर्डा येथून चंद्रभागा नदीपात्रातून रात्रीच्या सुमारास अवैध रेतीची तस्करी होत असून महसूल प्रशासनाला लाखो रुपयाचा चुना रेती तस्कर लावत आहेत.



येथील चंद्रभागा नदीकाठच्या वाळू घाटाचा लिलाव झाला नाही. त्यामुळे रेती तस्कर हे रात्रीच्या वेळी चोरट्या मार्गाचा वापर करीत असून रेती तस्करी करीत आहेत. याकडे महसूल प्रशासनाने लक्ष देऊन वाळू☞(पान २ वर)

हिराचंद सवाने यांचे निधन

नागपूर/प्रतिनिधीः-
महावीर नगर नागपूर येथील रहिवासी हिराचंद महादेवराव सवाने (वय ९३) यांचे आज (दि.२) मेंदूतील रक्तस्त्रावामुळे दुःखद निधन झाले. सलग ८० वर्षे लढा देत बाल मधुमेहावर मात करणारे ते जगभरातील एकमेव रुग्ण होते. त्यासाठी त्यांचा देश-विदेशातील डॉक्टरांनी सन्मानही केला होता. नागपूर महानगर पालिकेचे उत्कृष्ट बजेट अधिकारी म्हणून त्यांनी ख्याती प्राप्त केली होती. त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. गंगाबाई घाटावर त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले.

फायनान्स कंपनीकडून जळका पटाचे येथील शेतक-याचे घर सील

-कुटुंब बेघर,फायनान्स कंपनीला पोलीस प्रोटेक्शन

-मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांकडे मागितला न्याय

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-
शेतकरी कुटुंबाला फायनान्स कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोलीस बळाचा धाक दाखवून बेकायदेशीरपणे घराबाहेर हाकलून दिल्याची आणि घराला कुलूप लावल्याची संतापजनक घटना धामणगाव रेल्वे तालुक्यातील जळका पटाचे येथे आज सोमवार २ नोव्हेंबर रोजी समोर आली आहे. याप्रकरणी त्रस्त शेतकरी अरुण वासुदेव सहारे यांनी मुख्यमंत्री, महसूल मंत्री, पालकमंत्री, माजी मंत्री तथा आमदार

बचू कडू व आमदार प्रताप अडसड तसेच पोलीस प्रशासनाकडे धाव घेऊन कठोर कारवाईची मागणी केली आहे.

जळका पटाचे येथील माजी सरपंच पराग राऊत पाटील संतापले. ते म्हणाले,☞(पान २ वर)

कंत्राटदारांनी केली सरकारची प्रतीकात्मक तेरावी

थकबाकीसाठी सार्वजनीक बांधकाम विभागासमोर घोषणाबाजी

अमरावती/प्रतिनिधीः-
सरकारी विकास कामे पूर्ण करूनही कंत्राटदारांना पैसे मिळत नसल्याने उपाशी आक्रोशाला सोमवारी अनोख्या आंदोलनाचे रूप आले. राज्य अभियंता संघटना व कंत्राटदार महासंघाच्या वतीने आज सोमवार २ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर सरकारची प्रतीकात्मक 'तेरावी' साजरी करण्यात आली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत जेवन ही केले. हातात विरोधाचे पोस्टर घेऊन निदर्शने करण्यात आली आणि येणा-या जाणा-यांना रोखून प्रतीकात्मक तेरावीचे☞(पान २ वर)